
# चैतन्य लहरी

अंक क्र. ३, ४ मार्च-एप्रिल'९९













# • अनुक्रमणिका •


| तपशील | पान नं. |
|---|---|
| १) शिव-पूजा (दिल्ली फेब्रु. ९९) | ३ |
| २) श्री आदिशक्ती पूजा (कबेला जून ९८) | १० |
| ३) सहज-समाचार | १३ |
| ४) श्री गणेश पूजा (कबेला सप्टें. ९८) | १५ |
| ५) सहजयोग : सूक्ष्मता व गहनता (दिल्ली डिसें. ९८) | २० |
| ६) श्रीराम पूजा (स्वित्झर्लंड : ८७) | २४ |
| ७) हिंसा अधर्म व अशांति दूर करण्यासाठी सहजयोग (दिल्ली डिसें. ९७) | २९ |

# फोटोंचा तपशील

कव्हर पान. १

- प. पू. श्री माताजींचा प्रसन्न फोटो
- खाली डाव्या बाजूला मुंबईतील पब्लिक प्रोग्रॅम स्टेजवरील सजावटीचा काही भाग
- खाली उजव्या बाजूला पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅम स्टेजवरील सजावटीचा काही भाग

कव्हर पान. २

- प. पू. श्री माताजींचा दिल्ली शिवरात्री पुजेतील फोटो ( फेब्रु. ९९)
- खाली डावी बाजू शिवरात्री पुजेपूर्वीचे स्टेज डेकोरेशनचा काही भाग
- खाली उजवीकडे शिवरात्री पुजेतील फोटो

कव्हर पान. ३

- प. पू. श्री माताजींचा दिल्ली वाढदिवस मार्च ९९ पुजेतील फोटो
- खाली डावी बाजू वाढदिवसापुर्वी संगीत कार्यक्रमाच्या स्टेजवरील काही भाग
- खाली उजव्या बाजूचा वाढदिवस पुजेपुर्वीचे स्टेज डेकोरेशनचा काही भाग

कव्हर पान. ४

- वरील डाव्या, उजव्या बाजूला पुण्यातील एकंदर २०० शाळांमध्ये रोज सकाळी सामुहिक ध्यान घेतले जात होते. त्यापैकी एका शाळेतील मुले ध्यान करताना.
- खालील भागात श्री माताजींच्या समक्ष पब्लिक प्रोग्रॅममधील सामुहिक जागृतीनंतरचे हजारो लोकांची कुण्डलिनी जागृत झाली तो क्षण.
- मधोमध पब्लिक प्रोग्रॅममधील हजारो लोक प. पू. श्री माताजींचे भाषण ऐकताना.
- मधोमध पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्या आकर्षक कमानिचा दर्शनी भाग.

# शिव-पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश) दिल्ली : फेब्रु ९९

आज आपण श्री महादेव श्रीशंकरजींची पूजा करण्यासाठी एकत्र आलो आहोत. श्री शंकराच्या नावाने सृष्टीमध्ये अनेक प्रकारची व्यवस्था आहे. आदि शंकराचार्यांच्या प्रभावामुळे शंकराची पूजा मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. दक्षिण भारतात दोन प्रकारचे पंथ आहेत; एक वैष्णव लोकांचा श्री विष्णुला मानणाऱ्यांचा तर दुसरा श्री शिवांना मानणाऱ्यांचा. आपल्या देशातील लोक विभाजन करण्यामध्ये फार हुशार आहेत, ईश्वराचेही जणू विभाजन करण्याचा प्रकारच म्हणा; आणि त्याचे एकत्रीकरण करायला गेले तर वेगळेच पण विपरीत रूप बनते. अय्याप्पा ह्या देवतेचा हाच प्रकार लोकांनी केला. त्यात सांगतात की विष्णूने जेव्हा मोहिनीरुप धारण केले तेव्हा शिव त्यांच्या पोटी जन्माला आले. ही फार चुकीची गोष्ट आहे. आपल्या देशात अशा अनेक चुकीच्या गोष्टी सुरु होतात व त्यांतून वेगवेगळे पंथ निर्माण होतात. आपल्या लोकांना कसल्या ना कसल्या नावाखाली झगडे करण्याचा नादच आहे आणि त्यासाठी काही निमित्त मिळाल नाही तर काहीतरी काल्पनिक कथा तयार करून त्यांच्यासाठी झगडे करतील. या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. सूरज आणि सुर्यापासूनचे किरण, शब्द आणि अर्थ व चाल आणि चालना, तसे हे दोन्ही एकच आहेत. म्हणजे जो सोपान मार्ग – सुषुम्ना नाडीचा मध्य मार्ग. हाच श्री विष्णूचा मार्ग आहे व त्या मार्गावरून आपण शिवतत्वापर्यंत पोचू शकतो. म्हणजे मंझिल श्री शिव तर मार्ग श्री विष्णू. हा मार्ग तयार करण्यासाठी श्री विष्णू व श्री. आदिशक्ती यांनी फार मेहनत केली आहे. त्यामध्ये श्री. शिवांचे काही कार्य नाही; ते आपले आरामात बसले आहेत, ज्याला यायचे असेल तो येईल ज्याला यायचे नसेल तो येणार नाही. म्हणून श्री शिवाच्या पायाशी पोचण्याचा श्री. विष्णुचा मार्ग आपण पत्करला पाहिजे आणि त्या मार्गावरची चक्रे आपण ठीक केली पाहिजेत. ते झाले तरच आपण श्री. शिवापर्यंत पोचू शकू. चक्रे ठीक झाली की हा श्री विष्णूमार्ग उघडतो व त्यातूनच आपले हळूहळू उत्थान घडत जाते. या चक्रांबद्दल मी खूप काही सांगितले आहे, त्यातलेच एक आपले हृदय ज्याला डावे हृदय चक्र म्हणतात. खरे तर हे चक्र नसून श्री महादेवांचे प्रतिबिंब आहे. शिवांचे स्थान मस्तकाच्या वर म्हणजे विचार, बुद्धि यांच्या पलीकडे आहे, म्हणून त्या स्थानापर्यंत पोचण्यासाठी प्रथम आपले हृदय किती स्वच्छ आहे हे आपण बघितले पाहिजे. आपल्या हृदयात अनेक प्रकारच्या दोषांची घाण असते. उदा. ईर्षा, तुम्हाला कोणी त्रास दिला असेल, तुमचे नुकसान केले असेल तर त्याच्या बद्दल ईर्षा बाळगून काही उपयोग नाही, तुमचे हृदय जर स्वच्छ असेल तर तुमच्यामधील आरसा स्वच्छ राहील व परमात्म्याचे प्रतिबिंब त्यामधे येऊ शकेल. पण ईर्षा असली तर हा आरसा प्रतिबिंबित करू शकणार नाही. म्हणून कुणाबद्दलही राग किंवा आकस बाळगणे ही खराब गोष्ट आहे, म्हणूनच येशू ख्रिस्तांनी सर्वांना क्षमा करा असे सांगितले, तीच गोष्ट अनेक साधू-संतही सांगत आले. जसे तुम्ही क्षमा करत जाल तसे त्या गोष्टी महादेव आपल्या नियंत्रणाखाली घेतात आणि त्यांची शक्ति अति-सूक्ष्म असल्यामुळे ते या गोष्टींचा निकाल लावतात व त्यासाठी शिक्षा देतात. हे महादेवाचे कार्य असते, तुमचे नाही. मी पाहते की सहजयोगामध्ये आल्यावरही ही ईर्षा सुटत नाही, कुणाला ट्रस्टी नेमले तर इतरांना त्याच्याबद्दल ईर्षा वाटू लागते, या ट्रस्टी वा लिडरमध्ये खरं तर काही अर्थ नसतो. माताजींनी हा एक खेळ चालवलेला असतो. पण तरीही ह्या प्रकारांनी लोकांची डोकी खराब होतात; मलाच त्यासाठी काय करावे कळत नाही. हे कार्य जगभर इतके पसरले आहे की संपर्क ठेवण्यासाठी कुणाला तरी असे नेमण्याची माझी गरज आहे म्हणून हे करते. तसं पाहिले तर या बाबतीमध्ये बरीच सुधारणा झाली आहे तरी पण अजूनही कोण लीडर झाला वगैरे चर्चा चालतेच.

दुसरी एक गोष्ट म्हणजे, विशेषतः भारतीयामधे ही ईर्षा पैशाच्या बाबतीत फारच प्रबळ होते, सहजयोगमधेही पैशाच्या बाबतीत ही प्रवृत्ति बरीच आहे; कुणाकडे पैसा जास्त आहे, कोण गरीब आहे, सहजयोगाच्या कार्यामधून कोण किती पैसे कमावतो ह्या गप्पा व चर्चा अजूनही चालतात, ज्याचे हृदय पैशामधे गुंतले आहे तो सहजयोगाच्या कार्यासाठी काही कामाचा नाही. अशा हृदयात जडवाद, भौतिक लालसा टिकून आहे असे समजा. जड आणि भौतिक गोष्टींमधे तुमचे अंतःकरण अडकलेले असेल तर तुमचा उद्धार होणे अवघड आहे, आपल्या देशाची हीच विशेषता आहे. परदेशांत ह्या गोष्टीकडे कुणी फारसे लक्ष देत नाही, तसे पाहिले तर रशियासारख्या पौर्वात्य भागांमध्ये पैसा खूप कमी आहे पण तरीही लोक त्याची चिंता बाळगत नाहीत. आपण लोक स्नान करुन, हात-पाय धुऊन देवाची आरती-प्रार्थना करतो त्यापेक्षा हृदयाला स्नान घालून व स्वच्छ करून प्रार्थना केली तर जास्त बरे होईल.

आपल्याकडे जे षड्रिपु आहेत त्यामध्ये राग, क्रोध हा फार वाईट शत्रु आहे. एकदा का माणसाला क्रोध अनावर झाला की संमोहाचा पगडा येतो व त्याला वाईट वाटू लागते आणि आपण का रागावतो आपल्याला राग का आवरता येत नाही इ. विचारांनी तो

ग्रासतो. पण क्रोध आला की माणूस स्वत:ला विसरतो आणि तोंडाला येईल ते बडबडत राहतो, त्याच्या हृदयांत साचलेली घाण अशा वेळी त्याच्या तोंडातून बाहेर पडते. हा राग आवरला पाहिजे, त्यासाठी आपण का रागावतो इकडे चित्त लावावे. काही लोकांचा क्रोध व्यक्तिगत असतो तर काही वेळा तो समाजसापेक्ष असतो. म्हणून क्रोध का येतो हे विचारांत घेतलेले चांगले. लोक कधी कधी मला म्हणतात ''माताजी, तुमच्याविरुद्ध कुणी काही बोलले तर आम्हाला राग येतो.'' मला तर याचे हसूच येते. मग मी गमतीने सांगते ''मी तर प्रेम करायला बघत असते, म्हणून अशा गोष्टी सोडून द्या.'' उलट ज्याच्यामुळे राग होतो त्याच्याबद्दल दया बाळगायला शिकावे, क्रोधित होणाऱ्या माणसाने अत्यंत शालीन व्हायचा प्रयत्न करावा. सामाजिक स्तरावरही आपल्याकडे अशा काही संस्था आहेत ज्या या क्रोधामधूनच हाणामारी, मारपीट असले प्रकार करत असतात. काही वेळा तर मारपीट करणाऱ्यांची सेना तयार होते. ही फार गंभीर व भयानक गोष्ट आहे. आता या गोष्टी आपल्या संरक्षणासाठी कुणी करत असेल तर ते समजण्यासारखे असेल. पण जो माणूस परमात्म्याचा भक्त आहे त्याला कसल्याच संरक्षणाची जरुरी नाही कारण त्याच्यामधे श्री महादेव वास करुन राहिलेले असतात. अशा माणसाला कोण काय करु शकणार ? त्याला कितीही त्रास दिला, छळले तरी कुणीही त्याला नष्ट करु शकणार नाही; आपल्याला कुणीही नष्ट करु शकत नाही असा त्याचा ठाम विश्वास असतो; उलट त्याला त्रास देणाऱ्यांचाच नाश होत असतो. ही श्रद्धा जेव्हा तुमच्या हृदयात निर्माण होते तेव्हा तुमचे हृदय पूर्णपणे स्वच्छ झालेले असते. श्री. शिवांचे स्थान आपल्या हृदयांत प्रतिबिंब स्वरुप आहे व आरसा जेव्हा साफ असतो तेव्हाच त्याच्यातील प्रतिबिंब स्वच्छ स्पष्ट असते. शिवांचा क्रोध एक वेळेसच होतो असं म्हणतात पण मी त्यांचा क्रोध खूप वेळा बघितला आहे किंबहुना तो त्यांचा अधिकारच आहे. आदिशक्तीच्या विरोधांत कार्य करणाऱ्यांपर्यंत ते कुठेही असले तरी शिवांचे हात तेथपर्यंत जाऊ शकतात; मग ते कुणाचेही ऐकत नाहीत. त्यांना माहीत असते की आदिशक्ती स्वत:हून आपल्या विरोधी लोकांना दंड वा शिक्षा करणार नाहीत उलट क्षमाच करतील. पण त्यांचा हात इतका लांब आहे की तो कुठेही पोचू शकतो व त्याला कुणीही अडवू शकत नाही! त्यांना कोण रोखणार?

यावरुन तुमच्या लक्षात आले असेल की सहजयोगी म्हणून तुमच्या वैयक्तिक जीवनांतही शिवांचेच अनुकरण तुम्ही केले पाहिजे असे केल्याने अनेक फायदे होतात. एक म्हणजे तुम्हाला हृदयाचे त्रास कधी होणार नाहीत. हृदयाचे विकार क्रोध बळावल्यामुळे होतात. क्रोधापासून पश्चाताप वाटू लागला की अंजायनाचा त्रास हतो. नुसते म्हणून वा बोलून क्रोध कमी होऊ शकत नाही. म्हणून मला वाटते की आरशासमोर उभे राहून स्वत:वरच रागवायची सवय केली, माझ्यासारखा महामूर्ख कोणी नाही असे स्वत:लाच म्हणायची सवय केली तर कदाचित क्रोध कमी होऊ शकेल. तसे क्रोधाची समस्या इतकी कठीण आहे की ती सोडवणे फार कठीण असते. काहीही समोर आले की लगेच त्यावर प्रतिक्रिया करणे ही आणखी एक समस्या, जास्त करून परकीय लोकांमध्ये, बरीच आहे. ''मला हे आवडत नाही.'' असे सारखे म्हणायचा हा त्यांचाच प्रकार, असे म्हणणारे तुम्ही कोण? पण आजकाल ही एक फॅशनच बनून गेली आहे. खरे तर हे बोलण्याची जरुरीच नसते. हा आज्ञाचा दोष आहे. कुणी तुम्हाला फुले दिली आणि तुम्ही म्हणालात मला फुले आवडत नाहीत तर ती देणाऱ्याची भावना तुम्ही दुखावता व त्याचा अनादर करता; त्याच्यामागचे प्रेम तुमच्या लक्षात येत नाही. सुदाम्याने पुरचुंडी करुन आणलेले साधे पोहे श्रीकृष्णांनी कसे आवडीने खाल्ले तुम्हाला माहीत आहे. कुणी एखादा गरीब माणूसही एखादी वस्तू मोठ्या प्रेम भावनेने तुम्हाला देतो त्याचा आदर करावा. हे कांचेला मागच्या बाजूने पारा लावण्यासारखे आहे. त्यानंतरच त्याचा आरसा होतो व प्रतिबिंब त्यात येते. अशी भावना बाळगली की तुमच्यात कलात्मकताही निर्माण होते. 'ही कलात्मकता प्रेमाची आहे व त्यातून दिल्या गेलेल्या वस्तूमधील कला तुम्हाला जाणवते व तो देणारा मनुष्य किती प्रेमळ, मनमोकळा, उदार व सज्जन आहे दे तुम्ही लक्षात घेता. असे केले की तुमची नजर आपोआप स्वत:कडे वळते. माझ्यामधे हे प्रेम आहे का हे तुम्ही बघू लागता, आपण वरवरचेच प्रेम दर्शवत तर नाही ना हे तुमच्या लक्षात येऊ लागते. आपणच अनेक चुका करत राहिलो, आपल्यातला कमीपणा लक्षात घेतला नाही आपल्यामधेच जर काही चुकीच्या धारणा असतील तर आपण कुणालाच सुखी करु शकणार नाही. हा स्वार्थीपणा म्हणायचा. 'स्वार्थ' हा फार सुंदर शब्द आहे, स्व म्हणजे आत्मा व आत्म्याचा अर्थ म्हणजे स्वार्थ. स्वार्थ बाळगणारे बरेच लोक शिवांची पूजा करत असतात हे मी पाहते; शिवाय हे लोक फार कंजूष व क्रोधी पण असतात. पण शिवासारखा दाता दुसरा कोणी नाही, ते प्रेमाचा स्रोतच आहेत; तो स्रोतच सगळीकडे वहात आहे आणि त्यांच्यामुळेच हे सर्व कार्य चालले आहे. शिवचरणांचीच ही लिला आहे व त्यातच जगभर सहजयोग पसरत चालला आहे व त्या सागरांत तुम्ही न्हाऊन गेले आहात. यानंतर तुमचे चित्त श्री शिवांच्या चरणी लीन होऊन जाते व त्यामुळे तुमच्यामधील पंचतत्वांचे गुण सूक्ष्म होतात. याआधी मी चार तत्त्वांबद्दल बोलले होते पण पाचवे तत्व, ज्याला 'आकाश' म्हणतात ( Ether ) त्याबद्दल जास्त बोलले नव्हते. मानव सूक्ष्मस्थितीला आल्यावर हे सूक्ष्मतत्त्वही जाणतो. आकाशतत्त्वाकडूनच ईथर प्रवाही होते, त्याचप्रमाणे हे आकाशतत्त्वही चलायमान व्हायला हवे; हे आकाशतत्व सगळीकडे व्यापून असल्यामुळे जिथे-जिथे काही अडचण वा समस्या असेल तिथेतिथे या आकाशतत्त्वामधून तुमचे चित्त पोचू शकते व ज्याची जरूर आहे ते कार्य घटित होते. हे प्रत्यक्षांत घडत असते, असे

झाले की लोक त्याला चमत्कार समजतात पण खरे तर ही चमत्काराची गोष्ट नाही तर सूक्ष्मतत्त्वाचे कार्य आहे. तुमचे चित्त शिवांच्या चरणी अशा जागृत स्थितीला आल्यावर तुमच्यामधे जे सूक्ष्मातिसूक्ष्म असे जे भाव असतात किंवा जी स्थिती असते ती जागृत होते.

हे मिळवण्यासाठी आपले हृदय पूर्णपणे साफ व्हायला हवे. मी मानवामधील तीन रिपूबद्दल वर सांगितले; चौथा रिपू जो आहे तो म्हणजे 'मद' म्हणजे घमेंड. महिलांना घमेंड झाली की त्या पुरुषासारखे चालायला-वागायला लागतात. मग ही घमेंड पैसा, रुप व शिक्षण कशामुळेही आली की स्त्री पुरुषासारखी बनत जाते. उलट पुरुषामध्ये अशी घमेंड आली की तो स्त्रीसारखा वागू लागतो. आरशासमोर जास्त असणे, प्रसाधन, कपडे यात मग्न असणे इ. मध्ये रमतो; त्याच्या चालण्या-बोलण्याची ढबही लटकत-मुरडत अशी स्त्रीसारखी होते. इतकी की पाहणाऱ्याला



मुंबईतील पब्लिक प्रोग्रॅमच्यावेळी श्री माताजी स्टेजवरती येताना

वाटावे की पुरुषी कपड्यातील ही एक स्त्रीच आहे. कधी कधी मदमस्त होऊन हत्तीसारखे डोलायलाही लागतात. अशा तऱ्हेने बसण्या-उठण्यात, बोलण्या-चालण्यात ही घमेंड दिसून येते. सहजमधे या गोष्टींना काही अर्थ नाही. स्वतःला कुणी विशेष आहोत असे समजण्यात काही अर्थ नाही. कारण अशी समजूत (घमेंड) वाढली तर तुम्ही विशेषचे फक्त शेष रहाल. म्हणून स्वतःबद्दल कसलीही घमेंड बाळगू नका. तुम्ही परमात्म्याला मानणारे, ईश्वरभक्त व साक्षात्कारी योगी आहात हे लक्षात घ्या, नाहीतर आनंदाला तुम्ही मुकाल. शिवशक्तीमधे आनंद आनंदच आहे. माणूस आनंदाच्या अनुभवामधेच मस्त होण्यासाठी शिवशक्ति असते. पण मी पाहत की बरेचसे शिवभक्त म्हणवणारे लोक आनंदी नसतात. त्यांच्याशी नुसते बोलणेही कठिण असते. याचा फायदा काय? शिव भक्ति करतात तेव्हा, साक्षात नटराज असतात. आनंदाचे मूर्तिमंत कलात्मक रूपच. पण हे शिवभक्त म्हणजे रुद्राक्षाच्या नुसत्या माळा घालणारे! त्यानेच त्यांना हृदयाचा अटॅक येणार असतो. त्यातून शिवभक्त भस्माचे कपाळावर आडवेच पट्टे फासणार तर विष्णुभक्त उभे पट्टे फासणार. खरे तर आडवा म्हणजे खूप शक्तिवान तर उभा म्हणजे ऊर्ध्वगामी; म्हणून दोन्ही पट्टे लावणे बरे! म्हणून लक्षात घेतले पाहिजे की ज्या शिवतत्त्वासाठी आपण चालतो•तो सोपानमार्गच हवा. त्या मार्गामधे एक-एक वाईट गोष्टी सोडत चालायचे आहे; दुसऱ्याचे चांगले-वाईट बघण्याआधी आपल्यातील चांगल्या-वाईट गोष्टींकडे लक्ष द्यायचे आहे. सतत "मी कसा आहे?" हे पहात बसलात की सर्व भुते पळून जातील. एरवी हीच सारी भुते आपल्याच आज्ञा चक्रावर जमा होतील आणि असा माणूस दुःखदायी बनतो. दुसऱ्याला दुःख देणारा माणूस कधीच सुखी होऊ शकणार नाही. उलट तो स्वतःच आतमध्ये दुःखी होईल.

तुम्हाला शांति, सुख, आनंद व प्रेम मिळावा ही एकच आईची भावना असते. पण शिवाची गोष्टी वेगळी; ते बिघडले की अशी चपराक देतात की मलाही भीति वाटू लागते. तसेच ते भक्तांनी अज्ञानातून केलेल्या चुकांची क्षमा करणारे आहेत आणि त्यांची तपश्चर्या करणाऱ्यांना वरदान देणारे आहेत. पण ज्या माणसाला मुळातच सज्जनपणाची आवड नाही त्याला ते ठीक करतात. म्हणून त्यांना 'भयंकर' असे म्हणतात. म्हणजे एकदा बिघडले की कुणाचेही ऐकत नाहीत. पण हे सर्वस्वाचा अंत होण्याच्या वेळी होणार. यालाच मी लास्ट जजमेंट या शब्दात सांगत आले आहे. तुम्ही काय करत आहात, कुठल्या वाटेने चालला आहात हे सर्व तुमच्यामधे रेकॉर्ड होत असते. त्यानुसारच तुम्ही स्वर्गात किंवा नरकात जाता. तुम्हाला नरकात पाठवण्याचे काम मी नाही तर शिव करणारे आहे. काही लोकांना वाटते मी आपण माताजींना इतके मानतो, त्यांच्यासाठी इतके करतो तरी आपल्याला शिक्षा का मिळते? त्याला कारण मी नाही. पण शिवांची मर्यादा मी आहे तशी माझी मर्यादा तेच आहेत. म्हणून भक्तीमधे

दोघांचा स्वभाव अगदी वेग-वेगळा असल्यामुळे तुम्हाला खूप काळजीपूर्वक राहिले पाहिजे. मी हे एवढ्यासाठी सांगत आहे की सहजयोग्यांतही काही खराब व पैशाच्या मागे लागलेले लोक आहेत. दुसऱ्यांचे नुकसान करणारेही आहेत. हे सर्व लोक बाहेर फेकले जातीलच पण जाता-जाता श्री शिवाच्यासमोर येतील. मला कोणी Bankrupt झाल्याचे सांगितले तरी मी त्याबद्दल काही ऐकून घेत नाही. जे आपणहूनच संरक्षण-कवचापासून बाहेर जातात त्यांना कोण वाचवणार? म्हणून प्रत्येकाने आपले संरक्षण शिवाकडूनही मिळवले पाहिजे. मातेचे संरक्षण आहेच पण शिवाकडूनही ते घेतले पाहिजे. म्हणून मी ज्या पाच तत्त्वांबद्दल सांगितले ते सूक्ष्मतेतून तुम्ही मिळवायला हवे. आणि त्यासाठी ध्यान तुम्हाला केलेच पाहिजे. ध्यान करणारे व न करणारे सहजपणे ओळखून येतात. ध्यान मनापासून झाले नाही, त्यामधे मन स्थिरावले नाहीतर त्या ध्यानाचा लाभ मिळत नाही. त्याचा काही फायदा नाही. **ध्यान असे पाहिजे की रोमारोमांतून आनंद उमटला पाहिजे. श्री शिव तुम्हाला अशा आनंदाने पुलकित करतात.** त्यांच्या नुसत्या नामस्मरणांतूनही आनंद वाटला पाहिजे. काही लोकांच्या बाबतीत हे होत नाही याचे मला आश्चर्य वाटते. शिवभक्त लोक शुष्क, दुःखी असू शकतच नाही.

या बाबतीत एक गोष्ट अशी की जे लोक अती कार्यमग्न कार्याच्या पाठीमागे लागलेले असतात ते उजव्या बाजूचे होत राहतात. हे प्रमाणाबाहेर गेले की ते शिवापासून विभक्त होतात. आणि मग त्याचे परिणाम दिसू लागतात. सरस्वतीदेवी ही शिवाची बहीण- जे लोक बरीच ज्ञानसाधना वा कलोपासना करतात त्यांनी ही गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. म्हणून ज्ञान व कला याबाबतीत जे चुकीच्या गोष्टी करतात— चुकीच्या कल्पना मांडणे, विपरीत ज्ञान पसरवणे, अश्लील कला जोपासणे— आणि सरस्वतीचा अपमान करतात ते एक फार मोठा गुन्हा करत असतात आणि शिव त्यांना मोठी शिक्षा करतात. आदिशक्तीच्या बाबतीतही त्यांचे असेच कडक नियम आहेत. यांत मुळीच शंका नाही. म्हणून सहजयोग्यांनी स्वतःकडे लक्ष देणे फार जरुरीचे आहे. 'माझ्यात काय कमी आहे, मी कोणत्या चुका करतो' इकडे सतत ध्यानपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये याचा अगदी सोपा मार्ग दाखवून दिला आहे. आजकाल नवा जमाना आला आहे म्हणजे काहीही केले तरी चालते हा विचार मूळ धरत आहे. पण ते बरोबर नाही. भारतात रहायचे असेल तर भारतीय संस्कृतीचे पूर्णपणे अनुसरण केलेच पाहिजे. सारी जीवनप्रणालीच कशी असावी याचे भारतीय संस्कृतीमधून विवरण केले आहे. या संस्कृतीमधे तीन मुख्य तत्त्वे आहेत. सर्वप्रथम शिवतत्त्व, आपल्या संस्कृतीमधील सर्व मर्यादा शिवतत्त्वामध्ये आहेत. लहान-सहान गोष्टींपासून मोठ्या गोष्टींबद्दल सर्व मर्यादा शिवतत्त्वामधे आहेत व त्याच्याकडे शिवाचे फार लक्ष असते; त्याचे उल्लंघन केलेले त्यांना चालत नाही. या शिवतत्त्वाबद्दल लोकांमधे काही चुकीच्या धारणा आल्या आहेत. उदा. भांग प्यायली की शिव-तत्त्व प्राप्त होते, तीच समजूत दारु पिण्याबद्दल. अशा अनेक गोष्टी शिवतत्त्वाच्या नावाखाली लोकांनी पसरवल्या. शिव विष प्यायले तसे तुम्ही पिऊ शकाल का? संसारातील सर्व विष संपवण्यासाठी त्यांनी ते प्राशन केले. म्हणूनच ते धोत्र्याची फुले खात असत. कारण त्याने विषाचा प्रभाव नष्ट होतो. तसेच साईनाथ लोकांची तंबाखूची सवय जावी म्हणून चिलीम ओढायचे. मंत्री लोकही तंबाखू खातात, शिपायाकडूनही वेळ पडली तर मागतात. महाराष्ट्रात तंबाखू पेरत नाही पण खाण्याची सवय फार आहे. म्हणून साईनाथांना ती संपवून टाकायची होती. पण लोक उलटे त्यांचे आचरण करण्यासाठी तंबाखू खाण्यात चूक मानत नाहीत. शिवांचा तंबाखूशी काही संबंध नाही, तरी ती सवय शिवतत्त्वाच्या विरोधात आहे. तसेच देवीचे कार्य जगातील दुष्टांचा व भुतांचा संहार करणे, ते तुमचे कार्य नाही. याच दृष्टीने जे अनेक साधु-संतांनी केले ते तुम्ही करु शकणार नाही. तशी शक्ति तुमच्याजवळ नाही आणि ते तुमचे कार्यही नाही. **तुमचे कार्य आहे की स्वतःला ठीक करणे, स्वच्छ करणे आणि शिवतत्त्वाच्या स्थितीला येणे. तशी स्थिती मिळवली नाही तर सर्व मेहनत बेकार जाईल. चुकीच्या गोष्टींचे अनेक तऱ्हेने समर्थन करणे शक्य असले तरी तुम्हाला योग्य त्या मार्गानेच जायचे आहे. योग्य प्रकारेच वागायचे आहे. म्हणून सर्वप्रथम आपण आपले हृदय स्वच्छ केले पाहिजे.** आपल्या ज्या काही वाईट सवयी आहेत त्यांचा हृदयावर फार परिणाम होत असतो. एक जमाना असा होता की जे विद्यार्थी येतील त्यांना जंगलात रहावे लागायचे. म्हणजे ऐषआरामाची सवय मोडून टाकली जायची; फार तर झोपडीमधे जमिनीवर (शेणाने सारवलेल्या) झोपायला मिळे. अंगावर फार कमी कपडे असत. कारण कपड्यांची लालसा वाढू नये म्हणून. तुमची आई कुठेही राहू शकेल, कुठेही झोपू शकते, काहीही खाऊ शकते हे तुम्हाला माहित आहेत. आणखी एक गोष्ट म्हणजे भारतीय लोकांना खाण्याचे चोचले फार असतात, महिलांना तर फारच. मला पण जेवणासाठी सारखा आग्रह करतात. पण मी बाहेरचे किंवा हॉटेलचे जेवण घेत नाही. घरचेच जेवण, तेही मीठ-साखर नसलेले मला लागते. भारतीय महिला, पंजाबी, गुजराथी इ. सगळ्या प्रांतातल्या महिला खाना बनवण्यात फार चतुर. नवऱ्यांनाही त्या खायला घालून बुद्दू बनवून ठेवतात! माझ्या नवऱ्याला हे आवडते ही भाषा सगळीकडे ऐकायला मिळते. दिवसभर त्या खाण्या-पिण्याच्याच गोष्टी करत बसल्या तर त्यांना सहजयोगी कसे म्हणणार? एकूण खाण्यापिण्यामधे हिंदुस्तानी लोक फारच उत्साही. त्यांची अशीच एक दुसरी सवय म्हणजे परदेशात पूजेसाठी आले तरी त्यांनी अटॅच्ड बाथरुम हवी असते. आपल्या घरी कधी त्यांना त्याची गरज वाटत नसली तरी तिथे रहायच्या जागी आधुनिक व्यवस्था असलेली attached

bathroom हवी असते. गणपती पुळ्यांतही तीच तऱ्हा. परदेशी सहजयोग्यासाठी त्यांना सवय नसते म्हणून वेगळ्या बाथरुम्स बांधण्यात येतात. पण ह्या लोकांनाही त्यांच्यासारखी वेगळी व्यवस्था लागते! मग ते परकीय लोकच म्हणू लागले की आम्हाला हिंदुस्तानी पद्धत चालेल. म्हणून त्यांची अदलाबदल केल्यावर हे भारतीय लोक एकदाचे खूष झाले. सहजयोग्यांनी अशा गोष्टी करणे एक शरमेची गोष्ट आहे. आणखी एक हैराण करणारी गोष्टी म्हणजे कबेल्यात पूजेसाठी येणारे इतर परकीय लोक वेगवेगळ्या जातीचे असले तरी आनंदाने जसे असेल तसे एकत्र राहतात पण भारतीय लोक हॉटेलमधे जाऊन राहतात. या सर्वांमधून त्याग करण्याच्या भावनेचा अभाव दिसून येतो. आजकालच्या मॉर्डन पद्धतीमधे त्याग ही भावनाच लुप्त होत असल्यासारखे दिसते. या लोकांकडे नोकर-चाकर नाहीत. सर्व कामे आपली आपल्यालाच करावी लागतात. फालतू गोष्टींकडे चित्त लागणे, बेकार गोष्टींच्या मागे लागणे या सवयी तुम्हाला फक्त एक साधारण सर्वसामान्य माणूस बनवतात. आजकालच्या बायका ब्युटिपार्लरच्या मागे लागतात. पुण्यासारख्या गावात ब्राह्मण महिलाही स्लीवलेस ब्लाऊज घालतील, काळा चष्मा लावतील आणि स्कूटर वा कारमध्ये भटकतील. पुण्यासारख्या पुण्यभूमीची ही तऱ्हा! मला हे समजतच नाही. शिवाकडे पहा; ते आरामात बसलेले असतात. बराती म्हणून गेले तर नंदीवर बसून; नंदी त्यांचा फार आवडता. कारण ते म्हणतील त्याला मान डोलवणारा! पार्वतीला त्याबद्दल काही विरोध नव्हता पण तिच्या भावाला हे एक आश्चर्यच वाटले.

मला तुम्ही असेच रहा असे म्हणायचे नाही पण नको त्या गोष्टींच्या मागे लागण्यात, त्यावर पैसे उधळण्यात काय अर्थ? 'समजदारी' असावी; जे आहे त्यात रहायला शिकावे; खाना जसा आहे, जसा मिळेल तसा मान्य करावा; कुठे जेवायला गेले तर तिथल्या जेवणाला नावे ठेवणे किंवा घरात काही केले तर ते अमक्या-तमक्या घरातल्यासारखे नाही बनले अशी टीका करणे. अशा तऱ्हेने खाण्यामधे जिभेचे चोचले पुरवणे हा प्रकार हिंदुस्तानी लोकांमधे फार जास्त चालतो. हे प्रकार थांबायला हवेत. हे परदेशी लोक तुमचे जेवण घेतात पण त्यांनी कशाला नावे ठेवल्याचे माझ्या कानावर येत नाही. आता त्यांच्याकडचा इंग्रजी खाना तुम्ही घेऊच शकणार नाही' ही गोष्ट वेगळी. पण असल्या सवयींमुळे जीवनातील आनंदाला तुम्ही पारखे होता. पूर्वीच्या काळी पार होण्यासाठी हिमालयात जावे लागायचे. जंगलात राहून नदीवर आंघोळ करावी लागायची. जमिनीवर झोपायचे, कपडे नावापुरते घालायचे असे अनेक कष्ट केल्यावर व गुरुची सेवा केल्यावर पार होण्याची संधी मिळत असे. पण एकदा पार झालेला शिष्य चांगला तयार व्हायचा. **तुम्हा लोकांना काहीही न करता सहजा-सहजी आत्मसाक्षात्कार मिळाला. पण तुमच्या डोक्यात अजूनही पूर्वीच्याच गोष्टी रुतून बसल्यासारख्या टिकून आहेत; त्याच गोष्टी तुम्हाला छाटून टाकायच्या आहेत. म्हणून मी त्यांच्यावर इतका जोर देत आहे.** त्यासाठी तुम्हाला घरदार सोडण्याची जरुर नाही. पण आपल्यामधील हे दोष हळुहळु कमी करण्याचा प्रयत्न तुम्ही केला पाहिजे व आपल्यामधे एक प्रकारचा आस्वाद निर्माण केला पाहिजे. **माझ्या म्हणण्याचा अर्थ एवढाच आहे की आपण शरीराचे गुलाम बनण्याऐवजी शरीराला आपले गुलाम बनवले पाहिजे.** उदा. पलंग असला तरीही जमिनीवर झोपण्याची मुद्दाम सवय केली की झोप येईल. शारिरिक आरामदायी राहण्याच्या गोष्टी सोडून द्याव्या. पुष्कळ जणांना बसचा प्रवास चालत नाही; मग ते कुणाच्या ना कुणाच्या तरी कारमधून जाण्याच्या मागे लागतात पण बसमधूनच जाऊन बघू या अशा निर्धाराने बसने जायचा प्रयत्न करत नाहीत. पूर्वीच्या काळी बसनेच सगळीकडे प्रवास करावा लागे; आमच्या लहानपणी तर घरात मोटार असूनही चार-पाच मैल दूर असलेल्या शाळेत पायी जावे लागे; ती घरातली शिस्त होती. मी तर हातात चप्पल घेऊन अनवाणी चालत असे. कारण त्यामुळे जमिनीमधून व्हायब्रेशन्स मिळत. तुम्हीसुद्धा चप्पल बूट न घालता थोडे तरी जमिनीवर अनवाणी चाललात तर खूप फायदा होईल. एकंदरीत प्रत्येक गोष्ट आरामात कशी होईल इकडे आपण लक्ष देतो. या तऱ्हेने सर्व तऱ्हेची शारीरिक गुलामगिरी कमी करुन हे परम शिवतत्व आपल्याला धारण करायचे आहे. त्यासाठी कुठल्याही बाह्य गोष्टींची अमुकच कपडे घालायचे, मॅचिंग कपडेच हवेत इ. ची काही जरुर नाही. जे आहे त्याचा स्वीकार करावा त्यात काही बिघडणार नाही. उलट जे आहे त्यात समाधानी रहायला तुम्ही शिकाल. नुकताच गॅस सिलिंडर सोळा रुपयांनी वाढला म्हणून महिलामंडळी आंदोलन करु लागल्या पण नुसत्या पावडरवर पंधरा रुपये खर्च करताना त्यांना काही वाटत नाही. तीच गोष्ट घरातल्या नोकरांची, पूर्वी शंभर रुपयांत चालायचे आता त्यांनाही हजार रुपये लागतात वर कपडे वगैरे पण मागतात. पगार वाढला की खर्च वाढतात मग महागाई वाढणारच. सर्वसाधारण समज व सूजबूज बाळगली तर त्रास होत नाही. म्हणजे शिवतत्त्व सुधारेल. मी गांधीजींच्या आश्रमात होते. त्यांची आश्रमातील शिस्त फार कडक. संडास-बाथरुम स्वतः साफ करायची, कपडे व जेवणाचे ताट स्वतः धुवायचे, जेवणात फक्त उकडलेली भाजी व त्यावर मोहरीचे तेल, एवढा कडकपणा सहन करणारे फार थोडे, बरेच जण थोडे दिवस राहून पसार व्हायचे. या सगळ्या गोष्टींसाठी आस्वाद समजला पाहिजे. मी तर म्हणेन की तुम्ही सर्वांनी थोडे दिवस उकडलेल्या भाजीच खाऊन पहा. खाण्यापिण्याच्या चोचल्यामुळे शिवतत्त्व खराब होते व सारी मेहनत बेकार जाते. पूर्वी लोक एखादा दिवस उपास करत. त्या निमित्ताने काही त्याग करत पण आजकाल हे बोलणेही अवघड आहे. समाधानी व संतुष्ट राहणीसाठी खाण्यापिण्याच्या व तत्सम गोष्टींची मुळीच जरुरी नाही.

आणखी एक गोष्ट म्हणजे आपल्याकडे जातपातचे प्रकार

अजून चालतात. कायस्थ, ब्राह्मण, हिंदू वगैरे भेदभाव केले जातात. सहजयोगातही ते जाती-जातींचे आपापले ग्रुप बनवून राहतात. जेवायला बोलवायचे तरीही जात पाहून करणार. सहजयोगी झाल्यावर जात कशी शिल्लक राहते? शिवांना जात माहीत नव्हती. बराती म्हणून त्यांनी लुळे पांगळे लोकही बरोबर घेतले. म्हणून शिवतत्वाला येण्याच्या दृष्टीने असे जाती-पातीबद्दल कटाक्ष पाळणे चुकीचे आहे. तीच गोष्ट खाण्या-पिण्याची, प्रत्येक जातीला आपापल्या पद्धतीचे जेवण व पदार्थ आवडतात व पाहिजे असतात. वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ खाण्यातही रस असतो हे समजून घेण्याऐवजी आपल्याच पद्धतीचे जेवण ठेवण्याचा आग्रह कशासाठी ? सर्व तऱ्हेच्या जेवणाचा स्वाद घेता आला पाहिजे. तो स्वाद रसनेमधून येतो आणि तिथूनच वाचा उमटते. साध्या बोलण्यातही एक प्रकारचा गोडवा दिसून आला पाहिजे नाही तर चेहराच मुळी रावणासारखा दिसला तर बोलणे बघायलाच नको. पुरुषांची आणि स्त्रियांची दोघांचीही हीच तऱ्हा. अशा चमत्कारीक परिस्थितीत शिवतत्व कुठे दिसणार? शिव तर प्रेमाचे महासागर आहेत. शत्रु, राक्षस यांनाही ज्यांनी वरदान दिले त्या शिवाचे तत्व आपल्यामधे आपण लहान सहान फालतू गोष्टीमधेच घुटमळत राहिलो तर कसे जागृत होणार? ज्या तऱ्हेने आपण एकमेकांवर टीका करत राहतो, जात-पातीसारखे भेदभाव करत राहतो त्यामधे शिव कसे दिसून येणार? शिवांच्या प्रेमधारेमधे आल्यावर तुम्ही उलटी सुलटी बात करु शकत नाही, त्यात काही अर्थ नाही. तुमच्यामधे प्रेम, समज व एकमेकांबरोबरचा आनंद दिसून आला पाहिजे. सहजयोगी एकमेकांत भांडत नाहीत हे खरे, तसेच भेटतात तेव्हा प्रेम वाटतात हेहि खरे फक्त खाणे-पिणे, कपडेलत्ते या वैयक्तिक गोष्टींमधे थोडा अधिक समजूतदारपणा तुम्ही दाखवला पाहिजे.

त्यासाठी तुमचे चित्त तुमच्याच हृदयांत उतरले तर चांगले होईल. अमेरिकेत तर हे फार जरुरी आहे कारण तिकडे या बाबतीत नाना प्रकारचे थेर चालू चालले असतात व फॅशन म्हणून बदलत राहतात. पण तुम्ही तसे वागणार नाही. आपापल्या ठिकाणी जे सन्मानाने (सादगी) राहतात त्यांचेच नाव होते, इतरांचे नाही. आता तुम्हाला आत्म्याचा प्रकाश मिळाला आहे आणि त्या प्रकाशात तुम्हाला स्वतःला सुधारुन ठीक करायचे आहे. तुम्ही शिवांच्या चरणी आला आहात, तुम्ही स्वतःला धन्य समजा की तुम्हाला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला आहे दुसऱ्याला सुधारण्याच्या मागे न लागता स्वतःला ठीक करत चला. पूर्वीच्या काळी दोन-चार साक्षात्कारी पुरुष असायचे, तुम्ही आता हजारोंनी आत्मसाक्षात्कारी लोक आहात हे लक्षात घ्या. तुमचे बोलणे हृदयापासून आले, त्यात माधुर्य आले की कुणीही तुमच्या बोलण्यावर नाराज होणार नाही. लहान मुले असोत वा वडिलधारी माणसे असोत, तुम्ही त्यांना सुख वाटलेत की स्वतःही सुखी व्हाल. तुम्हाला शिवांचे आशीर्वाद मिळाले की तुम्ही समाधानी होता. मी स्वतः समाधानी आहे का, दुसऱ्याच्या वागण्या बोलण्याने आपण नाराज होतो का, आपल्याला राग येतो का, मी सारखे दुसऱ्यांचे दोष काढतो का इ. स्वतःतले दोष पहात चला आणि **तुम्हाला स्वतःमधील दोष दिसून आले तरच तुम्ही स्वतःला सुधारु शकता. अंधारामध्ये प्रकाश आला की सर्व नीट दिसते तसे तुम्हाला तुमचेच दोष दिसून येतात; तसे दिसून आल्याशिवाय तुम्ही स्वतःला स्वच्छ कसे करणार? तसे स्वच्छ झालात की त्या परम पिता परमेश्वराचे दर्शन हृदयांत घेऊ शकाल आणि दुसऱ्यांनाही ते दर्शन देऊ शकाल**

सर्वांना अनंत आशीर्वाद

(या पुढील भाषण इंग्रजीतून झाले.)

मी या लोकांना शिवतत्त्वाबद्दल सांगत होते. शिवांचे प्रतिबिंब चक्रावर नसून तुमच्या हृदयात आहे. तुमच्याजवळ जे आहे ते एक आरसा आहे, त्या आरशामधे प्रतिबिंब येण्यासाठी तुम्ही तो आरसा स्वच्छ केला पाहिजे, त्या आरशातच प्रतिबिंब येण्यासाठी याच गोष्टीकडे नीट लक्ष दिले पाहिजे. त्या संबंधात मी त्यांना षड्रिपूंबद्दल सांगितले, त्यातल्या पाच रिपूं बद्दल मी जास्त बोलले कारण शेवटचा रिपू म्हणजे हाव त्यांच्यापेक्षा तुम्हा पाश्चात्य लोकांसाठी जास्त महत्त्वाचा आहे; कारण त्यांचे जीवनच लालसेने भरलेले आहे आणि श्री शिव त्याच्या पलीकडे आहेत. म्हणून तुम्ही विशेष लक्षात घ्यायला हवे की तुमच्या हृदयांत श्री शिवांचे पूर्ण प्रतिबिंब तुमचे हृदय स्वच्छ झाल्यावरच येणार आहे. द्वेष, मत्सर, शत्रुत्वाची भावना, मोह, लालसा. इ. दोष जर तुमच्यामधून गेले नाहीत तर तुमचे हृदय दगडासारखे होईल आणि त्यामधे शिवांचे प्रतिबिंब येऊ शकणार नाही. सध्याच्या या कलियुगामध्ये श्री शिवांचे गुण तुमच्या व्यक्तिमत्त्वांतून दिसून आले पाहिजेत. त्या गुणांचा आविष्कार प्रकट होणारे लोक आज फार थोडे आहेत. म्हणून तुम्ही सतत स्वतःकडे पाहणे फार महत्त्वाचे आहे. ''माझे काय चुकत आहे, माझे लक्ष कुठे लागले आहे, मी दुसऱ्यांचे दोष न पाहता स्वतःची काळजी घेत आहे का'' इ. प्रश्नांकडे जागरुक राहून लक्ष ठेवा. पाश्चात्य लोकांची एक धारणा आहे की इतरांवर टीका करण्याचा त्यानाच अधिकार आहे ''मला हे आवडत नाही, ते आवडले नाही'' अशी सारखी टिका करणे योग्य नाही. हे म्हणणारे तुम्ही कोण? तुमच्यासाठी कुणीतरी कष्ट घेऊन काही तरी करतो याचा तुम्हाला विसर पडतो आणि वर तुम्ही तुमच्या बोलण्याने त्यालाच दुखावता! सहजयोग्यांनी अशी भाषा करणे अत्यंत चूक आहे, सहजयोगात त्याला परवानगी नाही, सहजयोगात हे चालणार नाही.

श्री शिवांकडे पहा, त्यांना काहीही चालते, त्यांना सर्व प्रकारची जनावरे आवडतात. त्यांच्या विवाह-समारंभात बराती म्हणून त्यांनी जे लोक बरोबर आणले ते सर्व कुणी आंधळे, कुणी लंगडे, कुणी एक पायच नसलेले असे विचित्र लोक आणले कारण त्यांना त्यांच्याबद्दल सहानुभूति व करुणा होती. ते स्वतःतर शुद्ध आनंदाचा स्रोत आहेत म्हणून तुमचे हृदय जर प्रेमाने व आनंदाने

भरलेले असेल तरच त्याचे प्रतिबिंब तुमच्या हृदयात पडणार. म्हणून मी त्या षड्रिपूंबद्दल बोलले कारण ह्या रिपूंचा जोपर्यंत नायनाट होत नाही तोपर्यंत तुमचा आरसा मळलेलाच राहणार.

मी त्या लोकांना (भारतीय) हेहि सांगितले की पाश्चात्य सहजयोगी स्वतःच्या ऐषआरामबद्दल भारतीयांइतके काटेकोर नसः त. अगदी समृद्ध अशी जीवन पद्धती असूनही त्यांना काहीःही चालते, कुठेही रहाण्यास तयार असतात. त्यांना अशा गोष्टींची फिकीर नसते. ही एक चांगली स्थिती पाश्चात्य सहजयोग्यांनी मिळवली आहे. मी भारतीय सहजयोग्यांनाही त्यांचे अनुकरण करण्यास व फालतू गोष्टींमधे चित्त न वाया घालविण्यास सांगत असते. त्यानेच तुम्ही खऱ्या अर्थाने आत्मसन्मुख व्हाल. तुमच्या आत्म्याचा प्रकाश तुमच्या वागण्या-बोलण्यात पडण्याची सध्याच्या काळात फार जरुरी आहे. तसे झाले तर सहजयोग तुमच्यासाठी फलदायी झाला असे म्हणता येईल. याच परिवर्तनाची म्हणजे मानवी स्थितीपासून आत्मस्थितीला येण्याचीच आता जरूरी आहे. आजच्या पूजा प्रसंगातून हेच दिसून येत आहे.

पूर्वीच्याकाळचे गुरु शिष्यांची फार कडक परीक्षा घेत असत, त्यांना डोक्यावर उभे रहायला लावत, पाण्यात उभे करत, वेळप्रसंगी त्यांना गुरुच्या हातचा मार खावा लागे. इतकी कडक परीक्षा होऊनही एखाद-दुसऱ्यालाच गुरुकडून आत्मसाक्षात्कार मिळायचा. या सर्व गोष्टींना फार काळ जात असे. म्हणूअन मला वाटू लागले की प्रथमच आत्मसाक्षात्काराचा प्रकाश साधकांना दिला तर त्याच प्रकाशात त्याचे दोष त्यांच्याच नजरेस येतील आणि ही पद्धत यशस्वी झाली हे तुमचे तुम्हाला समजत आहे; तुम्ही काय करत आहात, इतरांच्यापेक्षा तुम्ही कशामुळे वेगळे आहात हे तुम्हाला समजत आहे. कारण सदाशिवाचे स्थान तुमचे मन, भावना, विचार –यांच्यापलीकडे आहे (डोक्यावर आहे). त्याच्याशिवाय दुसरे काही महत्त्वाचे नाही, नुसती प्रतिक्रिया करत राहण्याने काही मिळणार नाही हे तुम्ही लक्षात घेतल्यावरच हे घटित होणार आहे. काही गोष्टी भारतीयांनी शिकण्याची तर काही इतर गोष्टी परकीयांनी शिकण्याची जरुरी आहे. तुम्ही लोकांनी खूप सुधारणा केली आहे. दारु सोडली, बायकांच्या मागे लागणे बंद केले, तुमचे चित्त स्वच्छ झाले, व्यसने सोडून दिलीत इ. गोष्टी फार चांगल्या केल्या आहेत पण तरीही थोडे फार दोष जे अजूनही शिल्लक आहेत तेही दूर झाले पाहिजेत व तुम्ही पूर्णपणे स्वच्छ-शुद्ध झाले पाहिजे. मगच तुम्हाला शिवतत्व खऱ्या अर्थाने समजणार आहे व त्याच्या आशीर्वादातून तुम्ही आनन्दाच्या महासागरात उतरणार आहात.

परमेश्वराचे सर्वांना आशीर्वाद.

●



पुण्यातील प्रोग्रॅमच्यावेळचे श्री माताजींच्या मार्गाच्या डेकोरेशनचा काही भाग

# श्री आदिशक्ती पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश) कबेला : जून ९८

रशियातील लोक तसे पाहिले तर स्वच्छ मनाचे आहेत. विशेषतः शास्त्रज्ञसुद्धा खूप स्वच्छ मनाचे आहेत. ते खूप दबावाखाली होते म्हणून ते गहन गोष्टींचा शोध घेऊ लागले. रासायनिक किंवा प्रकाशाचे गुणधर्माबाबतचे त्यांचे शोध घेऊन थांबले नाहीत तर त्याबाबत सूक्ष्मात जाऊन त्यांनी प्रकाश वलयांबाबत बरेच काही ज्ञान मिळविले, हात व शरीराभोवती असणारी वलये, त्यांचे ह्या संशोधनाचा सर्व जगात स्वीकार केला गेला. आता हे सज्जन विशेषज्ञ आहेत, त्यांनी खूप लौकिक मिळविला व उच्च पदावर स्थित आहेत. ते सांगतात, एकूण १५० संस्था ते चालवतात, फार नम्र व चांगले ग्रहस्थ आहेत. आणि त्यांच्या या शोधाबाबत मला आनंद होतो की, शास्त्रीय पद्धतीने हे सिद्ध झाले तर त्याला कोणी आव्हान देणार नाही. हे सर्व बीजगणितातील सिद्धांत देऊन ते सिद्ध करून एक पुस्तक लिहिले. ह्यात ते म्हणतात आपल्या जाणीवांच्या (Consciousness) पलीकडे एक निर्वात क्षेत्र असते, त्या क्षेत्रातच तुम्ही सत्य जाणू शकता. आणि सर्व जे सत्यात उतरते तेच विज्ञान होय. विज्ञान असेच निर्माण होते. त्यांनी माझे अनेक फोटो काढलेले दाखविले. त्यातील विशिष्ट एक असा की आम्ही बोटीत असताना माझ्या सहस्त्रारातून शक्ती बाहेर पडत असतानाचा. ते म्हणाले तीच सर्व वैश्विक शक्तीचा उगम आहे. आणि तीच ही आदिशक्ती होय. तीच सर्व काही निर्माण करते. सर्व वातावरण आपण पहातो ते सर्व कृत्रिम होय.

तिने काय घडविले हे जाणायचा प्रयत्न केला तर तिने प्रथम हे केले की तिचे प्रकटीकरण हे डाव्या बाजूस महाकालीच्या रूपात झाले. (माझ्या पुस्तकात हे लिहिले आहे.) ती डाव्या बाजूचे महाकाली तत्त्व आहे ज्यातून तिने श्री गणेशांची निर्मिती केली. श्री गणेशांना त्यांच्या पवित्रतेमुळे निर्माण करण्यात आले, त्यांच्यातील निष्पापता, त्यांच्या मांगल्यामुळे. सर्व सृष्टी निर्माण करण्याचे आधी त्याना निर्माण केले. श्री गणेशांना प्रथम निर्मिले, मग ती स्थित झाली. मग ती विराटाच्या शरीरात शिरली आणि मग दुसरे बाजूने गोलाकार गतीने उजव्या बाजूस जाते आणि सर्व विश्वांची निर्मिती करते, ज्यांना भुवने म्हणतो– त्यांचे मिळून एक विश्व. अशा अनेक विश्वांचे मिळून एक भुवन होते, अशी एकूण चौदा भुवने आहेत. ही सर्व उजव्या बाजूस निर्माण करण्यात आलेत. मग ती पुन्हा वर येते मग पुन्हा खाली उतरते, आदिचक्रे किंवा पीठे निर्माण करीत. ही सर्व पीठे निर्माण करून खाली येते व कुंडलिनी म्हणून ती स्थिरावते. कुंडलिनी म्हणजे आदिशक्तीचा अंश, काही भाग. याचेपुढेही राहिलेले कार्य बरेच आहे. अशा रीतीने ही सर्व शेष (Residual) शक्ती वरील सर्व प्रवासानंतर, वलयांकित कुंडलिनीस्वरूपात खाली उतरते. या कुंडलिनी व पिठातील चक्रांमुळे जी प्रथम निर्माण केली गेली, खाली येताना जी चक्रे विराटाच्या शरीरात आहेत त्यांना निर्माण करते. हे सर्व घडल्यानंतर तर तिने मानव निर्माण केला, पण एकदम नाही तर उत्क्रांतीच्या पायऱ्यातून गमन करून. अशा रीतीने उत्क्रांतीची सुरुवात झाली. ज्याची सुरुवात पाण्यातील सूक्ष्म अशा जंतूपासून झाली पुढे त्याची उत्क्रांती घडली. म्हणून प्रथम पाणी निर्माण केले व अनेक विश्वे निर्माण केली तेव्हा तिने आपल्या उत्क्रांतीचा विलास खेळण्यासाठी तिने पृथ्वी मातेची निवड केली. अशा रीतीने प्रथम सूक्ष्म जंतूची निर्मिती झाली. (माझ्या पुस्तकात तुम्ही पहाल की हायड्रोजन, कार्बन व ऑक्सिजन हे सर्व कसे एकमेकांत मिसळले गेले व नंतर नायट्रोजन कसा कार्यरत झाला व जीवसृष्टीची सुरुवात कशी झाली. हे सर्व माझ्या पुस्तकातून, ते प्रकाशित झाल्यानंतर समजेलच.) दुसरे एका पुस्तकात हे सर्व लिहिले आहे. जवळजवळ लिहून झाले आहे. फक्त आणखी काही चक्राबद्दल बाकी आहे, त्यामुळे तुमच्या लक्षात येईल, की मी जे लिहिले आहे, त्याबाबत लोकांना शंका राहणार नाही. ते समजतील की हे शास्त्रीय सत्य आहे व मी जे सांगते ते प्रत्यक्ष आहे.

आदिशक्तीला आईच्या स्वरूपात जाणून घेणे हे अशक्य होते. विशेषतः तुम्हाला नवल वाटेल की ख्रिश्चन धर्मात ह्या मातेचा उल्लेख टाळण्यात आला. इस्लामनेही हे टाळले. आदिशक्तीला माता म्हणून पूर्ण दुर्लक्षिण्यात आले. भारतीय तत्त्वज्ञानात माता म्हणून स्विकारण्यात आले. कारण भारतीय हे शक्तीचे पूजक आहेत. आणि हे सर्व पुढे चालत आले व ह्या अवस्थेला पोहोचले व सर्व लोकांना पूर्ण माहित झाले की या मातृशक्तीने हे सर्व कार्य करून ठेवले आहे. या मातृतत्त्वामुळेच सर्व लोक पक्के जाणतात की सर्वकाही ही माताच घडविते. अशा रीतीने अनेक 'स्वयंभू' आहेत की जे ह्या पृथ्वी मातेतून निर्माण झालेत. उदा. तुम्हाला माहीत आहे की महाराष्ट्रात महाकाली, महासरस्वती महाकालीची स्थाने आहेत व आदिशक्तीचेही स्थान आहे. जे लोक नाशिकला गेलेत त्यांनी चतुःशिंडी पाहिली असेल. ही चतुःशिंडी हीच साक्षात् आदिशक्ती. जी शक्ती म्हणजेच तिचा चौथा आयाम, (Fourth Dimension) ज्यामुळे तुम्ही उर्ध्वगती जाता. शेवट या महालक्ष्मीमार्गामधूनच तुम्हास आत्मसाक्षात्काराचा लाभ होतो. आदिशक्तीच या सर्व क्रिया घडवून आणते. हे कठीण कार्य आहे. आधीची कार्ये तशी कठीण नव्हती, कारण सृष्टीला (नेचर) ते निर्माण करणे फार सोपे आहे. भूमाता ही आदिशक्तीशी सलग्न आहे. सर्व सृष्टीसुद्धा, पंचतत्त्वेसुद्धा आहेत. हे सर्व सहजपणे निर्मिले गेले. जेव्हा मानव आलेत त्यांना त्यांचे स्वातंत्र्य देण्यात आले. आणि हीच एक जात जी 'मायेच्या' विचारात आणि त्यातील अहंकारात सापडली. या अहंकारामुळे, मायेने त्यांना चकविले असे मला वाटते आणि त्यामुळे या विश्वनिर्मितेच्या तत्त्वाला ते विसरले, सर्व काही धरून चालले. आमचे अस्तित्व हा जणू आमचा हक्कच आहे, आम्हीच मिळविले आहे.व सर्व गोष्टींचे आम्हीच मालक आहोत असे म्हणू लागले. यातूनच त्यांच्या मनावर परिणाम होऊन, दुसऱ्या देशावर आक्रमण करणे, अनेकांना ठार मारणे, या गोष्टींचा उगम झाला, याचे त्यांना कधीही वाईट वाटले

नाही. दुसऱ्यावर आक्रमण करणे प्रभुत्व मिळविणे, दुसऱ्यांना इजा पोहोचविणे याचाच आयुष्यभर विचार केला. त्यांनी कधी आत्मनिरीक्षण केले नाही, की आपण जे काही करतो ते अत्यंत चूक आहे याचा विचारही केला नाही. हे थांबविले पाहिजे. या स्वतंत्रतेतूनच जगात सर्व गोंधळ माजला व या घटनांची सूत्रे ज्यांच्या हातात होती ते अतिशय क्रूर होते व दुसऱ्याबद्दल त्याना काही भावनाच नव्हत्या. पृथ्वीवर हे सर्व अविरत घडत आले.

आता सहजयोगाला सुरूवात झाली व त्यामुळे सहजयोग्यांना आदिशक्तीचे आशिर्वाद लाभत आहे. तरीही सहजयोग्यांमध्ये अत्यंत मुरलेले असे लोक मला अजून दिसत नाही. सहजयोगी म्हणवतात पण काही फॅशन म्हणून आलेत. कदाचित् स्वतःच्या दृष्टीतून चांगले समजणारे किंवा स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी, काही असेल ते हे अत्यंत चुकीचे आहे. तुम्ही जर सहजयोगी आहात तर तुम्ही सर्व जगाला जबाबदार आहात. तुम्हीच फक्त असे लोक आहात, जे पुढे सरसावले, काहीतरी प्राप्त केले व सध्याच्या परिस्थितीत असे वागले पाहिजे की, तुम्ही संत व आत्मसाक्षात्कारी म्हणण्यास लायक व्हाल. काही वेळेस त्यांची वागणूक पाहिली तर धक्काच बसतो. त्यांना स्वतःबद्दल वा दुसऱ्याबद्दल बिलकुल आदर नसतो व त्यांचा एकंदरीत दृष्टीकोन फार गमतीचा वाटतो. काही पैशाच्या मागे तर काही सत्तेच्या मागे असतात. जे सत्तेच्या मागे आहेत ते फार धोकादायक असतात ते सहजयोगाला बदनाम करतात. ते दुसऱ्यांचा अपमान करतात प्रभुत्व गाजवतात व भयंकर वाटतात. सर्व दृष्टी त्यांची सहजयोगात सत्ता मिळविण्याकडे आणि त्यासाठी सर्व युक्त्या वापरतात. काही काळ त्यांचे चालते पण मग ते सहजयोगाच्या बाहेर होतात. शुद्धीकरणाची क्रिया चालू आहे. एका उच्च ईश्वरी अशा जाणीवेच्या क्षेत्रात तुम्ही उतरला आहात हे पक्के जाणले पाहिजे आणि मग तुम्ही इतर सामान्य माणसाप्रमाणे ज्यांच्यात काही पारमार्थिकता नाही, असे वागत असाल तर ते किती दिवस असे चालेल. म्हणून तुम्ही ध्याने केले पाहिजे, प्रगती झाली पाहिजे व चांगले सहजयोगी घडले पाहिजे, हे अत्यंत महत्वाचे आहे.

काही ठिकाणी, काही देशात तसे आमचे सुदैव आहे. पण काही देशातील लोक अजून याबाबतीत बहिरे व मुके वाटतात की ते सहजयोगाला समजू शकणार नाहीत असे वाटते. त्यातील काही माझ्या कार्यक्रमाला येतात पण परत दिसत नाही, याला मला वाटते सहजयोगीच जबाबदार आहेत. ज्या पद्धतीने ते कार्य करतात ते सहज नाही. यात कुठेतरी काही चुकते आहे ज्यामुळे ते सफल ठरत नाही, जसे काही ठिकाणी ते सफल ठरते.

हे सर्व काही घडते आहे, आदिशक्ती आहे आणि तिच्यामुळेच हे सर्व घडते हे मला सांगायचे. पुढचे कार्य तुमच्याकडूनच झाले पाहिजे. तुमच्या हातूनच ते घडणार आहे, तुम्हीच एक आहात जे लोकात परिवर्तन घडवून आणणार. आपण किती लोकांना आत्मसाक्षात्कार दिला याचा सर्वांनी विचार केला पाहिजे. जाणले पाहिजे. सहजयोगाकरिता आपण काय केले. मी विमानातून प्रवास करत असताना माझ्या बाजूस एक स्त्री बसली होती. ती जरा गरम दिसली, मला समजेना नंतर ती म्हणाली मी एका गुरूची शिष्या आहे. अगदी गर्वाने सांगितले. तिच्या गुरुबद्दल ती सांगू लागली. मला आश्चर्य वाटले, की ज्या गुरुकडून तिला काही मिळाले नसतानाही ती म्हणत होती, मी माझे पैसे दिले इ. बरेच काही केले. तसे तिच्याकडे काही विशेष दिसले नाही, तरीही माझ्यासारख्या नवख्याला ती गुरुबद्दल सांगत होती.

पण सहजयोगात मी पाहिले. लोक जरा बुजरे दिसतात. उघडपणे सहजयोगाबद्दल दुसऱ्यांना सांगण्यास टाळतात, हे अत्यंत चुकीचे आहे. यास तुम्हीच जबाबदार आहात. तुम्ही मुमुक्षु होता इ. वगैरे ठीक आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला, तो तुम्ही दुसऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मी मान्य करते की पुरुष यात पुढे येऊन कार्य करतात पण त्यामानाने स्त्रिया तितक्या प्रमाणात करत नाहीत. त्याबाबत त्यांनी जाणीव ठेवून कार्य केले पाहिजे. त्या ते करू शकतात पण किरकोळ समस्याबाबत त्यांचीच चिंता करत बसतात. बायकांची अनेक पत्रे मला येतात त्यात असले चूक, तसले चूक, सारख्या तक्रारीच. ती वाचण्यात काही अर्थ नाही, त्याचा अगदी कंटाळा येतो. तर मला सांगावेसे वाटते की पुरुष अगदी कार्यक्षम असले तरी स्त्रियांनी त्या शक्ती असल्यामुळे मोठ्या संख्येने उभे राहिले पाहिजे. त्या का मागे राहतात याचे कारण समजत नाही. त्या अनेकात परिवर्तन घडवू शकतात, दुसऱ्याचे हित करू शकतात. प्रेम करुणा निर्माण करू शकतात जे स्त्रियात मातृत्वाचे प्रतिक आहे. या गुणारहित त्यांचे स्त्रीत्व अर्थहीन ठरते.

फॅशन्स किंवा आपलेच चेहरे पहात बसण्यात त्या आपला वेळ वाया घालवतात. आता तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला. आतापर्यंत काय केले? काय मिळविले याचा विचार करा. वेळ फार थोडा आहे.

सहजयोगात आज लोक नवीन नवीन विचित्र कलुपत्या काढताहेत. जसे काही विधिकर्माविषयी काही सांगतील, हे आपलाच जणू अधिकार असल्यासारखे आहे. ते लोकांना त्रास देतात घाबरवतात व आपल्या कह्यात ठेवायचा प्रयत्न करतात, जणू काही ते स्वतः फार सोज्वळ आहेत. त्यातील काही, हे माताजींनी सांगतले, हे त्यांचे विचार आहेत. स्वतःच्या अधिपत्यातून हे निर्माण करतात, सांगत सुटतात पण त्यांनी किती लोकांना साक्षात्कार दिला?' हे विचारले पाहिजे, त्यात सकारात्मक दृष्टी आहे हे शोधले पाहिजे. दुसऱ्याविषयीच बोलत रहाणे, टीका करणे, दोष दाखविणे हेच चालते. या सर्व प्राथमिक बाबी, आधीही होत्या त्या आता थांबल्या पाहिजे.

आता हे पुस्तक एकदा सर्व जगात जाईल तेव्हा आपल्या कार्याची सर्वांना माहिती होईल. मग कोण आपल्याला आव्हान देणार नाही. आणि अशी एकदा मान्यता मिळाली की आपण त्याच्यायोग्य राहिले पाहिजे, आपली क्षमता तेवढीच दिसली पाहिजे. आपण मागे राहता कामा नये. जसे, काही सहजयोग्यांना विशेषत: सहजयोगिनींना जर सहजयोगाविषयी त्यांना विशेष माहिती नसते, चक्राबद्दल नसते, देवताबद्दल नसते, मग ते सहजयोगी कसले? तुम्हाला सर्व माहिती असावी. तुम्हाला हे समजत नाही की तुम्ही बाहेरून सहजयोगी नाही तर आतून आहात. चक्राच्या जाणीवा सहजयोगाचे आत होणारे कार्य व परिणाम हे तुम्ही आतून जाणले पाहिजे हे अजून तुमच्या लक्षात येत नाही. मी त्या शक्तीचा उगम आहे आणि आहे, हे तुम्ही जाणता. तशीच पूर्णता तुम्ही प्राप्त करून लोकांना हाताला व त्यांना सहजयोगात आणा अजूनही काही मागे रहातात आणि ज्या देशाचे ते घटक आहेत तेथे ते

राहतात आणि काहीच करत नाही, याचे फार आश्चर्य वाटते. आपल्या देशवासीयांना, त्यांना याची खात्री देऊ शकलो नाही, याबद्दल तुम्हाला दोष दिला जाईल. सहजयोगाला या विस्ताराच्या पायरीवर एक किंवा दोन देश पुरे नव्हे. सर्व देशांना सहजयोगाकडे वळवले पाहिजे. सर्व लोकांना सहजयोगात आणण्याची ही कल्पना चांगली आहे व आपल्याकडील वाङमयामुळे त्यांना खात्री पटेल. त्यांना ते सांगितले पाहिजे. पण हे सहजयोग प्रसाराचे कार्य करतानासुद्धा काही लोकांना अहंकार वाढतो. मग मी मोठा सहजयोगी आहे, मी मोठा प्रमुख आहे इ. चुकीच्या कल्पना त्यांच्या डोक्यात शिरतात. हे चूक आहे. नम्र होऊन तुम्ही विचार केला पाहिजे जेवढे तुम्ही मिळवाल तेवढे अधिक नम्र व्हायला हवे. जसे फळांनी बहरलेले झाड खाली अधिक वाकते. असे तुम्ही अधिक नम्र व्हायला हवे. तसे हे कठीण आहे कारण पाश्चात्य संस्कृतीतच विनय नाही. आक्रमकपणा, प्रभुत्व यांचीच ती संस्कृती आहे. प्रभुत्वाच्या आकांक्षेने ते सर्व जगात पोहोचले, खूप काही कमावले, पण काय मिळविले? पण प्रत्यक्ष काहीच नाही. त्यांच्याच देशात अनेक लोक नशेच्या औषधात अडकलेत. ते नशेकडे का वळतात. आणि मग अनेक पापकृत्ये त्यांचेकडून होतात ते मी येथे सांगत नाही. पण तुम्हास माहीत आहे ते काय करतात, भारतात या गोष्टीचा विचारसुद्धा शिवत नाही तर चुकते कोठे ते पहा व ते कसे सुधारायचे ते पाहा, मदत करा. मी सांगितल्याप्रमाणे यासाठी मी एक संस्था काढणार आहे, त्यात तुम्हीही सहभागी होऊ शकता, असे काहीतरी तुम्ही तुमच्या देशात घडवा.

सर्वप्रथम तुम्ही अहंकारातून मुक्त व्हा. हे घडल्यावरच तुमचे चित्त स्थिर होईल. अहंकाराबाबतीत तुम्हाला सोपे आहे कारण तुम्ही खिस्तांना पूजता. कारण ते आज्ञा चक्रावर स्थित आहे. जरी तुम्ही खिस्तांना भजता तरी त्यांची शालीनता तुमच्यात नाही. पण सर्व उलट आहे. सगळीकडे पाहिले तर धर्माने जे काही सांगितले त्याविरुद्ध लोक वागतात. हिंदु धर्मातील तत्त्वज्ञान सांगते की प्रत्येकात आत्मा असतो मग जातीभेद किंवा उच्च नीच हा भेद का? दुसरीकडे खिस्तांनी सांगितले, सर्वांना क्षमा करावी, नम्र असावे पण खिश्चनांकडे पाहिले तर त्यांना विनय ठाऊक नाही, ती कल्पनाच त्यांच्यात नाही. स्त्रिया तशाच, पुरुष तसेच. सारखे झगडे चालतात. कुणीही विनयशील असणे आतून शांत असणे, हा प्रश्नच नाही. ते परोकारी आहेत. इ. हे लोक जसे दिखावा करतात. सर्व कृत्रिम वाटते. अगदी शब्दार्थाने जरी पाहिले तरी त्यांच्या हृदयात काही प्रेम किंवा करुणा दिसत नाही. जेव्हा आपण सत्य स्विकारतो, तेव्हा या कृत्रिम गोष्टींची साथ करू शकत नाही, दुसऱ्यांना आपण फसवितो. जेव्हा तुम्ही तसे घडता याचा अर्थ अशा बहराच्या काळात तुमचा जन्म सार्थकी लागला असे म्हणता येईल. तसे नसते तर तुम्ही थोडे आधी जन्माला आला असता किंवा आणखी वेगळे असता. पण तुमचा जन्म विशेष आहे. आपली किंमत जाणा, कोण आहोत हे जाणा, समजून घ्या. स्वतःविषयी आदर ठेवा आणि सहजयोगी म्हणून ज्या प्रमुख गोष्टी आहेत त्या करा. तुमची नोकरी इतर तुमची कामे, हे तर चालू आहेच. पण जर सहजयोगाचे कार्य करत असाल तर सर्व कार्यासाठी तुम्हाला वेळ असेल. जेव्हा तुम्ही ईश्वरी कार्य करता तेव्हा तोच तुमच्या कार्यात मदत करतो आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल की या कार्यास कसा वेळ मिळत असतो?

तुम्ही परत जाल तेव्हा आत्मनिरिक्षण करा साक्षात आदिशक्तीच तुमच्या समोर आहे. तशी मी तुम्हास साधी दिसेल मी नम्र आहे आणि लोक ते धरूनच चालतात. मी काही करत नाही, मी कोणालाही शिक्षा करत नाही, कोणालाही, पण तुम्हीच स्वतःला शिक्षा घडवून आणता. तुम्हीच मग निष्फल ठरता जर तुम्ही स्वतःची खबरदारी घेतली नाही, उन्नती केली नाही तर.

या शास्त्रज्ञाचे हे शोध महान आहेत, मी त्यांना पूर्वी कधी ओळखत नव्हते. ते खूप तज्ञ आहेत तसे अत्यंत विनयशील आहेत. ते म्हणाले, मी या जगाला निर्माण करणाऱ्यासमोर आहे तरी मी सर्वसामान्य आहे. मी विचारले तुम्हाला काय वाटते काय घडावे? ते उत्तरले, अगदी तुमच्या समोर मी बसलोय, साक्षात आईच्या समोर. मी म्हणाले तुमच्यावर माझे दडपण किंवा प्रभुत्व असे वाटत नाही हे जाणून खूप बरे वाटले त्यांनी सांगितले. तुमच्या आतील करुणा व प्रेम मला जाणवते. तेच ते आहे हीच करुणा व प्रेम आपल्यात असणे हे सर्वांनी जाणले पाहिजे. मग तुम्ही कोणाचेही हृदय दुखवू शकत नाही, कोणाला काही बोलून दुखावणे हे पाप आहे. असे करण्यात काही लोकांना आनंद वाटतो. स्वतःला फार हुशार समजतात पण ते खरे नाही. तुम्ही जेव्हा दुसऱ्याशी बोलता तेव्हा ते सुखावह व गोड असावे. दुसरी गोष्ट म्हणजे तुमची वृत्ती. जरा इकडचे तिकडे झाले की संपले. आणखी एक वृत्ती म्हणजे जसे तुम्ही गप्प बसा, माझा तुमचा काही संबंध नाही, अशा वक्तव्याबद्दल, सांगायलाच हवे. आणि दुसरे म्हणजे 'काही लोकांची सर्व काही काबीज करण्याची वृत्ती अगदी सूक्ष्म असते. त्यांच्याकडे अनेक युक्त्या चाली असतात, ज्यामुळे लोकांना स्वतःच्या ताब्यात ठेवणे, यातून तुम्हाला काय लाभ होणार? यातून काय साधणार? या ऐहिक जगात तुम्ही थोडे लोकप्रिय असाल किंवा एखाद्या पदावर असाल इ. इ. पण यात काय आहे? हे थोडेच सहाय्यक ठरणार आहे. सगळ्यात लाभाचे म्हणजे तुम्ही सहजयोगाचे उत्तम प्रवर्तक होणे हे चांगले. सहजयोगाचे उत्तम प्रवर्तक होणे त्यामुळे तुम्ही. सुखावणार याचे तुम्हाला नवल वाटेल. तुम्हा पाश्चात्य लोकांनी स्वतःमध्ये करुणा निर्माण केली पाहिजे. प्रत्यक्ष रशियातील लोक हे नुसते नम्रच नाही तर त्यांचे समर्पण पाहिले तर मला आश्चर्य वाटते. डोळे वर करून माझ्याकडे बघत नाही. हे त्यांना कुठून समजले हे सर्व वरील शोधानंतर नाही तर त्यांचे आधीपासून आहे. ते इतके सुंदर अगदी नम्र व प्रेमाणे परिपूर्ण आहेत. लहान मुलांनीही लहान लहान वस्तू माझ्यासाठी आणल्या, मला अगदी गोडीने भेट देण्यासाठी रशियन लोकांनी एवढी क्षमता कशी मिळविली, हे बघून आश्चर्य वाटते. आणि सर्व पाश्चात्य देशात अध्यात्मिकदृष्ट्या सर्वांत उंचावर असतील ज्यामुळे ते सगळ्यात सामर्थ्यवान होतील. बघू या तुम्ही आपल्या देशात काय काय करणार? ते कसे घडवून आणाल. तुम्ही जर त्या ईश्वरी तत्त्वाचे साधन आहात, हे तुम्ही साधले, तर सर्व काही सोपे होते आणि मग तुमची वृत्ती, स्वभाव बदलेल आणि तुमच्यात माधुर्य येईल. सर्वांचे आवडते व्हाल. जणू लोक म्हणतील हे कोण साधु चालले. एवढेच मला सांगायचे आहे. जे काही शोध लागले ते माझ्यापुरते नसून, सर्व जगासाठी आहे आणि हे सर्व जगासमोर आले व सिद्ध झाले तर माझ्यासाठी व तुमच्यासाठीही हे एक स्थित्यंतर ठरेल.

# सहज-समाचार

## शाळांमधून सहजयोग कार्यक्रम

पुणे केंद्रातील महिला सहजयोगिनींनी पुढाकार घेऊन शाळांमध्ये सहजयोग सुरू केल्याच्या कार्याबद्दल पूर्वी वृत्तांत दिलेलाच आहे. त्याच कार्याचा पुढील मोठा टप्पा म्हणजे पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये हे कार्य सुरू करणे.

या कार्यासाठी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांबरोबर संपर्क साधून त्यांना सहजयोग मुलांसाठी कसा उपयुक्त व आवश्यक आहे हे समजावून देण्यात आले. त्यासाठी या विभागातील कर्मचाऱ्यांसाठी एक कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर प्रायोगिक तत्त्वावर निवडक २० शाळांमध्ये सहजयोगपद्धतीची माहिती मुलांना देण्यात आली व तीन-चार आठवडे शाळेत मुलांचे ध्याने घेण्यात आले. हे कार्यक्रम मूल्यशिक्षणाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या वेळेत झाले.

त्याचबरोबर या शाळांतील शिक्षकांना सहजयोगाची जास्त माहिती व मुलांसाठी त्याचे विशेष फायदे याची सखोल माहिती देण्यासाठी त्या शाळांतील शिक्षकांचा एक सेमिनार आयोजित करण्यात आला व त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.


नोव्हेंबर-डिसेंबर '९७ मध्ये हे कार्य झाल्यावर शाळांतील मुले व शिक्षक अशा दोघांकडूनही शिक्षणविभागाला योग्य प्रतिक्रिया मिळाल्या. विशेषतः मुले ध्यानामुळे शांत होत असल्याचे बहुतेक मुख्याध्यापकांचे व शिक्षकांचे मत झाले होते. हा अनुकूल प्रतिसाद मिळाल्यावर महानगरपालिकेच्या शिक्षण-मंडळाकडून पुण्यातील सर्व २३० शाळांमध्ये हा कार्यक्रम राबवण्याची लेखी अधिसूचना सर्व शाळा-मुख्याध्यापकांकडे पाठवण्यात आली. जानेवारी ते मार्च '९९ या अवधीमध्ये हे सर्व कार्यक्रम करण्याची योजना होती.

या मोठ्या प्रमाणावरील कार्यामध्ये एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीने कार्यप्रणाली, ध्यान व कार्यकर्त्यांना सूचना इ.बद्दल मार्गदर्शक पत्रके देण्यात आली. सहजयोगाची माहिती व ध्यान हे मुलांसाठी सोपे जावे हा उद्देश ठेवण्यात आला. अशी एकसूत्री पद्धत ठरवण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये एकवाक्यता निर्माण झाली.

या सर्व शाळांमध्ये सकाळी व दुपारी अशा शाळा भरत असल्याने रोज दोन्ही वेळा शाळांत कार्यकर्त्यांनी जाणे जरूरीचे होते. जानेवारी महिन्यापासून हा कार्यक्रम सुरू झाला आहे व अनेक सहजयोगी व सहजयोगिनी या कार्यामध्ये सहभाग घेत आहेत. प्रत्येक परिपाठामध्ये साधारण २०० ते ४०० विद्यार्थी सहभागी होतात. शाळांमधील शिक्षक वर्गही वेळात वेळ काढून सहजयोगाची सविस्तर माहिती घेण्याबाबत प्रतिसाद देत आहे व त्यांच्यासाठी बहुतेक शाळांमध्ये वेगळे कार्यक्रम घेतले जात आहेत.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या सर्व कार्यात महिला सहजयोगिनींचा पुढाकार व हातभार विशेष करून वाढला आहे. प. पू. श्री माताजींच्या कृपेतच हे कार्य होत असल्याची जाणीवही सर्व सहजयोग्यांना प्रकर्षाने होत आहे.

या सर्व कार्यक्रमाची माहिती, प्रतिसाद व परिणाम शाळा-मुख्याध्यापकांना जाणवत आहे व त्यांनी त्याबद्दल महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडे रिपोर्ट पाठवले आहेत. या कार्यक्रमाची व्याप्ती आणखी वाढवण्यासाठी शिक्षण मंडळाने सहजयोगाची ही उपयुक्तता महाराष्ट्र राज्य सरकारकडे शिफारस करून पाठवली आहे. त्या शिफारसीची प्रत पुढील पानावर दिली आहे. त्याचा पाठपुरावा करून राज्य सरकारची अनुमती मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत.



श्री माताजींच्या पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्या वेळचे सनईवादन

उभे दत्तात्रय मारूतराव
अध्यक्ष,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

© निवास : ३३८७२०
कार्यालय : ३२४२१८
३२२०५१

५६, आयडीयल कॉलनी, सी + डी,
सोमा रेसिडेन्सी, फ्लॅट नं. १७,
कोथरूड, पुणे २९.

दिनांक : 24 FEB 1999

प्रति,
मा.ना.अनिल देशमुख,
शिक्षण राज्य मंत्री,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२

यांसी –

विषय – सहजयोग ध्यान धारणेचा शालेय विद्यार्थ्यांना होणारा लाभ....

महोदय,

आपणास कळविणेत आनंद होतो की, पुणे सहजयोग केंद्र या संस्थेतर्फे यांना सुरुवातीला प्रायोगिक पध्दतीवर तीन चार शाळांमध्ये नैतिक मूल्य मापन परिचयकरिता परवानगी दिली होती. या पध्दतीने ध्यानधारणा केल्यानंतर मुलांमध्ये बराच चांगला फरक दिसून आला. शाळेतील केंद्रप्रमुखांचे निरीक्षण खालीलप्रमाणे आहे.

१. मुलांचे चित्त स्थिर होत असून त्यामुळे एकाग्रता वाढली आहे.
२. मुलांचे दंगा करायचे प्रमाण कमी झाले व त्यामुळे वर्गामध्ये शिस्त आली आहे.
३. मुलांचे वर्तणुकीत चांगला फरक जाणवत आहे.
४. मुलांचे तसेच मुलींच्या तक्रारी कमी झाल्या आहेत. त्यामुळे मुलांचे लक्ष शिक्षकांचे शिकवण्याकडे असते.
५. सर्वांना आत्मचिंतनाची सवय लागली आहे.
६. मुलांचे आरोग्य सुधारले आहे. तसेच मुलांची स्मरणशक्ती वाढली आहे.
७. वर्गांमध्ये मुलांची उपस्थिती वाढली आहे.
८. व्यक्तिमत्व विकास वाढत आहे व एकमेकांशी संबंध सौहार्दाचे होत आहेत.

वरील चांगले रिपोर्टस पाहून पुणे महानगरपालिका कक्षेतील सर्वच्या सर्व २३० शाळांमध्ये सहजयोग ध्यान पध्दतीने ध्यानधारणा चालू आहे व त्याचा फारच चांगला परिणाम दिसून येत आहे. खऱ्या अर्थाने नैतिक मूल्यांचे शिक्षण याध्दारे मिळत आहे व मुलांवेवर चांगले संस्कार घडत आहेत. या योगे भावी पिढीचा व्यक्तिमत्व विकास निश्चितच होईल, याबद्दल मला शंका नाही.

आपले माहितीसाठी सदर बाब सादर करीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

( दत्तात्रय उभे )

# श्री गणेश पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश) कबेला : सप्टें. ९८

श्रीगणेशांना समजून घेण्यासाठी सर्वप्रथम पावित्र्याचे महत्त्व लक्षात घ्यायला हवे. ही गोष्ट फक्त स्त्रियांनाच लागू आहे असे नाही तर पुरुषांच्या बाबतीतही पावित्र्याला तितकेच, किंबहुना जास्त महत्त्व आहे. तुम्हाला आत्मसन्मान असेल तर पावित्र्य सांभाळणे मुळीच अवघड नाही. तसे नसेल तर तुम्ही अगदी हलक्या, अवनतीकारक गोष्टींच्या मागे लागाल. म्हणून **पावित्र्य समजणे, लक्षात ठेवणे आणि त्याचे पूर्ण पालन करणे फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी योग्य ते प्रोटॉकॉल पाळलेच पाहिजेत आणि आपण श्रीगणेशांच्या स्थितीला आल्यावर भलत्या सवयींना बळी पडणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.** लोक पावित्र्याचा आदर का करू शकत नाहीत मला समजत नाही. आजकाल तर या पावित्र्याची सर्व प्रकारे विटंबना होत असल्याने परिस्थिती फार गंभीर बनत चालली आहे.

पाश्चात्य देशांमध्ये मुलांच्या बाबतीत विशेष करून फार अन्याय केला जात आहे. पूजेच्या या मंगल समयी ज्या घाणेरड्या रोगांनी लोकांना पछाडले आहे त्यांचे नाव घेणेही बरोबर वाटत नाही. भारतात अशा घटना ऐकूसुद्धा येत नाहीत. काही थोडे फार लोक या गैर प्रकारात स्वतःचे नुकसान करून घेत असले तरी त्यांना पकडून तुरुंगात डांबून ठेवतात.

**सहजयोग्यांनी आपल्या पावित्र्याबद्दल जागरूक असणे फार जरूरीचे आहे.** मी कालच सांगितले की प्रत्येक विवाहेच्छु, पुरुषाने वा स्त्रीने आपणहून आपल्यासाठी मुलगी वा मुलगा शोधण्याची गरज नाही. कारण तसे करणेही पवित्र्याच्या मर्यादांचे उल्लंघन आहे. तुमच्या आई-वडिलांनीच तुमचा विवाह निश्चित करावा असे मी म्हणत नाही पण तुम्ही सहजयोगी आहात आणि म्हणून सहजयोगातच या गोष्टी घडू देत. कारण तुम्हाला श्रीगणेशांसारखे बनवले आहे आणि तेच येशू-खिस्तांच्या रुपात पृथ्वीवर अवतरले होते. म्हणून पवित्र्याबद्दल तुमचा दृष्टिकोन कसा असायला हवा हे समजणे फार महत्त्वाचे आहे. **सर्वप्रथम लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे आपण स्वतःच आपल्या पावित्र्याचे जतन केले नाही तर सहजयोग सांभाळणे फार अवघड आहे आणि अशा वागणुकीमुळे सहजयोगाचे आशीर्वादही तुम्हाला मिळायला हवे तसे मिळणार नाहीत.** काल रुमानिया आणि युक्रेनमधील सहजयोगी फार सुंदर गात असलेले तुम्ही पाहिले. याचे एक कारण म्हणजे स्वभावतः ते फार नम्र लोक आहेत. त्यांनी आपल्या पूर्वीच्या आयुष्याबद्दलच्या सर्व चुकीच्या कल्पना टाकून दिल्या आहेत. म्हणून नम्रतेमधूनच आपण आपला आत्मसन्मान करायला शिकत असतो. इस्लाममध्ये तर पावित्र्याला खूपच महत्त्व दिले आहे. पुढे ते इतके पराकोटीला गेले की पुरुष वेश्यांकडे जाऊ नयेत म्हणून मोहम्मदसाहेबांनी एका पुरुषाला चार-पाच लग्नाच्या बायका ठेवण्याची परवानगी दिली. वेश्या-व्यवसायात एकदा पडल्यावर त्या बायकांना अनिर्बंधपणे वागण्याची मुभा मिळते. त्यामुळे समाजातल्या उच्च-भ्रू लोकांवरही परिणाम होत गेला आणि येशू-ख्रिस्तांनी केलेल्या उपदेशाची त्यांना काही किंमत वाटेनाशी झाली आणि आपण वाटेल तसे वागायला स्वतंत्र आहोत असे त्यांना वाटू लागले. त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या महिलांबरोबर ते मनास येईल तसे वागू लागले. पण असे लोक उघडपणे किंवा दुसऱ्या कसल्या प्रकारे असे व्यभिचार करतात हे श्रीगणेश बघत असतात आणि त्याची त्यांना व्यवस्थित शिक्षा करतात. अशा प्रकारे वागणे ही एक भयानक गोष्ट आहे आणि सहजयोगात अशा लोकांना स्थान नाही. सहजयोग्यांनी सर्वप्रथम भरकटणारी नजर रोखली पाहिजे. आणि त्याचा घनिष्ट संबंध ख्रिस्तांच्या शक्तीबरोबर आहे. बहुतेक ख्रिश्चन धर्मीय देशांमधील लोकांची नजर भरकटणारी असल्याचे मला दिसते. येशू ख्रिस्तांना ते मानतात, त्यांची पूजा करतात आणि तरीही त्यांची दृष्टी सगळीकडे भरकटत असते. हा आश्चर्यकारक विरोधाभास आहे. अशी भरकटणारी नजर ख्रिस्तांच्या पावित्र्याचे प्रतीक कधीच होणार नाही.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमच्यामध्ये सूज्ञता असेल तरच श्रीगणेशांची शक्ति तुमच्यामध्ये कार्यान्वित होते व प्रचीतीला येते. श्रीगणेशांकडूनच तुम्हाला सूज्ञता मिळालेली आहे. पण मोठा प्रश्न असा आहे की लोकांना सूज्ञता म्हणजे काय हे नीट समजत नाही. बौद्धिक क्षमता आणि सूज्ञता या अगदी वेगळ्या गोष्टी आहेत. बुद्धीवादी चलाख असतात, आक्रमक प्रवृत्तीचे असतात, तसेच कधी कधी अहंकारी असतात; त्यांना आपण फार यशस्वी लोक असल्याचा भ्रम असतो. लोकांना फसवण्यामागे ते असतात. लोकांना चुकीच्या गोष्टींबद्दल भारावून टाकतात. सहजयोगामध्ये या गोष्टींना वाव नाही. **सहजयोगात यशस्वी होणे म्हणजे सूक्ष्मतत्वांत उतरणे व आत्मज्ञानाच्या प्रकाशाचे तेज बाणवणे आणि सहजयोगाला समर्पित होणे. नियमितपणे ध्यान केल्याशिवाय ही स्थिति मिळत नाही. म्हणून ध्यान करणे हे फार महत्त्वाचे आहे. जे लोक ध्यान करत नाहीत त्यांना सहजयोगांतून काहीही मिळणार नाही कारण तुमच्या स्वतःच्या आतमधील प्रेरणांमधूनच ही सूज्ञता तुमच्यामध्ये प्रस्थापित होणार आहे. आणि हे सर्व श्रीगणेशांची शक्ति कार्यान्वित झाल्यावरच होणार**

आहे. त्याच्याकडूनच तुम्हाला सूज्ञता मिळत असते. सूज्ञतेमध्ये घटित होणारी गोष्ट म्हणजे तुम्हाला समस्यांवर उपाय सापडतो आणि हा उपाय शांति, समाधान व प्रसन्नता देणारा असतो. त्याप्रमाणेच श्रीगणेश तुम्हाला शिक्षाही करत असतात. काल जोराचे वादळ आले. लोकांची गडबड झाली, एक तंबू उखडून गेला. खरे तर या हवामानामध्ये तंबूची गरजच काय मला समजत नाही पण काही लोकांना तंबूशिवाय दुसरे काही चालत नाही. उघड्यावर आरामात झोप चांगली लागते, इथे येताना तंबू व सगळा बाडबिस्तरा आणण्याची गरज नाही. आपली गैरसोय होईल, आरामदायक रहायला मिळणार नाही वगैरे गोष्टींची फिकीर व चिंता करू नये. तुम्हाला सर्व तऱ्हेच्या सुखसोयी व आरामच हवा असे वाटत असेल तर सहजयोगाला तुमचा काहीही फायदा नाही. पूर्वीच्या काळी हिमालयात जाऊन, एका पायावर उभे राहणे वगैरे तपश्चर्या करणाऱ्या साधकांनाही आत्मसाक्षात्कार मिळाला नाही. पण तो तुम्हाला तो विनासायास मिळाला आहे. म्हणून स्वतःच्या या श्रीमंत चैनीच्या प्रवृत्ती आता सोडून द्यायला हव्या. सुख-आरामाच्या मागे लागण्यात काहीही अर्थ नाही. मी या वयातही कुठल्याही ठिकाणी कसल्याही परिस्थितीत आरामात राहू शकते. म्हणून मी म्हणते की संन्याशाच्या जीवनपद्धतीचे नुसते अवलंबन न करता संन्यासी बनण्याचा प्रयत्न तुम्ही करायला हवा मग तुम्हाला या लहान-सहान बाह्य गोष्टींची पर्वा वाटणार नाही. अडचण ही आहे की आपल्या प्रवृत्ति, विचार, सवयी इ. सर्वांवर आजूबाजूच्या जीवनपद्धतीचा प्रभाव पडतो; आपण आपल्या स्वतःच्या जगामध्ये राहू शकत नाही आणि फॅशन, स्टाईल इ.च्या मध्ये अडकून राहतो व त्याचा परिणाम म्हणून सूज्ञता गमावून बसतो. मी कुणालाही ही फॅशन करा, ती फॅशन करा असे सांगत नाही कारण त्यांच्या-त्यांच्या सूज्ञतेमधूनच त्यांना ते शिक्षण मिळणार आहे. **सूज्ञता हीच तुम्हाला तुमचे जीवन योग्य कसे ठेवायचे याचे मार्गदर्शन करत असते.** तुम्ही इथे अध्यात्मिक उन्नती मिळवण्यासाठी आला आहात एका विशिष्ट स्तरावर पोचण्यासाठी आला आहात.

मी पुन्हा एकदा सूज्ञतेच्या शक्तीबद्दल बोलणार आहे. काहीही करण्याच्या आधी तुम्ही स्वतःमधील सूज्ञतेचे स्मरण करा व जे काय करणार आहात ते तुमच्यासाठी योग्य आहे की नाही याचा विचार करा. ही सवय झाली की तुमचा उतावळेपणा खूप कमी होईल, तुम्ही शांत व्हाल. तसेच स्वतःला दोषी समजण्यात शहाणपणा नाही हेही तुमच्या लक्षात येऊन तुमची अपराधीपणाची भावना नाहीशी होईल. दुसरी गोष्ट म्हणजे तुम्हाला "मला हे पाहिजे, ते मिळवायचे आहे, अमूक-तमूक गोष्टी हव्या" इ. लालसा, जी फार वाईट सवय आहे, असते पण एकदा या गोष्टींमधील फालतूपणा सूज्ञतेतून समजल्यावर या वासना क्षीण होतील. नाही तर तुम्ही सतत माझा, माझी प्रकृती, माझे घर, माझी मुले इ. अनेक 'मी'पणाच्या लालसेत गुंतून रहाल. सूज्ञतेच्या गहनतेतून तुम्हाला समजते की माझे-माझे म्हणतो ते खरं तर माझे नाहीच. मी एकटा जन्माला आलो आणि शेवटी एकटाच जाणार हे समजते. ही सूज्ञता तुम्हाला आतमधूनच जाणवली पाहिजे. त्यासाठी बाह्यातून काही करून उपयोग होत नसतो. मग तुम्हाला शुद्ध आनंद प्राप्त होतो, जो श्रीगणेशाच्या नृत्यामधून जाणवतो. श्रीगणेश बालकासारखे असल्यामुळे नृत्याचा निर्मळ आनंद उपभोगतात आणि तोच आनंद तुम्हालाही प्राप्त होतो. मग तुम्हीही एक बालक बनता. लहान मुलाला कसलीही हाव, लालसा नसते. उलट ते दुसऱ्याबरोबर वाटून घेत असते. ही स्थिति म्हणजेच तुम्ही 'गण' झाल्याची स्थिति– श्रीगणेशाचे शिपाई. त्यांना सर्व शक्ति परमेश्वराकडून मिळालेली असते. आणि ते जगभर श्रीगणेशाचे कार्य करत असतात.

श्रीगणेश ॐकारच आहेत. देवीने सर्वप्रथम देवता बनवली ती श्रीगणेश. कारण तिला मंगलता हवी होती. त्यासाठीच श्रीगणेशांची निर्मिती केली. तुमच्यामध्ये मंगलता आहे ती श्रीगणेशांमुळेच. काही लोकांना काही ना काहीतरी करून प्रॉब्लेम बनवण्याची सवय असते. असे लोक auspicious नसतात. जे लोक शांति व प्रेम पसरवतात त्यांना श्रीगणेशाचे आशीर्वाद मिळतात. तुमच्यामधील सूज्ञतेचा तुम्ही शोध घ्या. लहान-सहान गोष्टींवरून तुम्ही चिडचिडता किंवा अस्वस्थ होता. याचे कारण तपासून पहा. किंवा एकमेकांमध्ये भांडणे करता. मारामाऱ्या करता हे का होते? असे होण्याचे कारण म्हणजे तुमच्यामधील श्रीगणेश जागृत झालेले नाहीत; किंवा त्यांची शक्ति तुमच्याबरोबर नाही. अशा वागण्याला शहाणपण म्हणत नाही. जगामध्ये जे थोर महान पुरुष होऊन गेले, ज्यांच्याबद्दल शतकानुशतके लोकांना आदर आहे ते फार सूज्ञ होते; त्यांना कधी राग येत नसे, त्यांना कसली लालसा नव्हती, कसल्याही भौतिक गोष्टींच्या ते मागे लागलेले नव्हते. इतर लोकांसारखे जे लालसा व हाव यांच्यामध्येच आयुष्यभर झगडत राहिले, हे लोक नव्हते, म्हणून



प. पू. श्री माताजींच्या पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्यावेळी कव्वालीचा कार्यक्रम ऐकताना

अशा निम्नस्तर लोकांची पुढच्या पिढ्यांना आठवणही होत नाही.

**तुम्हा सहजयोगींच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्हीसुद्धा सर्व मानवजातीचा उद्धार करण्यासाठी सहजयोगात आहात. म्हणून तुमचे ध्येय अध्यात्मिक गहनता मिळवणे हेच असले पाहिजे. हे तुम्हालाही माहीत असेलच. त्यासाठी तुमचे चित्त सतत आतमध्ये, स्वतःकडे असले पाहिजे.** कसलीही भीती बाळगू नका. या सर्व सूचना तुम्हाला सूज्ञ बनण्यासाठीच आहेत. तारतम्य ठेवण्यासाठी आहेत. जे लोक फक्त स्वतःच्या सुखसोयींबद्दल तारतम्य ठेवतात किंवा स्वतःसाठी पैसा, आरोग्य याच्याबद्दल Sensible असतात त्यांना सूज्ञ (Wise) म्हणता येणार नाही. एखाद्या चांगल्या संस्कारात वाढलेले लहान मुलाला पाहिले तर दिसते की तो नेहमी दुसऱ्याबद्दल काळजी घेत असतो, दुसऱ्याला काय कमी आहे, काय केल्याने दुसऱ्याला सुख मिळेल इकडे पहात असतो व साध्यासुध्या गोष्टींमधून दुसऱ्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करत असतो. त्यात त्याचा काही स्वार्थ किंवा फायदा नसतो तसेच आपल्या दानीपणाचे प्रदर्शनही त्याला करायचे नसते तर तो खऱ्या अर्थाने प्रामाणिक असतो. यालाच सामूहिकता म्हणतात.

तुमच्यामधील ही सामूहिकता श्रीगणेशांकडून कशी बळकट होते याबद्दल आज मी तुम्हाला विशेष करून सांगणार आहे. कुणी म्हणाले होते की आईनस्टाइनने असेच काहीतरी सांगितले होते की तुम्ही सर्वजण थंड चैतन्याचा अनुभव घेऊ शकलात तर ते श्रीगणेशांच्याच कृपेने शक्य होते. मग आपण सर्वजण एक होतो. अशी ही थिअरी आहे. इथेही एका शास्त्रज्ञाने सिद्ध केले आहे की तुम्ही जेव्हा शांत (Cool) होता तेव्हा सर्व अणु-परमाणू एकत्रितपणे वाहतात. एरवी तसे नसून वाहताना ते एकमेकांवर आदळत असतात. त्याचप्रमाणे आपल्याला श्रीगणेशांचे आशीर्वाद मिळून त्यांची शक्ति आपल्यामध्ये कार्यान्वित झाल्याचे आपल्याच सूज्ञतेमधून आपल्याला समजले की तुम्ही सहजयोगी म्हणून एका उच्च स्थितीला येता. असे सहजयोगी एक (सामूहिक) होतात, म्हणजे ते एकमेकांसाठीच जगतात, एकमेकांचा आनंद लुटतात, एकमेकांच्या सुखसोयी पाहतात. या अर्थाने श्रीमंत-गरीब, निरोगी-आजारी असे भेदभाव संपून सर्वजण एकाकार होतात. समारंभासाठी एकत्र जमलेल्या सहजयोग्यांमध्येही ही एककारिता दृष्टीस पडते, कसलेही काम पडले तरी ते करायला प्रत्येकजण तत्पर असतो. असे आनंदात असलेले सहजयोगी पहायला मलाही आवडते. ते आपापसामध्ये कुणालाही दुखावणार नाहीत. उलट एकमेकांना मदत करण्यासाठी सदैव पुढे येतात. **मी नेमलेले बरेचसे लीडर्स असे सूज्ञ आहेत, ते प्रश्नांची गुंतागुंत होऊ देत नाहीत, ते प्रसंगांमध्ये गांगरून जात नाहीत आणि आपल्यापैकी सहजयोगाच्या विरोधात कार्य करणाऱ्यांना जाणतात.**

ही एकाकारिता मिळवण्यासाठी तुम्हाला आतमध्ये खोलवर (गहनता) गेले पाहिजे. तसे झाल्यावरच तुम्ही सर्व एकच असल्याचा अनुभव तुम्हाला येईल. इथे, जपान-अमेरिका असे दूर-दूर असलात तरीही ही एकाकारिता तुम्हाला जाणवेल. मग तुम्हा सर्वांची विचार-धारणा एकच होईल, तुम्ही एकाच कार्याला मदत कराल आणि समान जीवन व्यतीत कराल. पूजेला आलेल्या अनेक लोकांना एकमेकांबरोबर आनंदाने असलेले मला दिसते, एकमेकांची काळजी करताना मी पाहते. समजा एखाद्या रशियातील सहजयोग्याला काही प्रश्न असेल तर मला अमेरिकेतील सहजयोग्याचे त्या रशियातील व्यक्तीला अमेरिकेत पाठवण्यास सांगा असे पत्र येते. हे बरेच वेळा घडले आहे; मी त्याच्यापैकी कुणाला काही सांगत नाही, बोलतही नाही आणि जरी एखाद्या वेळी असे काही नुसते बोलले तरी कितीतरी लोक मदतीला आपणहून पुढे येतात. दुसऱ्या देशात जाऊन कार्य करायचे असेल तरी मी म्हटल्यावर लोक पुढाकार घेतात. अर्थात मी अशा गोष्टी काही समजदार लोकांनाच करायला सांगते. याच एकाकारितेच्या भावनेमधून काही लोक जेरूसलेमला तेथील लोकांना मदत करण्यासाठी गेले. मलाही जेरूसलेमला जायची इच्छा होती पण तेथील अतिरेक्यांच्या कारवायांमुळे ते जमले नाही. नंतर जेरूसलेममधील सहजयोग घेतलेले लोक ईजिप्तमध्ये तेथील मुसलमान लोकांना मदत करण्यासाठी गेल्याचे मला समजले. मला या गोष्टीचे फारच आश्चर्य वाटले. मुसलमान लोकांबरोबर त्यांना मैत्री बनवावीशी वाटली. अशी निरपेक्ष मैत्रीची भावना होणे हे एकाकारितेचे लक्षण आहे. सहजयोग्यांच्या सहवासात तुम्हाला नुसते समाधान वाटते. एवढेच नव्हे तर आणखी सहजयोग्यांना आपल्यात आणावेसे तुम्हाला वाटते. प्रकाश मिळालेल्या एका व्यक्तीला दुसऱ्या तोच प्रकाश मिळालेल्या व्यक्तीच्या भेटीगाठीतून आनंद मिळत असतो. दुसऱ्याला जागृति देणे ही पण फार समाधान देणारी गोष्ट असते. **पण नवीन-नवीन लोकांना जागृति देतानाही आपला अहंकार वाढणार नाही याची काळजी घ्या; कारण तसे झाले तर ते श्रीगणेशांच्या विरोधात जाईल;** ख्रिस्तानाही अहंकारी लोक आवडत नसत; नवीन नवीन लोकांना जागृति देऊन आपला ग्रुप बनवायचा आणि इतरांवर मोठेपणा दाखवायचा हे त्यांना पसंत नव्हते. श्रीगणेश आणि ख्रिस्त एकच आहेत, एकाकार आहेत; तशीच एकाकारिता आपल्यामध्ये घडवून आणली पाहिजे. मग तुम्ही लौकिक धर्म विसरून जाता; नाही तरी धर्मांच्या नावाखाली लोक एकमेकांत मारामाऱ्या करत असल्याचे तुम्ही पाहताच, वर्तमानपत्रांतूनही त्यांच्या कारवायांच्या, अप्रमाणिकपणाच्या बातम्या येतात. थोडे दिवस त्यांची चलती झाली तरी अखेर त्यांचे पितळ उघडे पडणार आहे आणि तीच वेळ आता आली आहे. धर्मा-धर्मांमधील वरचढपणाच्या सर्व कल्पना नाहीशा व्हायलाच हव्या. सर्व धर्म श्रीगणेशांच्या मांगल्यशक्तीतूनच आलेले असल्यामुळे एकच धर्म इतर धर्मांपेक्षा चांगला कसे होणार? एकाकारिता आल्यावर धर्मा-धर्मांबद्दलच्या उच्च-नीचपणाच्या सर्व कल्पना फोल ठरून गळून जातात. हे सर्व उच्च-नीच भाव मानवानेच निर्माण केले. उदा. अमेरिकेत काळे-गोरे या वादामध्ये खूप धुमाकूळ चालला आहे.

भारतामध्येही पूर्वी काही लोक अस्पृश्य जातीचे समजले जात. त्यांचा खूप छळ झाला. पण हे भेद कुठल्याही शास्त्राने मानलेले नाहीत. आज तेच अस्पृश्य उच्चवर्णीयांच्या विरोधात वागत आहेत. **श्रीगणेशां- कडून सूज्ञता मिळाल्यावर तुम्हाला समजून येते की माणसा-माणसांमध्ये उच्चनीच हा फरकच मुळात नसतो; सर्वांना परमेश्वरानेच निर्माण केले म्हणून सर्व एकसारखेच आहेत. एकदा हे समजल्यावर ही एकाकारिता व्यापक होते**. ही काही विशेष वेगळी किंवा समाजसुधारकांची भाषा नसून ते तुमच्या अंतःकरणातूनच बाहेर व्यक्त होते. पण प्रथम ही एकाकारिता कुटुंबामधून सुरू झाली पाहिजे. ज्या कुटुंबात एकवाक्यता नसते त्यातील मुलांमध्ये एकाकारिता प्रस्थापित होणार नाही. म्हणून मी सांगत असते की कुटुंबामध्ये भांडण-तंटा, वादा-वादी असता कामा नये, जिथे अशी परिस्थिति असते तिथून बाहेर पडणे चांगले, त्यासाठी आम्ही घटस्फोट मान्य केला आहे. जिथे एखादा पुरुष बाहेर -- करणारा असतो त्याला सहजयोगांतून बाहेर काढले जाते. कारण अशा एका व्यक्तीमुळे इतर जण खराब होतात. असा पुरुष किंवा स्त्री सहजयोगात कुटुंब-व्यवस्थेच्या स्थिरतेच्या दृष्टीने राहणे योग्य नाही. सहजयोगी म्हणून तुमची ही जबाबदारी आहे की तुमचे कौटुंबिक नाते-संबंध आदर्श व निष्कलंक असले पाहिजेत. कुटुंबातील जोडीदाराबरोबर तुम्ही आनंद मिळवू शकत नसाल तर तुम्हाला आनंद कधीच, कुठेही मिळणार नाही. श्रीगणेशांना प्रसन्न न ठेवल्यामुळेच पती-पत्नीमध्ये संबंध बिघडतात, श्रीगणेश प्रसन्न असले की पती-पत्नीमध्ये पूर्णपणे सलोखा व प्रेम राहतेच. म्हणून स्वतःमधील श्रीगणेश आधी ठीक करा आणि मग दुसऱ्यांकडे पहा.

तुम्हाला श्रीगणेशांचे खूप ध्यान करायला हवे. जमिनीवर बसून खूप ध्यान करा. तुम्ही भूमातेपासून दूर जाता, तिला स्पर्श न करता तिचा आदर ठेवत नाही याचाच अर्थ तुम्ही श्रीगणेशांचाही अनादर करता. त्यांची निर्मितीच मुळी भूमीमधून झाली आणि तेच या भूमातेचे नियंत्रण करतात; साऱ्या पंचमहाभूतांचेही तेच नियंत्रण करतात आणि तुमच्यावरही तेच नियंत्रण ठेवतात. काल आपण एक सुंदर सिनेमा पाहिला त्यातही श्रीगणेश एका माणसाबरोबर फिरत आहेत व त्याला 'हे करू नको' असे सारखे सांगत आहेत असे दाखवले आहे. आणि त्यांचे न ऐकल्यामुळेच लोकांना दुर्धर आजार होतात, तुम्हाला कौटुंबिक तसेच राष्ट्रीय अडचणी येतात. म्हणून सर्व अमंगल मंडळींपासून दूर रहा. लहान मूल पाहिले, नुसता त्याचा फोटो जरी पाहिला तरी मनाल लगेच प्रेम वाटू लागते. पण काही लोकांना दोन-तीन वर्षांच्या मुलाचाही त्रास वाटतो. मुलांबद्दल जर तुमच्या मनात आदर नसेल तर तुम्ही श्रीगणेशांना कसे समजणार? लहान मुले किती सुंदर असतात. ते तुम्हालाच नव्हे तर मलाही ओळखतात कारण त्यांच्यामध्ये प्रेम जाणण्याची उपजत भावना असते. प्रेम ही भावना अहंकारी लोकांना समजायला अवघड जाते, कारण त्यांचे दुसऱ्या कुणावर नाही तर फक्त स्वतःवरच प्रेम असते आणि ते दुसऱ्यावर प्रेम करतात तेव्हा त्यांच्यामध्ये काहीतरी स्वार्थ लपलेला असतो. **श्रीगणेश तुमच्यामध्ये ठीक असले तरच प्रेम ही भावना तुम्ही समजू शकता.**

तुम्ही आजपर्यंत इतक्या चांगल्या स्थितीला आला आहात, जगात सगळीकडे खूप सहजयोगी आता झाले; मी पण तुमच्या सर्वांसाठी खूप कष्ट घेतले असले तरी तुम्ही पण मला खूप आधार दिलात, त्याबद्दल मी तुमची आभारी आहे. विशेषतः या पाश्चात्य देशांमध्ये, जेथे श्रीगणेश-तत्त्वाचे काहीही आचरण वा संबंध नाहीत त्या ठिकाणीही तुम्ही लोकांनी सहजयोग पत्करला आणि त्याच्यात इतक्या चांगल्या स्थितीला आलात ही फार मोठी गोष्ट आहे. सहजयोगामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही श्रीगणेश-शक्ति. तुमच्यामधील श्रीगणेश ठीक असले तर कुणीही तुम्हाला धक्का लावू शकणार नाही, तुमचे नुकसान करू शकणार नाही, कुणीही तुम्हाला अस्वस्थ करू शकणार नाही कारण **तुम्हाला शांति प्रदान करणारे श्रीगणेशच आहेत.** आजकाल जगात सर्वत्र अशांति माजली आहे याचे कारणही श्रीगणेशांचा आदर केला जात नाही हेच आहे. मी खूप मोठे लोक पाहिलेत; कुणी अमक्या संस्थेचा मुख्य, कुणी लष्कराचा अधिकारी पण कुणालाही श्रीगणेशांचे काही देणे-घेणे नाही, खरे तर त्यांच्यामधील गणेशतत्त्व फार बिघडून गेले आहे. अशा मोठ्या लोकांचा, नेत्यांचा काही उपयोग नाही पण लोक त्यांच्या मागे लागतात. ते गुपचुपपणे काही कारस्थाने करत असतील पण लोक ते जाणतील; कारण तुम्ही मांगल्य ठेवले नाही तर सर्व जगाला आज ना उद्या ते कळणारच. सत्ययुग आल्यामुळे या साऱ्या अनिष्ट गोष्टी उघड होणार आहेत. आपल्या हृदयातच सत्याचा प्रकाश आल्यामुळे त्या प्रकाशातच हे घाणेरडे प्रकार नष्ट होणार आहेत.

**सत्य हाही एक श्रीगणेशांचाच गुण आहे. येशू ख्रिस्तांच्याद्वारे ते आपल्या मेंदूमध्ये सत्यावर प्रकाश आणतात**. ख्रिस्तांनी एवढे महान कार्य केले, कष्ट घेतले पण आता त्यांचेच अनुयायी म्हणणाऱ्या लोकांकडे पहा. म्हणून आपण हे दाखवू या की श्रीगणेश आणि ख्रिस्तांच्या मार्गाने आपण गेलो तर आपणच आपले व्यक्तिमत्त्व अध्यात्मिक जीवनाच्या उंच पातळीवर आणू शकतो. त्यातच अध्यात्मिकतेचा सारा आनंद सामावलेला आहे जो दुसऱ्या कशानेही मिळण्यासारखा नाही. बाकी गोष्टी तात्पुरते समाधान देतील, मोठेपणा मिळेल पण **श्रीगणेश-शक्ती ही एकच शक्ती जीवनाच्या सर्वांगातून शांति व आनंद प्रदान करणारी आहे. श्रीगणेश आपल्या सर्व चक्रांवर जागृत होतात आणि सर्व चक्रे ठीक होऊन तुम्ही तो आनंद मिळवता जो श्रीगणेशांनीच वरदान म्हणून दिलेला असतो.** आजकाल लोक बरीच घाणेरडी पुस्तके लिहीत आहेत तसेच काही चांगले लोक श्रीगणेशांची सूज्ञता व मांगल्य या तत्त्वांबद्दल लिहीत आहेत; काहीजणांनी श्रीगणेशांबद्दल फार गोड गोष्टीही लिहिल्या आहेत. आजपर्यंत प्रेमकथा खूप झाल्या पण आता त्याच्यापलीकडील काही लेखन व्हायला हवे, तेच श्रीगणेशतत्त्व आहे; त्याच्यात आनंदच आनंद आहे. आणि शुद्ध प्रेमाची समज आहे. ज्या व्यक्तीकडून तुम्हाला शुद्ध प्रेम मिळते

त्याला नीट समजून घेतले पाहिजे. आपल्यामध्येही काही श्रीगणेश-तत्त्वाप्रमाणे न वागणारे लोक आहे, म्हणूनच आपल्याला काही त्रास झाले तर शुद्ध हृदयातून व शुद्ध मनाने तुम्ही श्रीगणेशांकडे आशीर्वाद मागितले तर ते द्यायला ते सदैव तयार असतात. पण जर तुम्ही त्यांची पर्वा केली नाही आणि पावित्र्य जपले नाही ते तुमची गय न करता तुम्हाला शिक्षा करतीलच. त्यांच्याजवळ क्षमा नाही, ख्रिस्तांच्या रूपामध्ये त्यांनी क्षमा सांगितली. पण क्षमा म्हणजे काहीही केले तरी क्षमा करायची असाही अर्थ नाही तर ती एक नियंत्रण करणारी शक्ति आहे. ख्रिस्तांनी क्षमा करायला सांगितले तरी श्रीगणेश एका सीमेपर्यंत तसे करतात व त्याच्या पलीकडे गेल्यावर मात्र शिक्षाच देतात; त्यांना वाईट लोकांना उघडकीस आणून शिक्षा करावीच लागते. म्हणून ख्रिस्तांनी क्षमा शिकवली हे त्यांची महानता पण श्रीगणेश क्षमेची सीमा दाखवतात. म्हणूनच त्यांच्या हातात एक शक्तीशाली आयुध आहे. आत्मसाक्षात्कारानंतर अनुभवास येणारे थंड चैतन्यही श्रीगणेशांच्या कृपेमधूनच मिळते. तेच तुम्हाला शांत करतात. त्यानंतरच एकाकारिता प्रस्थापित होते. मग आपल्या देशांतील वाईट गोष्टीसुद्धा स्वदेशाभिमान असूनही आपल्याला समजतात आणि त्या सुधारण्याचा तुम्ही प्रयत्न करता. सत्ययुगाचे हे एक मोठे वैशिष्ट्य आहे, वाईट गोष्टी उघडकीस येतात आणि चांगल्या गोष्टींचा स्वीकार करायचे धैर्य तुम्हाला मिळते आणि तुमच्यासारखे लोक एक होतात. अशा समूहांच्या कल्पना एकच असतात, विचार एकच असतात आणि सर्वजण एकाच आनंदाचा उपभोग घेतात. ही एकाकारिता तुमच्यामध्ये पूर्णपणे प्रस्थापित व्हायला हवी. जे सहजयोगी पैसा कमवण्याच्या मागे असतात किंवा स्वतःभोवती लोक गोळा करण्याच्या नादात असतात त्यांना हे जमणार नाही; तसेच जे लोक स्वतःसाठी नवरा/बायको शोधण्याच्या प्रयत्नात राहतात त्यांनाही जमणार नाही.

ही अध्यात्मिक प्रगति नम्रपणामधूनच होते. श्रीगणेशांची नम्रता त्यांनी लहानपणी आपल्या मातेच्या भोवती फेरी मारुन पृथ्वी-प्रदक्षिणा करण्याची शर्यत भावाबरोबर जिंकली होती त्या कथेमधून दिसून येते. त्यांच्या दृष्टीने भूमातेपेक्षाही आपली आई मोठी होती. ते वाहन म्हणून उंदराचा उपयोग करतात त्यातूनही त्यांची नम्रताच दिसून येते. पहिल्या कथेमधून हेही दिसते की वेग हा यश मिळवण्याचा उपाय नाही. त्याबरोबरच सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट कोणती आहे हेही समजून घेतले पाहिजे. या कथेतही मातेवर प्रेम करणे, तिचा आदर करणे व तीच सर्वश्रेष्ठ आहे हे समजणे ही महत्त्वाची गोष्ट. याच दृष्टीने श्रीगणेश आपल्यामध्ये प्रकट होतात. हे झाले की तुमची अध्यात्मिक प्रगति होतच राहते. मला आशा आहे की तुम्ही श्रीगणेशांना आता नीटपणे आपल्यामध्ये प्रस्थापित कराल आणि एकाकारिता बळकट बनवाल.

सहजयोग्यांनी मला त्यांच्या लीडरबद्दल किंवा दुसऱ्या सहजयोग्याबद्दल तक्रारवजा पत्र पाठवलेले मला आवडत नाही. हे योग्य नाही; त्याची जरूरही नाही. त्यापेक्षा तुम्ही क्षमाशीलता बाळगून एकमेकांत 'एक' बनून रहा. जास्त लोकांना तुमच्याबरोबर आणा; कुणालाही बेकार न समजता त्यांना एकत्र आणा. क्षमा आणि पावित्र्य वाढवले की सर्व काही सुरळीत होत जाईल. वेगळेपणाची भावना, जी असुरक्षित मानसिक भावनेतून निर्माण होते, सोडून द्या. जे लायक नसतील त्यांच्याकडे श्रीगणेश बघतील आणि त्यांना बाहेर ढकलतील. म्हणून तुम्ही त्यांच्यामुळे विचलित होऊ नका आणि 'एक' होण्याचा प्रयत्न करत रहा.

मला आशा आहे की तुम्ही जास्त ध्यान करून तुमच्यातील श्रीगणेश-तत्त्व विकसित करण्याचा प्रयत्न कराल, आणि तुमचे पावित्र्य व शांति मजबूत बनवाल.

परमेश्वराचे सर्वांना अनंत आशिर्वाद



पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्या वेळेस श्री माताजी स्टेजवर येताना

# सहजयोग : सुक्ष्मता व गहनता

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे प्रवचन (सारांश) दिल्ली : १६ डिसें. ९८

एवढ्या थंडीमध्ये आणि अनेक असुविधा असूनही तुम्ही सर्वजण इथे आलात याचा एक माता म्हणून मला फार आनंद व समाधान वाटत आहे. दुसरा कुठला सोयिस्कर दिवस जमत नव्हता म्हणून तुमच्यासाठी गैरसोयीचा असूनही हाच दिवस ठरवण्यात आला. विमानतळावर माझे नीट दर्शन झाले नाही असे बऱ्याच लोकांचे म्हणणे होते; मला पण त्यावेळी तुमच्याकडे जास्त लक्ष देता आले नाही. म्हणून आज तुम्ही सर्वजण इथे जमलात हे फार छान झाले, दिल्लीवाल्यांचा अशा कार्यक्रमाबद्दलचा उत्साहही वाखाणण्यासारखा आहे; असाच उत्साह सगळीकडे मिळाला तर हा भारत देश एक दिवशी सहजयोगाचे महाद्वार बनेल. (टाळ्या)

सध्याचा काळ हा एक घोर कलियुग म्हणावा लागेल. कलियुगाचे एक वैशिष्ट असे की माणूस चटकन् भ्रांतिमध्ये अडकतो, त्याचा सारासार विवेक काम करेनासा होतो आणि त्या भ्रांतीमुळे तो कुठे भरकटत राहतो त्याचे त्यालाच कळत नाही. आजकाल लोक वाट्टेल त्या पुढाऱ्यामागे लागतात, चुकीच्या गोष्टींना बळी पडून त्यांचा स्वीकार करतात आणि आपलेच नुकसान करून घेतात, धर्माचा मार्ग सोडून अधर्माच्या मार्गाला भ बिचकता लागतात आणि त्याबद्दल त्यांना काही फिकीरही वाटत नाही. उलट त्याच चुकीच्या गोष्टी पुन्हा-पुन्हा करत राहतात आणि वर त्याची बढाई मारत राहतात, जणू अशा गोष्टी करणे म्हणजे सत्कर्मच केल्यासारखे ते समजतात. अशा या वणव्यासारख्या चारी बाजूंनी पेटलेल्या जगामध्ये तुम्ही सहजयोगी म्हणून जगत आहात. या कलियुगाचे अनेक प्रताप पुराणात सांगितले आहेत, एक कहाणी अशी आहे की हा कलि एक दिवस नलराजाच्या तावडीत सापडला आणि त्या कलीनेचे त्याला त्याची पत्नी दमयंतीपासून दूर होण्यास भाग पाडले असल्यामुळे नलराजाने कलीचा सर्वनाश करण्याचे ठरवले. त्यावेळी कली राजाला म्हणाला "माझे महत्त्व काय आहे हे तू आधी जाणून घे आणि मग मला मारायचे असले तर खुशाल ठार कर. पण आधी हे लक्षात घे की मानवजात भ्रांतीच्या विळख्यात माझ्यामुळे आल्यावरच आत्मसाक्षात्काराचे महान कार्य होणार आहे."

आत्मसाक्षात्कार मिळवणे हेच मनुष्य-जन्माचे परमश्रेष्ठ उद्दिष्ट आहे, भारतामध्ये हे फार पूर्वीपासून मान्य झालेले आहे व सांगितले गेले. इतकेच नव्हे तर त्याशिवाय जीवनातील कसल्याही कीर्तीला वा सुखाला अर्थ नाही हीच शिकवण इथल्या संस्कृतीमधून पढवली गेली. जीवनात मिळवण्यासारखी सर्वश्रेष्ठ वस्तू हीच आहे व या कलियुगातच तुम्हालाही आत्मसाक्षात्कार मिळाला आहे आणि त्याची महानता पण तुमच्या लक्षांत आली आहे. त्याच्या गहनतेत उतरल्यावरच तुम्हाला शांति व आनंद मिळणार आहे. पुष्कळजण अशा उच्च स्थितीला आले आहेत. **या गहनतेमध्ये सूक्ष्मता आल्यावर तुमच्या लक्षांत येते की तुम्ही कुणीकडे अग्रेसर होत आहात, तुमची दशा कोणती आहे हे तुम्ही समजू शकता. ही सूक्ष्मता तुम्हाला अजून मिळाली नसेल तर तुम्ही कुठेंतरी कमी पडत आहात हे प्रथम लक्षात घ्या आणि ती कमतरता (दोष) ठीक केले पाहिजेत.** ह्या सूक्ष्मतेचा विचार करताना आपल्याला शास्त्रांचाही चांगला आधार मिळतो. आपला हा भारतदेश गहन तत्त्वज्ञानाने, तसाच उच्च विचारांनी भारलेला देश आहे, आपल्याकडील या तत्त्वज्ञानाचे ग्रंथ अद्वितीय आहेत. इतकी खोल तात्त्विक ग्रंथसंपदा जगामध्ये इतरत्र कुठे आढळत नाही. हे ज्ञान बाहेरच्या देशांत पोचले तरी त्याच्या गहनतेत उतरण्याची क्षमता फक्त तुम्हा लोकांजवळच आहे. पण आपल्या लोकांनाच आपल्या या वाङ्मयीन पवित्र संपत्तीची नीटशी कल्पना नाही. प्राचीन काळापासून मानवी जीवनाबद्दलच्या उच्च तत्त्वांचे वर्णन व विश्लेषण आपल्या ग्रंथामध्येच आढळते. उदा. आत्मसाक्षात्कार म्हणजे काय व तो मिळाल्यावर मानवाला कोणत्या गोष्टी प्राप्त होतात हा विषय पहा. आता मी पण त्याबद्दल बरीच माहिती उघड करून तुम्हांला सांगितली आहे व समजावली आहे, पण त्याचा साक्षात अनुभव मिळाल्याशिवाय तुमचे खरे समाधान होणार नाही. म्हणून ही अनुभूति मिळवण्याची व जाणण्याची फार आवश्यकता आहे.

प्रथम आपण हे लक्षात घेतले पाहिजे की आपला देह पंचमहाभूत तत्त्वांमधून बनला आहे आणि या पाच तत्त्वांद्वारेच सर्व कार्य होत असते. त्यामधूनच सर्व घटना घडून येतात व आपला मानव-जन्मही त्याच तत्त्वांपासून बनलेला आहे. जनावरांमध्येही तीच तत्त्वे कार्यान्वित असतात. पण मानवामध्ये त्यांचा प्रादुर्भाव प्रकर्षाने असतो व त्यामुळेच मानवप्राण्यामध्ये स्थापित केलेली कुण्डलिनी त्याच्यामधूनच कार्यान्वित होऊ शकते. म्हणून मानव जन्म ही एक उच्च अवस्था आहे व कुण्डलिनीचे उत्थान हे त्याच्याकडूनच होण्यासारखे आहे. म्हणून, आत्मसाक्षात्कार हेच मानवजन्माचे परम उद्दिष्ट आहे व तेच तुमच्यामधील कुण्डलिनी करणार आहे. मी हे जे काही कुण्डलिनी शक्तीबद्दल सांगत आहे तेहि आपल्या अनेक ग्रंथांमधून पूर्वीच लिहून ठेवलेले आहे. बाराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी त्याबद्दल स्पष्ट लिहिले. सोळाव्या शतकात तर कबीरांसारख्या अनेक संतांनी त्याबद्दल खूप सांगितले, तुकाराम, रामदास, नामदेव अशा संतांनीही आपल्यामध्ये ही शक्ती असते व ती जागृत केली पाहिजे हेच सांगितले. असे सर्व कार्य याच देशांत घडून आले कारण या देशातले रहिवासी एक विशेष धारणेचे लोक आहेत, धर्मामध्ये रुजलेले लोक आहेत, त्यांच्याजवळ धार्मिकता आहे. अनेक शतकांपासून ही संस्कृति रुजल्यामुळे अधार्मिक गोष्टींकडे ते वळतच नाहीच. इतर देशात मी पाहते की

धर्म व अधर्म यांत त्या लोकांना काही फरकच वाटत नाही; उलट अधार्मिक कृत्ये करणे एक आव्हान म्हणून ते स्वीकारतात. उदा. मादकद्रव्यांचे सेवन करण्यात कशाला भीति बाळगायची असा विचार ते आग्रहाने करतात आणि त्यांतच स्वतःला फार मोठे वीर म्हणू लागतात. या देशातील व इतर देशातील लोकांच्या वृत्तीमध्ये हा मूलभूत फरक आहे. म्हणून भारतातील सर्व लोक, मग ते शहरातील, खेड्यातील, शिकलेले, अशिक्षित कसेही असले तरी सर्वजण धर्म व अधर्म हा फरक पाळणारे असतात. बाहेरच्या देशांमधील लोक पाप वा पुण्य ह्याच्याकडे बघायलाच तयार नसतात. म्हणून तुम्ही विशेष आहात असे मी म्हणते. पण तितकीच दुसरी गोष्ट म्हणजे त्या लोकांना शोधक (खोज) नजर जास्त आहे तशी शोधक किंवा चिकित्सक प्रवृत्ति आपल्या लोकांमध्ये कमी आहे; आपण लोक परंपराधीन आहे, जे चालत आले आहे ते करत राहण्याचा आपला कल असतो. याला कारण म्हणजे त्या लोकांनी एक प्रकारे अंधार पाहिला असल्यामुळे प्रकाशाचे महत्त्व ते मानतात. हीच आपल्या लोकांमध्ये कमतरता आहे असे मला वाटते; आणि म्हणूनच भारतीयांना सहजयोगाच्या गहनतेत उतरणे अवघड जाते. म्हणूनच तुम्ही लक्षात घ्यायला हवे की **सहजयोगाचे बीज तुमच्यामध्ये अंकुरल्यावर त्याचा मोठा वृक्ष कसा होईल ह्याची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी ध्यान केलेच पाहिजे व त्याचप्रमाणे सहजयोगाचा प्रसार केला पाहिजे; त्याशिवाय तुम्ही स्वतःची उन्नति करु शकणार नाही.** प्रत्येक सहजयोग्याने कमीतकमी एक हजार लोकांना आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे; त्या बाबतीत लाज वाटण्याचे काही कारण नाही; कसला संकोच बाळगण्याची जरुर नाही, उलट स्पष्टपणे सरळ-सरळ बोलण्याची जरुर आहे. कारण तुम्ही भारतीय आहात म्हणून मी वारंवार सांगत असते की भारतदेशाचे नागरिक असणे ही तुमच्याजवळ असलेली मूल्यवान गोष्ट आहे; इथे जन्म मिळणे हे हजार जन्मांमध्ये केलेल्या सत्कर्मांचे फळ आहे. या मातीतून मिळालेला धर्म– हिंदू, मुसलमान या अर्थाने नव्हे– हा येथील लोकांचा स्वाभाविक सज्जनपणाबद्दलचा ओढा आहे आणि त्याचे कारण म्हणजे आपल्या देशात अनेकानेक थोर ऋषी-मुनींनी दिलेली शिकवण व उपदेश; जीवनामध्ये पावित्र्य राखण्यास त्यांनी शिकवले; त्यासाठी कसली जबरदस्ती केली नाही तर माणसांच्या संपूर्ण स्वातंत्र्यातूनच त्यांना पावित्र्यतेकडे वळवले. ह्या स्वतंत्रतेमध्येच तुम्ही आलात, स्वतंत्रता म्हणजे 'स्व'चे तंत्र म्हणजेच आत्म्याचे तंत्र. हिंदी व संस्कृतभाषेमधील सर्व शब्दांना, व्यंजनांनाही एक विशेष अर्थ असतो; अक्षरांनाही अर्थ आहे. त्यामध्ये बरेच काही व्याकरण भरलेले आहे.

माझ्या हे सर्व सांगण्याचा हेतु एवढाच आहे की आपल्यामध्ये या पाच तत्त्वांना एक-एक व्यंजन म्हणून स्थापित केलेले आहे. या व्यंजनालाच शक्ति म्हणतात. व्यंजनामध्ये शक्ति आल्यावर त्याला अर्थ येतो. आता आपल्याला वाटते की नावात काय, मुला-मुलींचे काहीही नाव ठेवले तरी चालेल, पण हे चूक आहे. खरे तर मुलांचे नावही नीट विचार करुन ठेवणे चांगले, कारण नावाच्या एक-एक अक्षरामध्येही एक सुप्त अर्थ असतो. अक्षरांमुळे शब्दाला अर्थ येतो, अर्थ जणू शब्दाची सेवा करत असतात. आपल्या देशात वेगवेगळ्या गोष्टींबद्दल वेगवेगळे शब्द वर्णन करताना वापरतात. ही भाषा-शैली नसून आपल्या संस्कृतीचे ते वैशिष्ट्य आहे. म्हणून या संस्कृतीमध्ये जन्माला आलेले, शिकलेले अशा लोकांना हे समजून घ्यायला हवे की ही आपली अशी विशिष्ट संस्कृति आहे. पण बहुतेक लोकांना या आपल्याच संस्कृतीची नीट माहिती नसते; आपण जे काही करतो ते का करतो हे जाणण्याची उत्सुकता नाही, वाडवडिलांपासून चालत आलेले आहे म्हणून करायचे एवढेच ते समजतात. म्हणून आपली संस्कृति मुळातून जाणणे हे फार महत्त्वाचे आहे; म्हणजे आपली ही धार्मिकता कशामध्ये आहे हे समजून येईल. माणसामध्ये ही धार्मिकता कशी व कुठून आली हे समजून घेतले पाहिजे. परदेशी लोकांची विचारधारा आणि आपल्या लोकांची विचारधारा खूप वेगळी आहे; त्याची पद्धति पण वेगळी आहे. परदेशी लोकांना असे काही सांगितले की आधी ते पडताळून पाहतात. शास्त्रीय पद्धतीने ते बरोबर आहे की नाही याच्या मागे लागतात, पण त्यातून ते किती प्रगति किंवा निष्कर्षापर्यंत येऊ शकणार? आपल्याकडील विचारधारा वेगळी आहे; म्हणजे थोर ऋषी-मुनींनी जे सांगून ठेवले आहे त्याची परीक्षा घेण्याची जरुरीच वाटत नाही व सहजपणे ते स्वीकारले जाते. कारण ते ज्ञानसंपन्न होते म्हणून ते सांगतात त्याला मान्यता मिळते. शिवाय आत्मसाक्षात्कारानंतरच त्याची सत्यता पटण्यासारखी असते.

सहजयोगांतही तुम्ही असेच वागता; मी काही सांगितले की तुम्ही ते, माताजी म्हणतात म्हणून, बरोबर समजता. आत्मसाक्षात्कारानंतर तुम्हाला योग्य ती स्थिति येते तेव्हा तुम्हाला आपोआपच त्याची सत्यता समजते. म्हणून आपल्याकडे गुरुला फार उच्च स्थान दिले जाते; गुरुने जे सांगितले त्याबद्दल शंका मनांतही येता कामा नये. अर्थात आजकाल ज्या प्रकारचे गुरु ठिकठिकाणी बनत चालले आहेत त्याबद्दल काही बोलणे कठीण आहे. पण खरा गुरु ओळखण्याची पद्धति आहे आणि ती म्हणजे जो तुम्हाला साक्षात् अनुभव देतो तोच खरा गुरु. पैसे देऊन हिरे-मोती हातातून काढून दाखवणारे गुरु खरे गुरु असू शकत नाही. असे लोक दुकानदारी करत असतात. म्हणून अनुभव प्राप्त करुन घेतला पाहिजे व तो मिळाल्यावर त्याचा स्वीकारही केला पाहिजे; त्याच्या गहनतेत उतरुन त्याचा पडताळा करुन घेतला पाहिजे. याच्या उलट पाश्चात्य देशामध्ये तुम्ही काही सांगितले तरी ते शास्त्रीय परीक्षण व सिद्धतेच्या मागे लागतात; मग ते परीक्षण करणारे त्या क्षमतेचे आहेत् का नाही याची ते पर्वा करत नाही. पण ते शास्त्रीय परीक्षेचा आग्रह धरतात, एक परीक्षा झाली तरी दुसऱ्या कसोटीवर आणखी परीक्षा करु पाहतात, त्यावरुन वादविवाद-चर्चा करतात. याला कारण म्हणजे ते आत्मसाक्षातकारी नसतात व त्यांमध्ये संपूर्णपणे अधिकारी झालेले नसतात. म्हणून जोपर्यंत कसल्याही प्रणालीचा साक्षात् व जिवंत अनुभव होत नाही व त्या अनुभवामध्ये तुम्ही पूर्णपणे Nourish होत नाही तोपर्यंत तुमच्यामध्ये एक अधुरेपण टिकून

राहते व त्यामुळे सत्य का असत्य या निर्णयाप्रत तुम्ही येऊ शकत नाही. म्हणून हा बुद्धीचा खेळ कमी करुन आपल्या शास्त्रांमध्ये जे सत्य म्हणून सांगितले गेले आहे ते मानलेच पाहिजे.

नानकसाहेबांनी जो गुरुग्रंथ तयार केला त्यासाठी सर्व आत्मसाक्षात्कारी संतांच्या कवितांचा आधार घेतला. पण त्याचे नुसते पारायणच केले जाते हाहि एक खुळा प्रकार आहे. त्या गुरुग्रंथात जे लिहिले आहे ते समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरच ते आपण आत्मसात करु शकू व फलस्वरुप आपण उत्क्रांत होऊ शकू. म्हणून मी वर सांगितल्याप्रमाणे गुरु जे काही सांगतो त्याला प्रमाण म्हणून स्वीकारले पाहिजे. कारण तुम्ही अजून त्या ज्ञानामध्ये इतकी प्रवीणता मिळवलेली नाही. ती प्रवीणता मिळवण्याचा तुम्ही सातत्याने प्रयत्न करायला हवा. तशी स्थिति मिळवल्यानंतर गुरुच्या सांगण्याचा पडताळा घेऊन पहा.

परदेशी सहजयोग्यांमध्ये मला दिसून येते की ते लवकर पार होतातच पण शिवाय लवकर गहनता पण मिळवतात. आपल्या लोकांमध्ये तेवढी गहनता अजून आलेली नाही. आमच्याकडे पूर्वापार हेच चालत आले आहे, अमक्या गुरुने हे सांगितले आहे, श्रीराम असे म्हणत होते इ.च्या पलीकडे आपण जायला तयार नसतो. तुम्ही त्यांच्या जवळ गेलात का, त्यांना आपल्यामध्ये सामावून घेतले का, त्यांच्याकडून तुम्हाला काही प्रेरणा मिळाली का असल्या गोष्टींचा विचार करत नाही. आता महाराष्ट्रातील सर्व संतांनी भजने गायला लावली. एक वारकरी पंथ काढला– तसे प्रत्येक ठिकाणी पंथच पंथ असतात– पण त्यांना बिचाऱ्यांना कल्पना नव्हती की हे लोक वर्षानुवर्ष तेवढेच करत बसतील म्हणून; त्याच्यावर विचार करुन, गहनतेत उतरुन, अग्रेसर बनतील अशी त्यांची आशा होती. म्हणून साधु-संतांनी जे सांगितले तेवढेच चालत राहिले. महाराष्ट्रात वारकरी लोक महिनाभर चालत-चालत वारीला जातात, अंगावर फाटके-तुटकेच कपडे घालतात. झांजा-टाळ कुटत चालत राहतात आणि वारी करुन परत आल्यावर देव भेटला असे समजात. पण खरे तर त्याच्या मागचा संतांचा उद्देश होता की इकडे-तिकडे चित्त भरकटण्याऐवजी त्यांनी परमात्म्याचे ध्यान करावे, नामस्मरण करावे म्हणजे चित्त स्थिर होईल, शांत होईल. अशा तऱ्हेने आपल्याकडे पंथ निघाले, तेच-तेच लोक करत राहिले पण त्याचा काही फायदा त्यांना मिळाला नाही.

तुम्ही सहजयोगी आहात, तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे म्हणून तुम्ही विशेष लोक बनले आहात. आता तुम्हाला गहनतेत उतरलेच पाहिजे; त्यांतूनच तुम्हाला सूक्ष्मता प्राप्त होईल. ही सूक्ष्मताच मी आता समजावून सांगणार आहे.

(पुढील भाषण इंग्रजीमधून झाले)

पाश्चात्य देशांमध्ये कुणी काही सांगितले तरी प्रथम त्याची प्रायोगिक चाचणी परीक्षा घेण्याची त्यांची वृत्ति असते. ग्रंथांमधून लिहिलेल्या गोष्टींबद्दलही त्यांचा हाच आग्रह असतो. म्हणून ते लोक शास्त्रीय पद्धतीने प्रयोग करुन पडताळा घेतल्याशिवाय काहीही मान्य करत नाहीत. ख्रिस्त, मोझेस अशा लोकांच्याबाबतीतही त्यांचा हाच दृष्टिकोन असतो. याला कारण म्हणजे ते लोक स्वतःला बुद्धिवान व अधिकारी समजतात. तसे झाले नाही तर पुस्तकामागून पुस्तके लिहून ते आपली अमान्यता जाहीर करतात. पण जर काही त्यांना शेवटी पटले तर मात्र ते त्या गोष्टीबद्दल दुराग्रही बनतात. याच्या उलट भारतामध्ये थोर साधु-संतांनी जे सांगितले ते त्यांच्या ज्ञानाधिकारांतून येत असल्याने सर्व लोक स्वीकारतात. अशा थोर व ज्ञानी पुरुषांच्या बोलण्याबद्दल कसलीही शंका घेणे त्यांना प्रशस्त वाटत नाही व त्यांची परीक्षा घेण्याची जरुरी वाटत नाही. तसेच आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर त्या अनुभूतीमध्ये प्रगल्भ झाले पाहिजे असे सांगितलेले आहे. त्यामध्ये परिपूर्णता मिळवली पाहिजे व नंतरच संतांच्या सांगण्याचा पडताळा येईल असेही सांगितले आहे. हा दृष्टिकोनामधील मूलभूत फरक आहे. तुम्ही नुसते विचार करुन शंका-कुशंका काढत बसलात तर निष्पन्न काहीच होणार नाही आणि तुमच्याच प्रगतीमध्ये अडथळे येतील. यावर उपाय हाच आहे की हे ज्ञान मिळवण्यासाठी संतांनी सांगितलेल्या वचनांवर विश्वास ठेऊनच त्याकडे वाटचाल केली पाहिजे. ख्रिस्त, मोहम्मद, गुरुनानक, ज्ञानदेव इ. थोर पुरुषांनी जे सांगून ठेवले आहे त्याच्यावर म्हणूनच विश्वास ठेवायला हवा. कारण आपण अजून त्यांच्या अध्यात्मिक स्थितीला आलेलो नाही. त्याचे विश्लेषण करत बसू नका, तसे केले तर त्यातच हरवून जाल. विश्वास ठेऊन तुम्ही गहनतेमधून त्यांच्या स्थितीपर्यंत आलात तरच त्यांचे म्हणणे सत्य आहे का नाही हे तुम्हाला समजेल.

सहजयोग्यांना आता सत्य व असत्य जाणण्याची क्षमता मिळालेली आहे. सत्य वा असत्य, प्रेम वा द्वेष हे सर्व तुम्ही व्हायब्रेशन्सवर जाणू शकता. पण त्याही पलीकडे जाऊन ही व्हायब्रेशन्स म्हणजे काय हेहि तुम्हाला समजून घ्यायचे आहे; त्या व्हायब्रेशन्समध्ये काय आहे हे समजून घ्यायचे आहे; त्यांच्यामागे कसली सूक्ष्म शक्ति आहे हे समजून घ्यायचे आहे. हे परमचैतन्य मिळाल्यावर तुमच्यामध्ये सूक्ष्म अशी कोणती घटना होते हे पहा. आपला देह पंचमहाभूतांपासून बनला आहे. आत्मसाक्षात्कारानंतर म्हणजे कुण्डलिनी वर येऊन टाळूमधून बाहेर येऊन सर्वव्यापी शक्तिमध्ये मिसळली की हीच परमेश्वरी शक्ति तुमच्यामधून वाहू लागते. त्यावेळेस ही शक्ति त्या पंचमहाभूतांच्या सूक्ष्म स्वरुपात शिरते. परमेश्वरापासून आलेल्या आणखी एका सूक्ष्म वस्तूला भारतीय तत्वज्ञानांत ''बिंदू'' म्हणतात. बायबलमध्ये ज्याला GOD असे म्हणतात त्या शब्दाचा आणखी एक सूक्ष्म अर्थ Silent Commandment असा सांगता येईल. म्हणजे भारतीय तत्वज्ञानाप्रमाणे शब्दांमधून आधी नाद येतो हा नाद नंतर बिन्दू होतो; त्या बिन्दूमधून ही पंचमहाभूत तत्त्वे एकापाठोपाठ बाहेर येतात. सर्वप्रथम आलेले तत्त्व म्हणजे LIGHT (तेज)– सहजयोगात ह्याचाच सगळीकडे प्रभाव असतो. प्रथम तत्वाचे गर्भितरुप म्हणजे LIGHT उदा. साक्षात्कारी माणसाचा चेहरा तेजस्वी असतो. Radiance is the subtlty of LIGHT; त्यामुळे त्या व्यक्तीचा लोकांवर प्रभाव पडतो व लोकांना त्याचे

वैशिष्ट्य जाणवते. माझ्या बऱ्याचशा फोटोमध्ये माझ्या चेहऱ्याभोवती तेजस्वी प्रकाश दिसतो हे तुम्ही पाहिले आहे. म्हणजे तेज सूक्ष्म झाल्यावर दिसू लागते. हीच तुमच्यामधील सूक्ष्मतेची प्रगति. तुमच्या चेहऱ्यावरही हळूहळू तेज येऊ लागते. तेजानंतर वायु तयार झाला, वायूचे सूक्ष्म रुप म्हणजे थंड चैतन्य. जशी जशी तुमची स्थिति उन्नत होते तसे तसे हे तत्त्वाचे सूक्ष्म स्वरुप तुमच्यामधून प्रकट होऊ लागते. म्हणजे नुसती व्हायब्रेशन्स येतात असे नव्हे तर थंड झुळूक जाणवते आणि हेच वायुतत्त्वाचे सूक्ष्म रुप. त्यानंतर जलतत्त्व आले, आपल्यामध्ये जल आहेच. जलतत्त्वाचे सूक्ष्म रुप म्हणजे त्वचेवरची मृदुता. आत्मसाक्षात्कारी व्यक्तीची ही आणखी एक खूण आहे, ती प्रत्यक्ष जाणवते. अशी व्यक्ति नाजूक मृदु वृत्तीची बनते. त्याच्या बोलण्यात मृदुता असते, त्याच्या शब्दातून वहन होते. ही मृदुता त्याच्या स्वभावातून, वागण्या-बोलण्यातून जाणवते व जलाच्या स्वच्छ करण्याच्या गुणासारखी काम करते. त्यानंतरचे तत्त्व म्हणजे अग्नि. हा अग्नि शांत, शीतल असतो. त्याचा ताप होत नाही. उलट आपल्यामधील चुकीच्या प्रवृत्ति जळून जातात, इतरांच्यामधील चुकीच्या गोष्टी जळतात. उदा. एकदा रागाने भडकलेला माणूस नुसता माझ्यासमोर जरी आला तरी त्याचा राग उतरतो. याशिवाय आत्मसाक्षात्कारी पुरुषाला जाळता येत नाही, तुम्ही पूर्णपणे सहजयोगी झालात तर अग्नीपासून तुम्हाला भय नाही. उदा. सीतादेवीने अग्निप्रवेश केला तरी ती जिवंत राहिली. म्हणजे जल आणि अग्नि दोन्हीमध्ये दिव्यत्व येते. म्हणूनच ज्याला तुम्ही स्पर्श करता, पाण्यात जेव्हा हात बुडवता तेव्हा त्या वस्तुला व पाण्याला व्हायब्रेशन्सवर मिळतात; म्हणूनच जलाचे गुण थंडपणा व पाण्याची निवारणशक्ति त्यांच्यात प्रकट होते. अशा अर्थाने सूक्ष्मता प्राप्त झाल्यावर अनेक गुणांचा आविष्कार होत राहतो. तो प्रत्यक्ष दृष्टिस येतो आणि त्यासाठी प्रयोग करण्याची जरुर उरत नाही. शेवटचे तत्त्व म्हणजे भूमीमाता-तत्त्व. रशियामधील माझ्या एका फोटोमध्ये कुण्डलिनी भूमातेमध्ये आलेली दिसली; माझ्या खोलीत ठेवलेली फुले खूप बहरतात; लोक म्हणतात की अशी मोठ्या आकाराची फुले कधीच बघायला मिळत नाहीत. हे कसे होते? तर हे भू-तत्त्व कार्य करते; फुलांना पोषकता पुरवून त्यांची वाढ करते. भू-तत्त्वाची सूक्ष्मता असेच कार्य करते; त्याच्यापासूनच फुले, वृक्ष यांना जन्म मिळतो, पण आपल्यामध्येही हे तत्त्व खूप कार्य करत असते. पण आपण भू-मातेचा आदर करत नाही, त्याला नुकसान पोचवतो. प्रदूषण माजवतो, झाडे तोडतो. या भूमि-तत्त्वापासून आपल्याला सूक्ष्मपणे अनेक गुण मिळतात, एक म्हणजे भारदस्तपणा (gravity) ज्याच्यामुळे माणूस दुसऱ्यांना आकर्षुन घेतो, दुसऱ्यांवर प्रभाव पाडतो. पृथ्वीमातेनेही आपल्याला धरुन ठेवले नसते तर आपण उडालो असतो (फेकले गेलो असतो) याशिवाय भू-मातेकडून आपल्याला सहनशीलता व संयम मिळतो. जो माणूस रागीट व शीघ्रकोपी असतो त्याच्यामधील भू-तत्त्व क्षीण असते. पृथ्वीमाता माणसाने दिलेले सर्व त्रास सहन करते. श्रीगणेशसुद्धा एका मर्यादेपर्यंत खूप सहन करतात. म्हणून आपणही सहनशील, संयमी बनले पाहिजे. ज्यांना व्हायब्रेशन्स आहेत अशा सहजयोग्यांनी कमीत-कमी ही क्षमता मिळवली पाहिजे.

या सगळ्या गोष्टी तुमच्या व्हायब्रेशन्समधून दिसून येतात. तुम्ही आता एक महान स्थिति मिळवली आहे, ही गोष्ट म्हणूनच तुम्ही नीट समजून घेतली पाहिजे. इतरांमध्ये या घटना घडत नाहीत. चर्च, मंदिर किंवा मशिदीत नुसते जाऊन या गोष्टी होत नाहीत; त्यातून त्यांनी काही मिळवले नाही. त्यांच्या चेहऱ्याकडे बघितलेत तर तुम्हाला दिसून येईल. कारण अशामधून त्यांचा 'सत्या'बरोबर संबंध आलेला नसतो; आत्मसाक्षात्कारानंतरच हा संबंध घटित होतो आणि तुम्हाला या सूक्ष्म गोष्टी समजू लागतात आणि ती सूक्ष्म तत्त्वे तुमच्यामधून कार्यान्वित होतात. तुम्ही 'स्व'तःला नीट ओळखावे म्हणून मी या सर्व गोष्टी आज सांगत आहे. स्वतःला नीट ओळखू शकलात व समजू शकलात की तुम्ही खूप काही कार्य करु शकता; आत्मविश्वासाने ''मी सहजयोगी आहे'' असे तुम्ही स्पष्टपणे सांगू शकता. मग ''मी सहजयोगासाठी काय करत आहे'' ही समजही तुम्हाला येते. तुमच्यापैकी काही सहजयोग्यांनी प्रचंड कार्य केले आहे पण इतर बरेच जण अजूनही ''माझा नवरा माझ्याशी फार भांडतो, माझा मुलगा नीट वागत नाही, माझी आई अशी आहे'' अशा फालतू गोष्टी मला सांगत राहतात किंवा पत्रातून कळवतात. सहजयोगात तुम्ही याच्यासाठी आलात का? तुमच्या बाबतीत जे काही संसारात होत आहे त्याचा निमूटपणे स्वीकार करा आणि मगच तुम्हाला कशी मदत मिळते, तुमचे प्रश्न कसे सुटतात याचे तुमचे तुम्हालाच आश्चर्य वाटेल. **'सहज' म्हणजे नुसते तुम्हाला आत्मसाक्षात्कार सहजपणे मिळतो असे नाही तर तुम्ही स्वतः 'सहज' बनायचे आहे. मगच तुमचा स्वभाव, तुमच्यामधील सूक्ष्म तत्त्वे 'सहज' बनून जातात आणि सर्व काही घडून येते.** तुमच्या मदतीला गण आणि यक्ष तत्पर आहेतच. पण तुम्ही त्याची काळजी करु नका. मुख्य व महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्हाला जे मिळाले आहे त्याची महानता लक्षात घेऊन स्वतःला नीट ओळखा. मला जरा कुठे काही प्रश्न दिसला तरी लगेच कार्य घडून येते व प्रश्न सुटतो. Everything Works out. पण हे सर्व तुमच्या कल्याणासाठी व उन्नतीसाठी होत असते. ही स्थिती मिळवण्याचा प्रयत्न तुम्ही सातत्याने केला पाहिजे, आत्मपरीक्षणामधून तुम्ही स्वतःला सुधारु शकता.

म्हणून मला आशा आहे की तुम्ही तुमच्याजवळच्या या सूक्ष्म शक्ति जाणाल, त्यातून गहनता मिळवाल आणि सहजयोगाचे कार्य कराल. तुम्हा सर्वांना त्यासाठी माझे आशिर्वाद आहेत याची खात्री बाळगा.

●

# श्रीराम पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश) स्वित्झर्लंड : १९८७

आज आपण श्रीरामांची पूजा करण्यासाठी एकत्र जमलो आहोत. श्रीरामाचे स्थान आपल्या उजव्या हृदयांत आहे. ते एक मर्यादा पुरुषोत्तम पुरुषाचे आदर्श अवतरण होते. आदर्श राजा, आदर्श पुत्र, आदर्श पति, आदर्श पिता इ. सर्व संबंधामध्ये आदर्श कसे असावे हे त्यांनी त्यांच्या जीवनामधून दाखवून दिले. म्हणून श्रीरामांचे सर्व गुण आपल्यामध्ये प्रस्थापित होतील व आपल्या व्यक्तिमत्त्वामधून त्यांचा आविष्कार होईल याची तुम्ही काळजी घेतली पाहिजे.

आपल्याकडेही श्री. लालबहादुर शास्त्री हे असेच एक थोर पुरुष होते. एकदा एक मिटिंग चालली असताना खोलीत पंखा जरूर नव्हती तरी चालत राहिला होता. त्यांनी त्यासाठी कुणालाही न बोलावता स्वतः उठून पंख्याचे बटन बंद केले. स्वतःसाठीच्या कसल्याही कामासाठी ते कुणालाही काही हुकूम देत नसत किंवा सांगत नसत. हा त्यांचा मोठा गुण होता. त्यांचा जन्म सूर्य वंशात झाला आणि त्यांना अग्नितत्त्वाचे आशीर्वाद होते. साधारणपणे आपण पाहतो की सूर्य-स्थानात जन्म झालेल्या, लोकांची, मग ते कितीही हलक्या कुळात, जिथे डाव्या बाजूचे सर्व त्रास असतात अशा कुळात झालेला असेल, आज्ञा फार खराब असते. सूर्यस्थानात जन्म झालेल्या व्यक्तींनी अत्यंत नम्र असायला हवे, त्यांच्या व्यवहारात दिसून आले पाहिजे की ते कशाही परिस्थितीत विचलित होत नाहीत, त्यांना कशामुळेही आपण महान व्यक्ती आहोत असा समज होत नाही. शास्त्रींच्या जीवनाकडे पाहिल्यावर समजते की ते फार नम्र व साधे होते. मला हे आवडत नाही, ते चालणार नाही इ. बढाया मारणारे लोक त्यांच्या निकृष्ठ स्तराची जाणीव करून देतात, त्यांच्याजवळ सहनशीलता मुळीच नसते. माणसाच्या मोठेपणा इतरांबद्दलच्या सहनशीलतेमधून दिसून येतो. दुसऱ्यांना सांभाळून न घेणारा मनुष्य आपल्याच अहंकाराचे प्रदर्शन करतो.

श्रीरामांबद्दल त्यांच्या प्रजेला अत्यंत आदर व प्रेम वाटत असे. त्यांची पत्नी आदरणीय जनकराजाची मुलगी होती. अत्यंत रुपवान होती. तसेच ते आपल्या वडिलांचेही लाडके पुत्र होते. पण श्रीराम स्वतः अत्यंत नम्र स्वभावाचे होते. त्यांच्या जीवनातून ही नम्रता अनेक प्रसंगामध्ये दिसून येते. वनवासात जाताना ते अगदी साध्या बोटीतून गेले, त्या बोटीच्या नावाड्यालाच आपण आपल्या भावी राजासमोर आहोत याची कुचंबणा वाटत होती; त्यांनी फक्त वल्कलेच परिधान केली होती कारण वनवासात त्यांना राजघराण्यातील कसल्याही सुविधा नको होत्या, उलट त्यांनीच त्या नावाड्याला सांगितले की आता मला वनवासात साध्या माणसासारखेच राहिले पाहिजे. अगदी हलक्या जातीतील लोकांनाही त्यांच्या हलक्या कुळाची जाणीव त्यांनी होऊ दिली नाही. यावरून हेच दिसते की त्यांना प्रत्येक मनुष्याबद्दल आदर होता. ते स्वतः मर्यादापुरुषोत्तम होते, मर्यादा कशा व किती पाळायच्या याचे ते उत्तम उदाहरण होते. कुणाबरोबर कसे वागायचे-बोलायचे याचे ते उत्तम उदाहरण होते. तसा रावणही साक्षात्कारी पुरुष होता पण अहंकार फार बळावल्यामुळे तो राक्षस बनला. पण अलीकडच्या तरुण मुला-मुलींचे प्रकार व अहंकार पाहिले की त्यांनी रावणालाही मागे टाकले असे मला वाटते. रावणाला दहाच तोंडे होती पण या अलीकडच्या माणसांना एकशे-आठ तोंडे असावीत! अहंकार आणि द्वेष हे फार हलक्या प्रवृत्तीचे द्योतक असतात पण आजकाल असे खूप लोक दिसतात; सहजयोगातही ते कसे तरी शिरले असावेत. श्रीराम वनवासात असताना एका म्हाताऱ्या भिल्लीणीने दिलेली उष्टी बोरेही त्यांनी आनंदाने स्वीकारली व खाल्ली. सीतादेवींनेही ती मागितली आणि खाल्ली. लक्ष्मणालाही त्यांचा हेवा वाटू लागला व त्यानेही त्यांच्याकडील बोरे मागून खाल्ली. ते पाहून श्रीराम नुसते हसले. म्हणजे अछूत अशा जातीतल्या उष्टी बोरे देणाऱ्या भिल्लीणीचे प्रेम व भक्ती किती शुद्ध होती हे श्रीरामांनी दाखवले. श्रीराम आपल्या प्रजेच्या सुखासाठी सदैव जागरुक व तत्पर असत. जसा Oyster शिंपल्यामध्ये मोती जपून व सांभाळून ठेवतो. त्याला स्वच्छ व चकचकीत करतो. त्याचप्रमाणे सर्व माणसे सद्गुणांनी तेजस्वी दिसावीत म्हणून सर्वांचा काळजीपूर्वक सांभाळ श्रीराम करीत असत; त्यातच त्यांना समाधान वाटत असे.

श्रीरामांचे गुण तुम्हाला आत्मसात करायचे असतील तर तुम्हाला



पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्या वेळच्या अनेक रांगोळ्यांपैकी एक

सर्वप्रथम श्रीरामांची अंगभूत स्थिति समजून घेतली पाहिजे. श्रीराम तुमच्या उजव्या हृदयात प्रस्थापित आहेत. मानवप्राण्यांच्या उजव्या बाजूचे हृदय लोकांना माहीत नसते. सहजयोगामध्ये डावे, उजवे व मध्य अशी तीन हृदये आहेत. उजव्या बाजूचे हृदय हे फार महत्त्वाचे स्थान आहे. उजवे हृदय दोन्ही फुफ्फुसांवर नियंत्रण ठेवते. तसेच घसा व कान यांचे अंतर्भागही त्याच्याच देखरेखीखाली असतात. त्यांचे बाह्यांग (features) श्रीकृष्णांकडून मिळतात. तसेच डोळे व कानाचे अंतर्भागही श्रीरामांकडून मिळतात. या अवयवांचे आतील व बाहेरील हे दोन्ही भाग सुव्यवस्थित असणे महत्त्वाचे आहे. श्रीरामांनी व्यक्तीच्या बाह्यांगाबद्दल कधीही टीका केली नाही कारण त्यांना मानवाच्या आतील भागांची जास्त काळजी होती. म्हणजे एका अर्थाने ते उजव्या हृदयात असले तरी हंसाचक्रामधून व काही प्रमाणात विशुद्धी चक्रातून कार्य करतात. म्हणून एखादी व्यक्ती बाह्यांगावरून दिसायला सुंदर नसली– पाश्चात्य देशात बाह्यातील देखणेपणाला फार महत्त्व देतात– तरी श्रीरामासारखी व्यक्ती सुदृढ, उंच आणि अजानुबाहू असते. तसेच ती Plump असते– श्रीविष्णूंचे जल हे तत्त्व असल्यामुळे. आजकाल हडकुळेपणाची फार तारीफ होते, ती एक फॅशन झाली आहे. अर्थात Plump शरीरयष्टीचा माणूस एरवी चांगलाच असतो असाही त्याचा अर्थ नाही; पण अशी व्यक्ती आतमधून अत्यंत सुंदर असते. तिच्यामध्ये प्रेम, करुणा, आस्था इ. गुण पूर्णार्थाने भरलेले असतात. सहजयोग्याजवळ हे गुण नसले तर तो सहजयोगीच नाही असे म्हणावे लागेल. तसेच उगीच मोठ्या आवाजात बोलणारा, मोठ्याने सारखा हसणारा माणूसही सहजयोगी नव्हे. श्रीरामांचा मृदुपणा अलौकिक होता, कधी कधी पराकोटीला गेल्यासारखा दिसायचा. रावणाबरोबर युद्ध करत असताना त्यांनी बाण मारून त्याचे एक डोके उडवले पण दुसऱ्या डोक्यावर बाण मारताच पहिले डोके पुन्हा गळ्यात परत येऊन बसले आणि हा प्रकार चालूच राहिला. मग लक्ष्मणाने त्यांना रावणाच्या हृदयावर बाण का नाही मारत असे विचारल्यावर ते म्हणाले, ''त्याच्या हृदयात सीता आहे म्हणून हृदयावर बाण मारला तर तिला इजा होईल. त्यासाठीच मी त्याची मस्तके उडवत आहे म्हणजे त्याचे चित्त त्याच्या मस्तकांवर लागले की मग मला हृदयावर बाण मारता येईल.'' ह्यातील संकोच लक्षात घ्या; त्यांच्या बोलण्यातला संकोच बघा. वनवासात असताना शूर्पणखा राक्षसीण सुंदर रूप घेऊन रामाकडे आली आणि तिने श्रीरामांना विचारले, 'माझ्याबरोबर तू लग्न का करत नाहीस?' मर्यादापुरुषोत्तम श्रीरामांना असा प्रश्न विचारणेही फार भयानक गोष्ट. एखाद्याने असा प्रश्न विचारल्यावर त्याला मारूनच टाकले असते, पण श्रीराम हसत-हसत म्हणाले, 'मी विवाहित आहे आणि एकपत्नीत्वाचे वचन घेतले आहे. तू माझ्या भावाला विचार.' मग शूर्पणखेने लक्ष्मणाला विचारले तर ताबडतोब चिडून जाऊन त्याचे तिचे नाक कापून टाकले.

श्रीरामांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते एकसूत्री होते. श्रीकृष्ण तसे नव्हते, तर ते फार चतुर होते. (diplomat) म्हणजे चाणाक्ष (Intelligent) होते. (**यावेळेस काही लोक आपापसात बोलत होते त्यांना श्री. माताजींनी खडसावून लक्ष देण्यास सांगितले.**) पण सहजयोगात तुम्हाला श्रीरामासारखे वागून चालणार नाही, उलट तुम्हाला कधी कधी परशुरामासारखेही व्हावे लागेल. नाही तर कार्य होणार नाही. तर श्रीराम आयुष्यभर, त्यांच्या बोलण्यात वागण्यात, एकसूत्रीपणा जपायचे. उदा. त्यांचे एकपत्नीव्रत. अयोध्येला परत आल्यावर सीतेला पुन्हा एकटीला आश्रमात सोडल्यावर त्यांनी राजसूययज्ञ केला; त्यातून त्यांना अजिंक्य सम्राट असल्याचे दाखवायचे होते. त्यावेळेसही या यज्ञाला पत्नी हवी म्हणून विवाह करण्याचे सांगितल्यावर त्यांनी ठाम नकार दिला एवढेच नव्हे तर त्याशिवाय यज्ञ झाला नाही तरी चालेल असेही सांगितले. मग सीतेच्या सोन्याचा पुतळा ठेऊन यज्ञ करण्यास त्यांनी होकार दिला. सांगायचा मुद्दा म्हणजे त्यांनी जे जे काही केले त्यात पूर्णपणे धर्माच्या मर्यादेत केले. धर्माचरण करण्यात त्यांनी कसलीही कसूर ठेवली नाही. दुसरे एक उदाहरण म्हणजे सीतेला आश्रमात सोडून दिल्यावर श्रीराम कधीही बिछान्यावर झोपले नाहीत तर जमिनीवर झोपायचे. अनेक कवींनी राम-सीतेच्या प्रेमाचे गोडवे गाइले आहेत. सीता शेवटी धरणीमातेच्या पोटात जाऊन अंतर्धान पावली, त्याच धरणीमातेने तिला जन्म दिला होता. त्यानंतर मात्र श्रीरामांना पराकाष्ठेचे नैराश्य आले आणि त्यांनीही शरयू नदीमध्ये शिरून अवतारसमाप्ति केली.

या सर्वांमधून व्यक्तिमत्त्वाचे चढ-उतार कसे असतात हे आपल्याला दिसून येते. रावणाच्या कैदेत राहिलेल्या सीतेचा श्रीरामांनी पुन्हा स्वीकार करावा हे त्यावेळच्या समाजाला, प्रजेला पटले नाही आणि एक आदर्श राजा म्हणून पत्नीचा जीवनभर त्याग करण्याचा श्रीरामांनी निर्णय घेतला. बंधू लक्ष्मणाबरोबर राजरथातून तिला वाल्मिकींच्या आश्रमात पोचवली व पोचल्यावर तिला त्याबद्दल कळवण्यात आले. आता सीता ही आदिशक्तीच होती आणि तिला जरी वाईट वाटले तरी तिने कसलीही प्रतिक्रिया न दाखवता ते मान्य केले– आजकालच्या स्त्रियांसारखी कोर्टात जाऊन हक्क मागण्याची, पैसे मागण्याची भाषा मुळीच केली नाही; उलट स्पष्ट शब्दात त्यांना परत जायला सांगितले. त्यावेळेस ती गरोदर होती. भारतातल्या एखाद्या महिलेने अशा प्रसंगी आत्महत्या केली असती. दोन्ही गोष्टी अर्थात सारख्याच, एकामध्ये आक्रमकपणा तर दुसऱ्यामध्ये दुबळेपणा. पण सीतेने धीरगंभीरपणे मुलांना जन्म देऊन त्यांचे संगोपन करण्याचा निर्णय घेतला आणि लक्ष्मणाला आपल्या भावाची काळजी घ्यायला सांगितले. सीतादेवीच्या या भूमिकेमधून दिसणारे तिचे व्यक्तिमत्त्व, तेजस्विता व भारदस्तपणा लक्षात घ्या. मर्यादापुरुषोत्तम म्हणून गणल्या जाणाऱ्या श्रीरामापेक्षा ती तसूभरही कमी पडली नाही. रावणाच्या कैदेत असताना तिच्या महाभयंकर शक्तीमुळे तिला स्पर्श करण्याची हिम्मत त्याला झाली नाही. इतका तो तिच्यापुढे घाबरून गेला होता.

लंकेत बंदिवासात असताना हनुमान तिला भेटायला आला होता. श्रीरामांनी दिलेली अंगठी त्याने तिला दाखवल्यावर तिची खात्री झाली; तरीपण त्याच्याबरोबर, हनुमान एवढा बलशाली असूनही, जायला तिने नकार दिला आणि श्रीरामाने रावणाबरोबर युद्ध करून त्याला ठार केल्यावर त्याच्याबरोबरच परत येण्याचा आपला निश्चय सांगितला. कारण रावणाचा वध होणे ही काळाची गरज होती. सीतेचे हे वागणे प्रतिक्रियात्मक नव्हते तर तो तिचा संयम होता. रावणाने तिचे मन वळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण सीता पूर्णपणे शांत व दृढनिश्चयी राहिली. रावणासारख्या महादुष्ट राक्षसाच्या बंदिवासात असूनही असे धैर्य बाळगणे व दाखवणे दुसऱ्या कुणा स्त्रीला शक्य नव्हते. सध्याच्या काळात अशा स्त्रीची तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही. सीताच्या जीवनाचा हाच संदेश आहे.

श्रीरामांची कल्याणकारी वृत्ति ते राज्य करू लागल्यावर दिसून आली. त्यांना जनतेच्या आपत्तीबद्दल कणव होती, काळजी होती. आपल्या राज्यातली प्रजा सुखी-समाधानी व आनंदी असावी हेच त्यांचे ध्येय होते; त्यांची फार मोठ्या प्रेमाने ते काळजी घेत. आश्रमांत एकटी असतानाच सीतेने दोन पुत्रांना जन्म दिला; वाल्मिकीऋषींनी त्या दोघांना रामायण गाण्याचे शिक्षण दिले. श्रीराम राजसूययज्ञ करत असताना त्यांनी त्यांच्यापुढे रामायण गाऊन दाखवले. नंतर राजसूययज्ञाचा घोडा आश्रमात आल्यावर त्या दोघा मुलांनी तो पकडला; हनुमानसुद्धा त्यांचा युद्धात पराजय करून तो सोडवू शकला नाही; त्यांनी श्रीरामांकडे येऊन या दोन तेजस्वी मुलांचा पराक्रम सांगितला आणि श्रीराम स्वतः तिकडे गेले. मुलांसमोर आलेले त्यांना पाहिल्यावर सीतेने त्यांना ते कोण आहेत हे सांगितले आणि त्यांच्याबरोबर युद्ध न करण्याची मुलांना आज्ञा दिली. हे सर्व पाहून श्री हनुमानांनाही, जे श्रीरामाचे परमभक्त होते, आश्चर्य वाटले की श्रीरामांनी हे सर्व का केले? हनुमान हे गॅब्रीएल होते आणि साधेपणा आणि कार्याची चपलता या गुणांचे आदर्श होते. जन्मतःच त्यांनी सूर्याला गिळून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जन्मभर श्रीरामांची सेवा केली. त्यांच्याशी पूर्णपणे एकनिष्ठ राहिले. त्यांना नऊ सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. रामरावण युद्धात लक्ष्मण बेशुद्ध झाल्यावर एका पर्वतावर जाऊन एक विशिष्ट वनस्पती आणण्यास त्यांना पाठवण्यात आले, पण तिथे गेल्यावर त्यांना ती वनस्पती सापडेना म्हणून त्यांनी तो सबंध पर्वत हातावर उचलून युद्धभूमीवर आणला. एवढी प्रचंड शक्ती असूनही ते इतके साधे व समर्पित होते, एकनिष्ठ होते. शक्तिशाली माणसाची हीच ओळख आहे.

**ज्याच्याजवळ शक्ती आहे. त्याने नम्र राहून अहिंसेचे पालन केले पाहिजे.** महात्मा गांधीनीही हीच अहिंसेची शिकवण दिली; ते म्हणत दुर्बल माणूस प्रतिकार करूच शकत नाही. म्हणून त्याच्या अहिंसेपेक्षा **शक्तिशाली माणसाची अहिंसा हीच खरी अहिंसा; शक्तिशाली माणसाची अहिंसा त्याच्या स्वतःच्या शक्तीबद्दलच्या आत्मविश्वासांतून निर्माण होत असते.** उलट आक्रमक, अहंकारी, तापट, दुसऱ्यावर हुकूम गाजवणारे लोकच खरे तर दुर्बल असतात; त्यांचेच व्यक्तिमत्व व चारित्र्य चांगले असते तर त्यांनी असले प्रकार केलेच नसते. वाईट भावनांच्या आहारी गेल्यामुळे ते असे वागतात किंवा ते इतके दुर्बल असतात की रागाच्या भरात वाहवत जातात आणि काहीही सहन करण्याची शक्ती त्यांच्यामध्ये उरलेली नसते. या दृष्टीने भूमि-माता सर्वांत शक्तिशाली आहे कारण ती सर्व काही सहन करू शकते. ज्याला खूप सहनशीलता आहे तोच खरा शक्तिशाली असतो आणि ज्याच्याजवळ अशी सहनशीलता नसतो तो दुर्बल असतो. "मला हे सहन होत नाही, चालत नाही" असे म्हणणारा मनुष्य बेकार आहे आणि भूमीला भार आहे; अशा माणसांना देव का निर्माण करतो मला समजत नाही. कुणालाही अशी व्यक्ती आवडणार नाही. **सहनशील मनुष्य महालात असला काय किंवा जंगलात असला काय, या लोकांबरोबर असला काय किंवा त्या लोकांबरोबर असला काय, त्याला सर्व सारखेच कारण तो जे आहे त्यात सुखी असतो. अशी सहनशीलता मिळवली की तुम्ही खऱ्या सहजयोगासाठी पात्र होता.** मग ती तुम्हाला बोलून दाखवायची किंवा त्याचा त्रास होत असल्याची जाणीवही उरत नाही, तुम्ही सर्व काही सहजपणे सहन करू शकता. ज्याला फक्त सुख-सोयी, आराम हेच हवे असते, त्यात कसली कमतरता खपत नाही तो माणूस भिकारी आहे असेच मी म्हणेन. सर्वांत चांगली गोष्ट म्हणजे कशाचाच प्रश्न येऊ न देणे. उदा. मी कार चालवत नाही म्हणून मला ड्रायव्हिंगचा प्रश्न नाही, टेलिफोन ठेवत नाही म्हणून टेलिफोनची कटकट नाही, बँकेचे व्यवहार करत नाही म्हणून बँकांचा त्रास नाही, पैसे मिळवत नाही म्हणून इनकम्-टॅक्सचा प्रश्न नाही! म्हणजे काही वस्तू घ्यावीशी वाटणे व मग ती मिळाल्यावर तिच्या कटकटीचा त्रास सोसणे हे व्यर्थ आहे. युरोपियन लोकांना 'प्रॉब्लेम, प्रॉब्लेम' ही फार सवय आहे, आम्ही फक्त भूमितीमध्ये प्रॉब्लेम बघितले! पण ह्या लोकांच्या बोलण्यातच प्रॉब्लेम हा शब्द वारंवार येतो; काही करायला सांगितले तरी ' नो प्रॉब्लेम' म्हणणार! म्हणून ज्याच्यामुळे प्रॉब्लेम



पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्या वेळच्या अनेक रांगोळ्यांपैकी एक

निर्माण होतात ती वस्तूच सोडून द्या. तुम्ही कशाचाही त्याग करू शकता. फक्त त्यासाठी त्या वस्तूबद्दलची आसक्ती सोडून द्या. पुष्कळ लोक मला सांगतात की आम्हाला Ego चा प्रॉब्लेम आहे. पण अहंकारच सोडून द्या ना! मगरीची भीति तर वाटते पण तिच्याच तोंडात पाय ठेवायचा आहे असा हा प्रकार झाला. मग माझ्याकडे मगरीने पाय पकडला म्हणून येणार! जिथे प्रॉब्लेम आहे तिथे जायचेच कशाला? आणि तुमचा सगळ्यात मोठा प्रॉब्लेम म्हणाल तर 'घड्याळ'. मला विमानतळावर जायचे असले तरी आजूबाजूच्या सर्वांना घड्याळाची काळजी! मला विमानाच्या वेळेवर जायचे असते पण प्रॉब्लेम यांनाच! मला तर कधी कधी वाटते की माझ्या 'जाण्या'कडेच त्यांचे लक्ष तर नाही ना? अतिशय बारीक-सारीक तपशीलात डोके घालण्याची सवय असणाऱ्या लोकांना हा प्रॉब्लेम असतो. विमान मिळाले तरी उत्तम, नाही मिळाले तरी उत्तम असे असताना प्रॉब्लेम कुठे आला? खरी गोष्ट अशी आहे की कुठल्याही गोष्टीला प्रॉब्लेम म्हणणे हा सत्य टाळण्याचा प्रयत्न असतो. खरं तर सत्य गोष्टीला सामोरे जाण्याची धमक असावी लागते. तसे केले तर प्रॉब्लेम राहणारच नाही. समजा रस्त्यात तुमची कार अचानक बंद पडली तर दुसऱ्या जाणाऱ्या कारमध्ये लिफ्ट मिळेल किंवा रात्रभर तुमची कार ठीक होईपर्यंत थांबावे लागेल तर त्याला तोंड द्या. नुसते प्रॉब्लेम झाला म्हणण्यात काय अर्थ? आणि एखादा वाघ येऊन तुम्हाला खाण्याची भीती वाटत असेल तर लक्षात आणा की तुम्ही मेलात तरी पुन्हा जन्म घेणारच आहात! अशा दृष्टीकोनातून जीवनाकडे पाहिलेत तर समजेल की कुठेच प्रॉब्लेम नाही. ज्याला प्रॉब्लेम समजले जायचे ते पाण्यावरच्या बुडबुड्यासारखे होते. आता कालच मला लोक सांगत होते की प्रोग्रॅमला हॉल मिळत नाही; मी म्हणाले की उघड्यावरच कार्यक्रम करू. थोडक्यात म्हणजे श्रीरामांचे अनुकरण करायला शिका. श्रीरामांनी त्यांच्या चारित्र्यामधून, संतुलित जीवनामधून, नम्रपणा व माधुर्य या गुणांमधून आपल्याला दाखवून दिले आहे की राजाने कल्याणकारी राज्य कसे करावे, तसेच प्रेमळ पती व पिता म्हणून कसे वागावे आणि महनता कशी प्राप्त करावी. त्यांनी महाराष्ट्रभर संचार करून तेथील भूमी चैतन्यमय केली; त्या भूमीवर चालताना ते अनवाणी चालले आणि महाराष्ट्र-भूमीला चैतन्य दिले; त्या भ्रमंतीत त्यांनी शिलारूपी बनलेल्या अहिल्येला पदस्पर्श करून शापमुक्त केले. त्यांच्या अवतरणाचा हाच उद्देश होता.

श्रीराम हे प्राणवायूच आहेत. आपल्यामधील प्राणवायू जेव्हा तप्त होतो तेव्हा श्रीराम आपल्याबरोबर नाहीत हे आपण समजले पाहिजे. तुमच्या नाकामधून आणि तोंडामधून येणारी हवा थंडच असली पाहिजे. तुमची कशी असते मला माहित नाही. पण माझ्यामधून येणारी हवा नेहमीच थंड असते. ही हवा गरम होऊन तुमच्या नाकातोंडातून येते तेव्हा नाकपुड्या फुलतात, डोळे वटारले जातात, तुमच्या तोंडी रागीट शब्द उमटतात आणि एकूण तुम्ही रावणासारखे रागीट बनता. श्रीरामांचे, त्यांच्या जीवनाचे सौंदर्य तुम्ही विसरल्यामुळे हे होते. श्रीराम पितृधर्माचे द्योतक आहेत व हृदयचक्रावर पितृधर्म प्रस्थापित आहे. आपण पितृधर्म वडील म्हणून कसा पाळतो इकडे तुम्ही लक्ष द्यायला हवे. जे वडिल म्हणून कर्तव्यात कसूर ठेवतात त्यांना हृदयाचे आजार होतात, तसेच जे पति-धर्माचे पालन करत नाहीत त्यांनाही हृदय-चक्रावर त्रास होतात. पाश्चात्य देशामध्ये थंड हवेमुळे लोकांना जास्त वेळ घरात रहावे लागल्यामुळे आतून एक प्रकारची शुष्कता येते व श्रीरामांचे माधुर्य, करुणा व हृदयाची उबदार भावना कमी मिळाल्यामुळे त्यांना दम्याचे विकार येतात. पाश्चात्य देशात हा एक गंभीर आजार बनला आहे. त्यातून पैशावरून लोकांना फसवणे, लुबाडणे, छळणे असे प्रकार वाढले की हे आजार भयानक होतात. या सर्वांच्या मुळाशी पैसा हेच कारण असते. सीतादेवी श्रीलक्ष्मीच होती आणि तीच श्रीरामांची शक्ति होती. म्हणून तुम्ही चांगला पिता किंवा पति राहिला नाहीत तर श्रीलक्ष्मी नाराज होते. म्हणून गृहलक्ष्मीचे फार महत्त्व आहे. पण स्त्रीने आधी गृहलक्ष्मी बनले पाहिजे, ती उद्दट असली तर गृहलक्ष्मी-तत्त्व खराब होते. पत्नीने गृहलक्ष्मी बनून पती व कुटुंबाची देखभाल केली पाहिजे. मधुर बोलणे ठेवले पाहिजे व पाहुण्यांचा सन्मान ठेवला पाहिजे. पण तुम्ही अयोग्य स्त्रीच्या मागे लागलात, तिला प्रोत्साहन दिले की सामूहिकता खराब होते. अशा सामूहिकतेतून आक्रमकपणा दाखविणाऱ्या, दुसऱ्यांना त्रास देणाऱ्या स्त्रियांना मुळीच प्रोत्साहन देता कामा नये. तुलसीदास तर म्हणतात की अशा बायकांना ठोक दिला पाहिजे. गृहलक्ष्मीपदाला अयोग्य असणाऱ्या स्त्रियांना ठोक दिला पाहिजे हे बोलणे आजकालच्या वातावरणात पटणार नाही. माझा तसा उद्देश नाही पण सांगण्याचा मुद्दा हा की अशा महिलांच्या बाधा दूर केल्या पाहिजेत. नाही तर तुम्हाला पण उजव्या हृदयाचे त्रास होतील. पति-पत्नी हे दोघेजण समाजाचे घटक आहेत. जे पुरुष पत्नीला छळतात त्यांचे उजवे हृदय खराब असते, तसेच जे पत्नीच्या अंमलाखाली राहतात त्यांनासुद्धा उजव्या हृदयाचे त्रास होतात. तुम्ही संतुलनातच सतत राहिले पाहिजे. कुटुंबातील संबंध व वातावरण सुंदर ठेवणे ही पति-पत्नी दोघांची जबाबदारी आहे; एकट्या-दुकट्याची नाही; दोघांनी मानव-धर्माप्रमाणे वागले पाहिजे; एकमेकांवर प्रेम करून आदर केला पाहिजे. एकमेकांची साथ करत राहिले पाहिजे. म्हणजे एकाच रथाची ती दोन चाके आहेत हे लोकांना कळेल; आणि दोघेही संतुलनात आहेत म्हणून हे घडते हे त्यांना समजेल. ते समान असले तरी सारखे नाहीत.

आता श्रीरामांनी वेळ आली तेव्हा पत्नीचा त्याग केला तसेच सीतेनेही वेळ आल्यावर श्रीरामांचा त्याग केला. एक पुरुष आणि एक स्त्री या त्यावेळच्या त्यांच्या भूमिका होत्या. पण ते करताना पुरुषाला आणि स्त्रीला जे शोभेल त्याप्रकारे केले. म्हणून स्त्रीने स्त्रीसारखेच तर पुरुषाने पुरुषासारखेच असले पाहिजे. म्हणून श्रीरामांना मर्यादापुरुषोत्तम म्हणतात. पुरुषाच्या म्हणून ज्या ज्या मर्यादा आहेत त्या त्यांनी पाळल्या. मर्यादा म्हणजे कुणालाही वर्चस्वाखाली न

आणणे, दुसऱ्याचे काहीही न बळकावणे उदा. जे आक्रमक प्रवृत्तीचे असतात ते प्रोग्रॅममध्येही आक्रमकपणा दाखवून माझ्यापुढे बसतील, मी आल्याबरोबर मला दिसतील अशा जागी थांबतील वा बसतील, याला मर्यादापालन म्हणत नाही. मागे बसलात तरी हरकत नाही. लीडर मंडळींनी पुढे बसणे जरुरीचे आहे. दिखाऊपणाचा उपयोग नाही. मी अशा मंडळींना चांगली ओळखते. पाठीमागे राहणे ही सर्वांत आदरपूर्वक गोष्ट आहे. या बाबतीत लीडरांनी काळजी घेतली पाहिजे; अशा दिखाऊ मंडळींना त्यांनी माझ्यापुढे येऊ देता कामा नये. आज आपण हे पण ठरवले पाहिजे की लीडर्सच्या बायका नम्र, करुणामय, सामूहिकतेत मधुरपणाने वावरणाऱ्या, दयाळू आणि गृहलक्ष्मीपदाला शोभेशा नसतील त्या लीडर्सना काढून टाकले पाहिजे. कारण लीडरची पत्नी आईसारखी असते. आईपणाचे पाच प्रकार सांगितले आहेत; त्यातील एक म्हणजे गुरुपत्नी, म्हणजेच लीडरची पत्नी. म्हणून लीडर्सनी त्यांच्या बायकांना सुधारून ठीक केले पाहिजे. नाही तर त्या आपल्याला व सहजयोगाला कमीपणा आणतील. म्हणून लीडर्सच्या पत्नींनी अत्यंत काळजीपूर्वक राहून इतरांना सुधारले पाहिजे; उगीच लोकांबद्दल नवऱ्याकडे चहाड्या करू नये; लीडरची पत्नी म्हणून आगाऊपणा चालत नाही.

श्रीराम आणि सीतादेवींच्या चरित्रांतून तुम्हाला खूप शिकण्यासारखे आहे. त्यांनी आपल्यासाठी खूप काही करून ठेवले आहे. त्यांनी स्वतः आयुष्यात खूप त्रास भोगले, राजा व राजपत्नी असूनही ते वनवासात अत्यंत साधेपणाने राहिले. सीतेने तर रावणासारख्या राक्षसाच्या बंदिवासात दिवस काढले पण एकमेकांच्या जीवनकार्यात ते पूरक राहिले. असे व्यक्तिमत्व बनल्यावर सहजयोगातील पति-पत्नीही आदर्श पती-पत्नी बनतील. मी काही चांगले लोक व लीडर्स पाहते पण त्यांच्या बायका कडक व रुक्ष स्वभावाच्या असतात, रहस्यमय वागतात व स्वार्थी, त्रासदायक असतात. तुम्ही तुमच्यामुळे सहजयोगाला नुकसान पोचवू शकत नाही. **उलट तुम्ही तुमच्या पतीइतकी गहनता ज्यामुळे तो लीडर आहे, मिळवून त्याच्या प्रतिष्ठेला शोभेल अशी सहजयोगिनी बनले पाहिजे.**

आजच्या दसऱ्याच्या दिवशी आपण निश्चय करू या की आपण रामराज्य निर्माण करू, जिथे प्रेम, शांती, सुरक्षितता, कल्याण, करुणा आणि आनंद यांचे साम्राज्य असेल. श्रीरामासारखे तुम्ही पण मर्यादांचे उल्लंघन होणार नाही अशी शिस्त बाणवली पाहिजे. स्वित्झरलंडमध्ये हे झाले तर मला खूप समाधान होईल कारण स्वित्झरलंडला श्रीरामांचे खूप आशीर्वाद जरुरी आहेत; इथे स्वार्थ आणि अनर्थकारक गोष्टी फार बोकाळल्या आहेत, पैसे देणाऱ्या देशांबद्दलही अत्यंत हीन दर्जाची भावना माजली आहे. म्हणून आपण असल्या निम्नस्तरावरील राक्षसी वृत्तीच्या लोकांच्या हृदयात परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्व जाणले पाहिजे. आजकालच्या युगात पारंपारिक युद्ध होण्याची शक्यता कमी असली तरी आर्थिकदृष्ट्या लोकांची होणारी पिळवणूक थांबवून लोकांच्या पैशाचा आणि कल्याणाचा हा ऱ्हास थांबवला पाहिजे. रामराज्य प्रस्थापित करायचे असेल तर सत्ताधारी अधिकारी लोकांच्या हृदयातील श्रीराम पुन्हा एकदा जागृत झाले पाहिजेत. म्हणून आपण तशी श्रीरामाची अंतःकरणापासून प्रार्थना करू या.

**परमेश्वराचे तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद.**



पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्या वेळच्या अनेक रांगोळ्यांपैकी एक

# हिंसा अधर्म व अशांति दूर करण्यासाठी सहजयोग

### प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे प्रवचन (सारांश) दिल्ली : ४ डिसें. ९७

सर्वप्रथम हे लक्षात घ्यायला हवे की आजपर्यंत 'सत्य'च्या अनेक प्रकारे व्याख्या केल्या गेल्या. बरीच पुस्तके व ग्रंथ पण या विषयावर लिहिले गेले. धर्माच्या नावाने ग्रंथ, प्रवचने, भजन, भक्ती हेहि आपण सर्वांनी पाहिले आहे. आज तेज बहादुरांचा खास दिवस आहे; त्यांनी पण सांगितले आहे की परमात्म्याची भक्ति करा, त्यातून तुम्ही आपल्यामध्ये संतुलन प्रस्थापित करू शकाल, शांति मिळवाल आणि त्यातून तुमच्यातील सर्व दुर्गुण दूर होतील. पण आजकालचा जमाना असा दिसत नाही; आजकालच्या लोकांमध्ये कुणी साधक आहेत जे सत्याच्या शोध घेत आहेत तर दुसरे कुणी असे आहेत की त्यांना परमात्म्याचीसुद्धा फिकीर नाही, भीती नाही, नरकात जावे लागेल या कल्पनाही ते मानत नाहीत. असे म्हणतात की मनुष्याने केलेल्या पापांचे फळ त्याला अनेक जन्म भोगावे लागते पण या दुसऱ्या प्रकारच्या लोकांना त्याचीही पर्वा नाही. इतके ते दगडासारखे मठ्ठ आहेत. हत्या करणे हे पाप आहेच पण त्यातून माणसांची किंवा मुलांची हत्या करणे हे महापाप आहे. पण पाप-पुण्याची भाषाच ज्यांना कळत नाही, आम्ही करतो तेच बरोबर असे जे मानतात, पैशासाठी वाटेल तये करायला – खूनसुद्धा – जे कचरत नाहीत अशा तऱ्हेचे लोक सध्याच्या काळात आहेत. पण पूर्वी परिस्थिति इतकी खराब नव्हती. तसे आताही बरेच जण चांगले धार्मिक आहेत, पाप-पुण्याची कदर करणारे आहेत. पण आततायी, उग्रवादी लोकांपुढे त्यांचे काही चालत नाही. आणि मग लोकांना 'देव आहे का व कुठे आहे' असा संभ्रम होतो, सज्जन लोकांनाही अतिरेक्यांकडून त्रासच का भोगावा लागतो असा प्रश्न उठतो. धर्माच्या नावाखालीही आजकाल लोक ठार केले जातात. त्याच्यातही त्यांना काही वाईट दिसत नाही; तसेच देवाच्या नावावर पैसा लुबाडणे, खरे-खोटे सांगणे, पाखंडीपणा करणे हेहि प्रकार खूप चालतात. या सर्वांमुळे आजकालची परिस्थिति फार गंभीर आहे आणि ही वाईट स्थिती का आली याचाही कुणी गंभीरपणे विचार करत नाही. या सर्व पैशाच्या खेळांमागे लागून आपण कुठल्या नरकात ढकलले जाणार आहोत हेही अशा दुर्जनांना समजेनासे झाले आहे.

जगामध्ये अणि विशेषत: आपल्या देशामध्ये गरीबी फार आहे ही खरी गोष्ट आहे. ती दूर करण्याचे उपाय विचार करून करण्यासारखे आहेत. मुळात प्रश्न असा आहे की लोक आंधळे झाले आहेत; त्यांना आपल्या चुका कळेनाशा झाल्या आहेत आणि वेड्यासारखे आपलाच सर्वनाश करून घेण्याकडे भरकटले आहेत. यावर सध्याच्या काळी कोणता उपाय असेल तर तो सहजयोग, म्हणजे आपल्या खऱ्या स्वरूपाला जाणणे. स्वत:ला ओळखल्याशिवाय तुम्ही धर्म जाणू शकत नाही आणि परमात्माही जाणू शकत नाही. कारण धर्माच्या नावावर अनेक चुकीच्या गोष्टी चालल्या आहेत. त्याबरोबरच चांगल्या संस्कारांबद्दलही बरीच चर्चा होत आहे पण माणसाची स्थिति सुधारण्यासाठी काय केले पाहिजे हे बऱ्याच लोकांना समजेनासे झाले आहे. माणूसच जर दुसऱ्या माणसापासून भयभीत झाला, त्यापासून त्याला त्रास होऊ लागला तर परमात्म्याला तो कसा जाणणार? मनुष्य आजकाल संवेदना हरवून बसला आहे म्हणून आपण काय करत आहोत, कुठल्या गर्तेत फसणार आहोत हे त्याला उमजत नाही. कितीही समजाऊन सांगितले तरी ते फक्त त्याच्या डोक्यात येते किंवा मनाला पटते पण त्याच्या पलीकडे ते माणसाच्या आंतमध्ये उतरत नाही. समजा बुद्धीला पटले तरी एकदा नीट वागेल पण परत पुन्हा चुकीच्या वाटेला लागेल. हे आजकाल सगळीकडे चालले आहे, देवाबद्दल एक प्रकारचा अविश्वास वाढत चालला आहे. परमेश्वर वगैरे नसतो असा विचार मूळ धरत आहे आणि चैतन्य-शक्ति म्हणून काही आहे असे कुणाला वाटत नाही. म्हणून **आपण प्रथम हे समजून घ्यायला पाहिजे की जोपर्यंत मनुष्यामध्ये आतून परिवर्तन होत नाही, तोपर्यंत जीवनातील वास्तविकता त्यांच्या लक्षात येत नाही आणि समजल्यावर त्याबद्दलची त्याला आत्मीयता येत नाही तोपर्यंत त्याची स्थिती जनावराहूनही खालच्या स्तराला जाणार आहे.** एका जातीची जनावरे एकत्र आली तर एकमेकांना मारणार नाहीत पण आपण लोक आपल्याच मानव-जातीच्या लोकांचा संहार करत आहोत– त्याला मग काहीही मोठे नाव दिले म्हणून काय होणार? यात कुणाचेच चांगले होण्यासारखे नाही. पण मी हे नुसते सांगून होणारे नाही तर त्यासाठी तुमच्यामध्येच परिवर्तन घडून आले पाहिजे आणि तुमचे खरे स्वरूप तुम्हाला समजले पाहिजे.

तुमचे खरे स्वरूप तुम्हाला समजावे याची सर्व व्यवस्था परमेश्वराने तुमच्यामध्येच करून ठेवलेली आहे. तुमच्यामध्ये कुण्डलिनी म्हणून एक शक्ती आहे. त्याबद्दल आणि चक्रांबद्दल तुम्हाला माहिती सांगितलेली आहे. सर्व ग्रंथात, सर्व धर्मात कुण्डलिनीचे वर्णन आहे आणि सर्व महान संतांनी तिच्याबद्दल सांगितले आहे. मोहम्मदसाहेबांनीही सांगितले होते की जेव्हा त्यांचे उत्थान झाले तेव्हा ते पांढऱ्याशुभ्र घोड्यावर स्वार झाले होते व सात

महाल पार करून गेले. तीच आपली सात चक्रे. पण खोलवर जाऊन कुणी ते वाचत नाही, समजणे तर दूरच. या परिवर्तनाशिवाय दुसरा कुठला मार्ग नाही; कारण या परिवर्तनामधूनच तुमच्यामध्ये शक्ति येते,'स्वतःचा आत्मसन्मान तुम्ही राखू लागता आणि त्यातूनच तुम्ही गौरवशाली होता आणि मग आपण आपल्या आत्म्याला जाणले हे केवढे ऐश्वर्य आपल्याला मिळाले हे तुम्हाला समजते. पण 'तुम्ही आत्मा आहात' असे मी म्हणून काही होणार नाही. तुम्ही 'कशावरून' असे म्हणणार, म्हणून हे सिद्ध व्हायला हवे. आणि हीच सिद्धता तुम्हाला सहजयोगातून मिळते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तुमच्यामध्येच, किंबहुना प्रत्येक मनुष्यामध्ये ही शक्ति आहे. इथे बसलेल्या जवळजवळ सर्व लोकांनी त्याचा अनुभव घेतला आहे. दिल्ली आणि उत्तर प्रदेशामध्ये एवढ्या मोठ्या संख्येने सहजयोग स्वीकारला ही माझ्यासाठी मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. त्यांनी सहजयोगाचा अभ्यास करून त्यामध्ये स्थिरता मिळवली आहे. म्हणून तुमचेही हे एक कर्तव्य आहे की तुमच्यामधील या शक्तीला तुम्ही जाणून घ्या. आणि तुमच्यामध्ये कोणकोणत्या शक्त्या आहत ते समजून घ्या.

तुमच्यामधील प्रथम शक्ति ही आहे की तुम्ही दुसऱ्याला जागृति देऊ कला. जगामध्ये इतक्या वासना, लालसा, कामना दिसतात त्यांना अंत असेल असे वाटत नाही. पण आपल्यामध्ये आत्मशक्तीचा प्रकाश एकदा अंधार दूर होऊन उमटला की आपण त्या प्रकाशामध्ये वाटचाल करू लागतो; त्यात आपल्याला मोठे समाधान व आनंद मिळतो. याच अनुभवाची आपण इतके दिवस वाट पहात होतो आणि त्याची प्रचीती आज आपल्याला मिळणार आहे. त्यात कसल्या कल्पना किंवा सांगण्याच्या गोष्टी नाहीत तर त्यात साक्षात अनुभव आहे आणि तो मिळाल्यावर मानव महामानव बनून जातो. महामानव बनण्याचा पहिला अनुभव म्हणजे असा मनुष्य आपल्यामध्येच इतर माणसांना जाणू शकतो. याला सामूहिक चेतना म्हणतात. ही सामूहिक चेतना जागृत झाल्यावर दुसरा असा कुणी उरत नाही मग आपण दुसऱ्याला कसे मारणार? कुणाला फसवणार? स्वतःलाच आपण मारणे किंवा फसवणे शक्यच नाही. आपल्यामध्येच सारे विश्व सामावलेले आहे असे तुम्ही बनून जाता. या सर्व गोष्टी नुसत्या समजून उपयोग नाही तर त्याचा प्रत्यक्ष अनुभव आपल्यालाच आला पाहिजे. हा अनुभव आल्यावर तुम्हाला समजेल की सारी शांति तुमच्यामध्येच आहे, तुम्ही शांतीचे सागर आहात, शांतीचे सुंदर रूप तुमच्यामध्ये विराजमान झाले आहे. तीच शांति इतरांनाही देण्याची इच्छा तुम्हाला होते. अशा तऱ्हेने एक आंतरिक एकता तुमच्यामध्ये प्रस्थापित होते; धर्मा-धर्मांची चर्चा करण्याची जरूर नाही, कुणाला घाबरण्याची किंवा धमकी देण्याची जरुरी नाही. तुमच्यामध्ये प्रकाश आला की तुम्ही स्वतःचाच सन्मान करता आणि जगामध्ये सतत चालणाऱ्या स्पर्धेचा, धापळीचा तुमच्यावर परिणाम होत नाही. आता मी इथे येत होते तेव्हा रस्त्यामधून मोटारींच्या रांगाच रांगा चालल्या होत्या; एक क्षणभर स्वस्थपणे तुम्ही त्यांच्याकडे पाहिले तर हे लोक वेड्यासारखे कुठे धावत आहेत असे तुम्हाला वाटेल. मग तुम्ही त्या लोकांनाही चार शब्द सांगून त्यांना योग्य मार्ग दाखवाल.

ही जी शक्ति तुमच्यामध्ये प्रस्थापित करून ठेवलेली शक्ति आहे तिला जागृत करण्याची शक्ति तुमच्याजवळ आहे, स्वतःला शुद्ध करण्याची शक्ति तुमच्याजवळ आहे. रस्त्यात 'स्वच्छ दिल्ली' असे बरेच फलक तुम्ही पाहिलेत. 'स्व' म्हणजे तुम्हीच, तुमचा आत्मा. त्याच्याकडूनच सर्व स्वच्छ करता येते; बाहेरून स्वच्छ करण्याचा काय फायदा? आतून स्वच्छ झालात की तुम्ही कोण आहात, तुमच्यामध्ये किती सद्गुण आहेत, तुमच्यामध्ये इतरांबद्दल किती प्रेम आहे हे सर्व तुमच्यामधून लोकांना समजेल. हा अनुभव खूप लोकांना मिळालेला आहेच पण आता तो अजून खूप खूप लोकांना मिळवून द्यायचा आहे. ठिकठिकाणाहून कार्यक्रमाला लोक इथे जमले आहेत. उत्तर प्रदेश, दिल्लीमधूनही, तसेच परदेशांतूनही काही लोक आले आहेत. तर तुम्ही आता सर्व एक झाला आहात हे लक्षात घ्या. ही नुसती बौद्धिक भावना नसून तुमचा तुम्हालाच आतमधून त्याचा प्रत्यय होत आहे. जणू एकाच सागराच्या पाण्यावरील लाटा. तुमच्यापैकी प्रत्येक जण इतर अनेक माणसांना जागृति देण्यास समर्थ आहे आणि असाच हा सहजयोग पसरणार आहे. पण तुम्ही सहजयोगाशी प्रतारणा करू नका काही लोक चुकीची कामे करत असतील तर तिकडे लक्ष देऊ नका; स्वतःकडे लक्ष ठेवा व आपण सहजयोगासाठी काय करत आहोत हे पहा. एक गुरु दुनिया बदलून टाकतो आणि तुम्ही तर हजारोंनी आहात. सर्व ठिकाणी सहजयोगी झाले आहेत आणि सर्वजण एक आहेत. पूर्वीच्या काही साधु-संतांचा खूप छळ झाला पण आता तसे होणार नाही. आपण सर्व एक आहोत, त्यामध्ये हिंदु-मुसलमान-ख्रिश्चन असा भेदभाव उरला नाही. कुठल्याही देशाचे रहिवासी असलात तरी आपल्यातील ही एकता



मुंबईतील पब्लिक प्रोग्रॅमच्या वेळच्या प्रदर्शनाचा काही दर्शनी भाग

जाणून घ्या.

वर सांगितल्याप्रमाणे हा एक अनुभव आहे, आपल्या आतमध्ये काही घटित झाले आहे, तुम्हाला एक विशेष व्यक्ति बनायचे आहे ही सहजयोगाची मुख्य गोष्ट आहे. सहजयोगामध्ये पैसे भरून सभासद होण्याचा प्रकार नाही. उलट हे घटित होणे अगदी विनासायास होते. पण तुम्ही लक्षात घेतले पाहिजे की हे बनणे सोपे नाही. कुण्डलिनी जागृत झाल्यावर तुमचा संबंध चारी दिशांना व्यापून राहिलेल्या परमचैतन्यशक्तीबरोबर होतो आणि त्यामधून तुम्ही एकाकार होता. उदा. येथील सर्व विद्युतउपकरणांचा संबंध या विजेच्या स्रोताबरोबर आहे तसाच तुमचा संबंध आहे. तसे झाले की तुम्हीच पहाल की तुमचे सर्व प्रश्न सुटतात, तुमची सर्व कामे पार पडतात. कुणी गडबड केली तरी ते ठीक केले जाते आणि हा अनुभव आल्यावर तुम्हीच समजाल की आपण उगीचच काळजी करत होतो. हाच अनुभव तुम्ही सर्वांना सांगायचा आहे. आज आपला देश फार गंभीर परिस्थितीमधून चालला आहे. म्हणून तो परिस्थिती सुधारण्याची जबाबदारी आता तुमच्यावर आहे. एकजूट होऊन तुम्हाला हे कार्य करायचे आहे. त्यासाठी सर्व आशीर्वाद, तुम्हाला सर्व शक्त्या मिळाव्या हे आशीर्वाद, तुमच्या पाठीशी आहेत. आजपर्यंत होऊन गेलेली सर्व अवतरणे तुमच्यामध्ये दृश्यमान झाली पाहिजेत. म्हणजे लोकांना सहजयोगाची महति व विशेषता कळेल. राष्ट्रामध्ये इतक्या वाईट प्रवृत्ति कशा पसरल्या आहेत हे समजत नाही. त्यामागे पैसा नसेल असे नाही पण त्याहूनही वाईट गोष्ट म्हणजे त्यामागे असलेल्या राक्षसी महत्त्वाकांक्षा व प्रवृत्ति. पूर्वी एकच रावण होता पण आज जगामध्ये सर्वत्र अनेक रावण निर्माण झाले आहेत पण सहजयोगीच या रावणांना नष्ट करण्यास समर्थ आहेत. ही नष्टता करणे म्हणजे त्यांचे जागरण करणे. त्यांना जागृत करून तुम्हाला मिळालेला आनंद त्यांनाही मिळवून देणे. 'सहज'चा मार्ग प्रेमाचा आहे व प्रेम हेच सत्य आहे. **तुम्ही कुणावर प्रेम करता तेव्हा त्याच्यावद्दल सर्व जाणता. म्हणून तुम्हाला प्रेमशक्तीच वापरायची आहे. ही चैतन्यसृष्टी आपल्यावरही प्रेमाचाच वर्षाव करत असते हे लोकांना समजत नाही. हेच प्रेम एक दिवस जगभरातील मानवजातींमध्ये पसरणार आहे आणि ते एक नवीन सुंदर जग बनणार आहे.** तुमच्या आयुष्यातच हे घडणार आहे. (टाळ्या पडतात) तुम्हाला काही खास मेहनत घ्यावी लागणार नाही. सगळी आनंदाची गोष्ट आहे. लांब-लांबून ट्रकमध्ये बसून आज इथे येतातही तुम्ही त्याची मजा घेत होता; राहण्याची झोपण्याची इथे नीट व्यवस्था झाली नाही तरी तुम्ही आनंदात होता. विमानातून प्रोग्रॅमसाठी येतानाही मला वाटायचे की विमान वेळेवर पोचू दे नाहीतर इथे मोठ्या संख्येने लोक आले तर त्यांना त्रास होईल. पण मी आले तेव्हा तुम्ही सर्वजण हसत-खेळत आनंदात असल्याचे मला दिसले; एरवी इंतजार करणे म्हणजे लोकांना वैताग येतो पण इथे तुम्ही इंतजार करण्याचाही आनंद घेता. या सुंदर जीवनात तुम्हाला उतरायचे आहे. त्यासाठी प्रयत्नशील झाले पाहिजे. ध्यानामधून हे प्राप्त करायचे आहे. त्यासाठी बुद्धी वापरायची गरज नाही किंवा एका पायावर उभे रहायचे वगैरे कष्ट करायची जरूर नाही. तुम्ही फक्त त्याच्यात विरघळून जायचे आहे. प्रेमशक्तीची महानता हीच असते की तुम्हाला कसले कष्ट पडत नाहीत. तुमच्यामध्ये जागरण झाल्यामुळे सारे जगच एक अद्भुत गोष्ट बनते. तसे पाहिले तर परमात्म्याने हे जग फार सुंदर असे निर्माण केले आहे; तुमच्यामध्येही त्याने कुण्डलिनीची स्थापना एवढ्याचसाठी केली की तुम्ही त्याचा अनुभव घ्यावा. पण माणसानेच छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये अडकून घेऊन स्वतःवाच प्रश्न निर्माण केला आहे; नुसते ''मला पटत नाही'' म्हणण्यात काय अर्थ आहे? सर्व धर्मांमध्ये आत्मसाक्षात्कार झाला पाहिजे हेच सांगितले आहे. त्याशिवाय परमात्म्याला जाणण्याचा दुसरा मार्ग नाही. हे होत नाही तोपर्यंत तुमची बेचैनी दूर होणार नाही, तुमचे त्रास संपणार नाहीत. पण एकदा तुम्ही या प्रेमसागरात ओढले गेलात की तुमचे तुम्हालाच समजेल. पुष्कळ सहजयोगी मला सांगतात की ''आमचे पूर्वजन्मीचे खूप पुण्य असेल म्हणून आम्हाला आता ही स्थिति मिळाली'' पण मी त्यांना आता पूर्वजन्मीचे विसरून या जन्माकडे बघायला सांगते. तुमच्यात झालेल्या या परिवर्तनाचा स्वीकार करायला सांगते, आणि ते प्रेम पसरवायला सांगते. एखादा मनुष्य खराब असेल, सहजयोगातही असे खराब लोक घुसले असतील पण त्यांच्याशी तुमचा काही संबंध नाही. तुमचा संबंध परमात्म्याबरोबर आहे, या परमचैतन्याबरोबर आहे. इतका सोपा आणि तरीही शास्त्रीय असा दुसरा कुठलाही मार्ग नाही. पूर्वी जे गुरु, संत होऊन गेले ते तुम्हाला जागृति देऊ शकले नाहीत आणि त्यांना समजणे तुम्हाला शक्य नव्हते. कुण्डलिनीचे जागरण करणे ही सर्वसाधारण माणसाच्या बुद्धीला पेलणारी क्रिया आहे. जात-पात वगैरे व्यर्थ हानिकारक गोष्टींचा याच्याशी काही संबंध नाही. एकमेकांमधील हा एक वेगळा नातेसंबंध आहे, त्याच्यात लोभ, मोह, मत्सर यांना थारा नाही. आहे ते फक्त प्रेम. सहजयोगात असे संबंध बनतात, काही उणीवा रहात असतील तर त्याही ध्यानातून दूर करता येतात. असे सुंदर, महान जीवन प्राप्त करून घेण्याचा तुमचा अधिकार आहे आणि ते प्राप्त करून घ्यायला पाहिजे.

आपला भारतवर्ष ही योगभूमि आहे. इथे काही वाईट गोष्टी चालल्या असल्या तरी ही भूमी योगभूमी आहे. कारण इथे चैतन्य भरभरून वहात आहे, चारी दिशांनी ते पसरत आहे. लोक प्रदूषणाच्या गोष्टी करतात पण मला तर वहूंकडे चैतन्यच नजरेस येत आहे. तुम्ही सर्व बसले आहात तिथेही चैतन्यच आहे. जसजसा सहजयोग पसरलेल तसतसे प्रदूषणसारखे प्रश्न संपून जातील. मी म्हणते ती खूणगाठ बांधून ठेवा. स्वतःच जीवनाकडे, ते कसे व्यतीत करत आहोत हे पहा. दिवसरात्र पैशासारख्या बेकार गोष्टींचीच काळजी करत बसतो का, का ध्यानात राहून आपल्याकडेच लक्ष देऊन आपल्याला बघत आहोत इकडे बघा. आपला गौरव, आपली महानता लक्षात घ्या कारण सहजयोगातून मिळालेली ही प्रेमशक्ति

सर्वदूर पसरवणे हे तुमचे परम कर्तव्य आहे. त्यासाठी पैसा हवा. पैसाच द्यायला हवा अशी जरूरी नाही, ते सर्व कार्य ठीक होणार आहे. तुम्ही फक्त स्वतःला, आपल्यातील विशेषता व महानता जाणायची आहे.

आपण इतक्या संख्येने इथे आलात, बाहेरूनही आलात, इथे विशेष चांगली व्यवस्था माझ्या मनात असूनही जमली नाही तरी तुम्ही सर्वजण आनंदात आहात याचे मला समाधान आहे. हे सगळे कसे जमून येते समजत नाही. पण तुमच्या आतील एकतेचेच हे स्वरूप आहे. मंडपात बसलात, नदीकाठी बसलात तरी तुम्हाला मजा मिळते. चार सहजयोगी नुसते एकत्र आले तरी ते त्याचा आनंद लुटतात. या आनंदाचा स्रोत आपल्या हृदयातच आहे आणि हाच पुढे सहस्त्रारात गेल्यावर निरानन्द म्हणून अनुभवास येतो. मग लहान-लहान, साध्या-सुध्या, छोट्या-छोट्या गोष्टींतूनही तुम्हाला आनंद-आनंदच मिळतो. **त्या स्थितीमध्ये समाजात लोकांना त्रास देणाऱ्या, दुःख देणाऱ्या, चुकीच्या गोष्टी आढळल्या की तुमचे चित्त तिकडे जाऊन कार्य घडून येते. तुमचे चित्त तिकडे लागले पाहिजे. ते प्रकाशित झाल्यामुळे कार्यान्वित होते. आणि हे सर्व सामूहिकतेमधून झाले पाहिजे.** आपलेच चित्त स्वच्छ नसेल, संसारातल्या आपल्याच गोष्टींमध्ये अडकलेले असेल तर हे कार्यान्वित होऊ शकत नाही. पण जेव्हा ते परमचैतन्याने पल्लवीत असते तेव्हा कार्य घडूनच येते. काल हा विचार मनात आला आणि आज तेच घडून आले असे अनुभव तुम्हाला येतात. तुम्ही दोन-चार सहजयोगी एखाद्या कार्याला गेला तरी इतर अनेक सहजयोगी तुमच्याबरोबरच असतात.

---

(यापुढील भाषण इंग्रजीतून झाले)

इथे जमलेल्या लोकांत बरेच हिंदी भाषेचे लोक असल्यामुळे मी हिंदीत बोलले. मी सांगितल्यापैकी मुख्य भाग म्हणजे धर्माच्या नावाखाली जे पढवले जाते आणि नरकात जाण्याच्या गोष्टी सांगितल्या जातात त्याचा काही उपयोग आता होत नाही. कारण लोकांच्या मनात त्याबद्दलची भीति उरली नाही, देवाची किंवा पाप करण्याची भीति उरली नाही. म्हणून माणसांमध्येच परिवर्तन घडवून आणण्याची जरूरी आपण लक्षात घ्यायला हवी. या नवीन परिवर्तित व्यक्ती शांतीचे सागर असतील आणि तीच शांती सगळीकडे पसरवतील आणि या शांतीमुळे आपल्या जीवनाचे सत्य व सौंदर्य जाणतील. त्याच दृष्टीमधून त्यांना इतरांमधील सौंदर्य लक्षात येईल. विध्वंस, अत्याचार वगैरे ज्या हानिकारक घटना घडतात त्याचे मूळ आपण एकमेकांस अलग समजून चालतो हे असते आणि शांति प्रस्थापित झाल्यावर आपण सर्व एकाच माळेचे मणी आहोत हे लक्षात येते. किंबहुना तारे, ग्रह वगैरे सर्वासकट आपण एकाच परमात्म्याचे अंश आहोत हे समजते. पण हे सर्व परिवर्तन तुम्हीच घडवून आणणार आहात. त्याशिवाय इतर कोणत्याही मार्गाने हे होणे नाही. तुम्ही साधक असल्यामुळे तुम्हाला हे सहज जमण्यासारखे आहे आणि तुमच्यामध्ये शांति प्रस्थापित झाली की लोकांच्या ते नजरेत यईल आणि अशा तऱ्हेने तुम्ही शांति पसरवू शकाल. **शांति प्रस्थापित होण्यासाठी तुमच्यामध्ये प्रथम शुद्ध प्रेम प्रवाही झाले पाहिजे. त्याशिवाय शांतीची नुसती भाषा करून उपयोग नाही.** शांतीचे पारितोषिक मिळालेले लोक पाहिल्यावर मलाच आश्चर्य वाटते की त्यांना शांतीसाठी कसे निवडले? कारण आतमधून ते अशांत आहेत. तुमच्यात परिवर्तन झाल्यावरच तुम्ही आतमधून शांत होणे शक्य आहे. या नवीन परिवर्तित व्यक्तीमत्त्वाबद्दल सर्व प्रेषितांनी, अवतरणांनी, साधुसंतांनी सांगितलेलेच आहे, ग्रंथांमधून ते लिहिलेले आहे. तुमच्यामध्ये त्यासाठीचा आत्मविश्वास असला की हे परिवर्तन घटित होणे मुळीच अवघड नाही.

परमेश्वराचे तुम्हा सर्वांना अनंत आशिर्वाद



पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्या वेळी असंख्य वाहनांची व्यवस्था करताना



पुण्यातील पब्लिक प्रोग्रॅमच्या वेळी आयोजित केलेल्या प्रदर्शनाचा काही भाग








प.पू. श्री माताजी निर्मलादेवी
अध्यात्मिक प्रवचनाचा कार्यक्रम
प्रवेश विनामूल्य